रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २६७ । पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

## सोनं दहा हजारांनी स्वस्त

**नवी दिल्ली** : अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोन्या-चांदीच्या दरात मोठी वाढ झाली होती. मात्र, आता अचानक दरात घसरण झाली आहे. सोन्याचा दर तब्बल १ लाख ७० हजार रुपयांपर्यंत पोहोचला होता, तर चांदीचा दर सुमारे २ लाख ९५ हजार रुपयांपर्यंत गेला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांत सोन्याच्या दरात सुमारे १० हजार रुपयांची घसरण झाली असून सोन्याचा भाव आता सुमारे १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत खाली आला आहे. तर, चांदीचा दरही सुमारे २ लाख २६ हजार रुपयांच्या खाली आला आहे.


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ७ मार्च २०२६

किंमत ४ ₹


## जिष्णू वर्मा महाराष्ट्राचे नवे राज्यपाल



**मुंबई** : तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची आता महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपती झाल्यावर गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नावाची घोषणा केली. जिष्णू देव वर्मा यांनी त्रिपुरा राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# लाडकी बहीण, शेतकऱ्यांना दगा

### ■ अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस
### ■ विरोधकांकडून सरकारवर घणाघात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ६) विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडला. मात्र, या अर्थसंकल्पातून विकासाची दिशा मिळण्याऐवजी विधानसभा निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनांचा विसर पडल्याची टीका विरोधकांनी केली आहे. 'लाडकी बहीण' योजनेत १५०० रुपयांचा हप्ता २१०० रुपये करण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रातील तमाम बहिणींची मते मिळवली, तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात दोन लाखांपर्यंतची मर्यादित आणि तकलादू कर्जमाफी जाहीर करून सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

अर्थसंकल्पात मोठ मोठ्या घोषणा आणि आकड्यांचा पाऊस पडला असला तरी सर्वसामान्यांच्या हातात काहीच पडणार नाही. शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि महिलांसाठी ठोस उपाययोजना नसल्याने हा विकासाचे मृगजळ दाखवणारा आणि घोषणांचा फुगा ठरलेला अर्थसंकल्प असल्याची टीका •➤ पान २ वर

### अर्थसंकल्पातील सर्वात महत्त्वाच्या घोषणा!

- अजित पवारांच्या सन्मानार्थ घोषणा: अजितदादांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देणार, अजितदादांचं भव्य स्मारक उभारणार.
- **तीर्थक्षेत्र विकास:** संत गाडगे बाबा तीर्थक्षेत्र विकास तसेच देहू विकास आराखड्याची घोषणा, महाड इथे चौदार तळे इथे पायाभूत सुविधानसाठी विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. २०२६-२७ हे वर्ष सामाजिक समता म्हणून साजरा करता येणार
- **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना:** ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी देणारी योजना जाहीर. या योजनेनुसार जे शेतकरी कर्ज घेऊन नियमितपणे परतफेड करतात, अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.
- **मेट्रो आणि द्रुतगती मार्ग:** राज्यात १,२०० किमीचे मेट्रो जाळे आणि ६,००० किमीचे द्रुतगती मार्ग तयार केले जातील. मुंबई-पुणे भुयारी मार्गाच्या कामाला वेग येईल.
- **तिसरी, चौथी मुंबई (वाढवण):** वाढवण येथे चौथी मुंबई वसवली जाणार असून, यामुळे पालघर जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलेल. तसेच तिसरी मुंबईत रायगड पेण व नवी मुंबई विमानतळ ही ग्रीन फिल्ड म्हणून विकसित करणार असल्याचे जाहीर करण्यात आले.
- १० लाख घरे, बांबू विकास योजना: एमएमआर क्षेत्रात सामान्यांसाठी १० लाख नवीन घरांची निर्मिती केली जाईल. पन्नास हजार कोटींच्या गुंतवणुकीतून महाराष्ट्र बांबू विकास प्रकल्प राबवला जाईल.
- **ग्रामसडक योजना टप्पा ३:** ग्रामीण भागात २३ हजार किमीचे रस्ते आणि पूल बांधले जातील.
- **बुलेट ट्रेन २०२७ :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची ५ स्थानके २०२७ पर्यंत पूर्ण करणार.
- **बाबासाहेब आंबेडकर** यांच्या शताब्दी वर्षानिमित्त रायगडमधील चवदार तळे येथे पायाभूत सुविधा उपलब्ध करणार.
- ४ लाख उच्च कुशल रोजगारनिर्मितीचे लक्ष.
- **शेतपाणंद रस्ते योजना:** शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद योजना सुरू होणार.
- **ग्रामीण भागात** रोजगारासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना.

### मोठे आकडे, पोकळ घोषणा : हर्षवर्धन सपकाळ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ मोठे आकडे व पोकळ घोषणा आहेत. सरकारने राज्यावर कर्जाचा डोंगर करून ठेवलेला असून, ४० हजार कोटी रुपयांच्या तुटीचा हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला दिवाळखोरीकडे घेऊन जाणारा आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. अर्थसंकल्पात बुलेट ट्रेन, मेट्रो, भुयारी मार्गांचाच बोलबाला आहे. गावखेड्यातला गरीब, आदिवासी, कष्टकरी, महिला, बेरोजगार व तरुणांना अर्थसंकल्पात स्थानच नाही. एकंदरीत, हा अर्थसंकल्प मोजकी शहरे आणि मोजक्या लोकांसाठीच आहे. सर्वसामान्यांना यातून काहीही मिळणार नाही. राज्यावरील कर्ज व कर्जाची हमी मिळून १२ लाख कोटींच्या आसपास बोजा आहे. कर्जाच्या हप्त्यापोटी ६५ हजार कोटी रुपये द्यावे लागतात. त्यामुळे अर्थसंकल्पातील आकडे व प्रत्यक्ष जमिनीवरची स्थिती यात प्रचंड तफावत आहे. •➤ पान २ वर

### कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प : उद्धव ठाकरे

राज्याची बिकट परिस्थिती असताना कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प आहे. त्यातून राज्याचे काहीच हित साधले जाणार नाही. ठेकेदारांसाठी मात्र ठोस योजना करण्यात आल्याचे दिसून येते. म्हणजे प्रत्येक ठिकाणी अगदी सविस्तर, कुठून कुठे मार्ग होणार आहे? किती कोटींचा होणार आहे? या योजना आहेत. मात्र कामगार आणि शेतकरी यांच्यासाठी मात्र हा फसवा अर्थसंकल्प आहे, असा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला आहे. •➤ पान २ वर

### काय स्वस्त झालं?

- मधुमेहावरील उपचार
- कर्करोगवरील औषधं
- क्रीडा साहित्य
- वैद्यकीय उपकरणे
- सौर पॅनल

### काय महाग झालं?

- दारु
- सिगारेट
- तंबाखूजन्य पदार्थ




## दिव्यांग कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात

### जिल्हा परिषदेच्या १६४ कर्मचाऱ्यांची पुन्हा होणार तपासणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

राज्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी व आरोग्य तपासणी केली जात आहे. रायगड जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांचीदेखील तपासणी करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेतील दिव्यांग कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले असून, १६४ जण संशयित दिव्यांग असल्याचा ठपका ठेवून त्यांची पडताळणी ठाणे येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयात होणार आहे.

बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा सुरु करण्यात आला आहे. ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असणे, प्रमाणपत्र नसणे, बनावट प्रमाणपत्र सादर करून शासकीय सेवेत रुजू झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. राज्यासह रायगड जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातदेखील दिव्यांग कर्मचाऱ्यांची पडताळणी सुरु करण्यात आली आहे. प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. •➤ पान २ वर

## आमदारांच्या भाच्याचा धिंगाणा

### ■ वडखळ पोलीस ठाण्याच्या आवारातच हाणामारी, धक्काबुक्की
### ■ पोलीस ठाण्यात संजय म्हात्रेसह १४ जणांविरोधात गुन्हा दाखल

**। पेण । प्रतिनिधी ।**

वडखळ पोलीस ठाण्याच्या आवारातच आमदाराच्या भाच्याने धिंगाणा घातला आमदार महेंद्र दळवी यांचा भाचा आहे, असे सांगून आवारातच शिवीगाळी, धक्काबुक्की करीत काही जणांना मारहाण केल्याचा प्रताप सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात संजय म्हात्रे यांच्यासह १४ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रेम म्हात्रेसह सहा जणांना एका गुन्ह्याच्या तपासाकामी वडखळ पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते. त्यानुसार बुधवारी (दि. ४) दुपारी ते पोलीस ठाणे परिसरात हजर झाले होते. त्यांच्यासोबत त्यांचे नातेवाईक आरोपीदेखील होते. त्यानंतर आमदार दळवी यांचा भाचा संजय म्हात्रे त्यांच्या गाडीतून पोलीस ठाण्यात आले. तीन मार्च रोजी पालखार गावात दोन गटात झालेल्या भांडणाच्या रागातून संजय म्हात्रे याने समोरील गटातील एका व्यक्तीविरोधात बडबड सुरु केली. वडखळ पोलीस ठाण्याच्या आवारात आमटेम-पालखार येथील दोन गटांमध्ये हाणामारी झाली. आरोपींना पोलीसांचे भय राहिले नाही, कारण यातील आरोपी संजय रघुनाथ म्हात्रे हे आपण आमदार महेंद्र दळवी यांचा भाचा आहे, असं सांगून पोलीस ठाण्याच्या आवारातच शिवीगाळ करुन हाताबुक्क्याने विरोधी गटाच्या माणसांना मारहाण केली.

याप्रकरणी आमदाराचा भाचा संजय म्हात्रे, कल्पना म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्यासह परशुराम तांबोळी, प्रेम म्हात्रे, राज म्हात्रे, अजय म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, अविनाश म्हात्रे, जयेश भोईर, महेश म्हात्रे, बेबीताई म्हात्रे, पार्वती भोईर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याविरोधात कारवाई करून त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

### लोकशाहीला बाधा आणणारी घटना

**पोलीस ठाण्याच्या आवारातच झालेल्या या मारहाणीच्या घटनेने कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे सर्व कृत्य वडखळ पोलीस ठाण्याच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, जर लोकप्रतिनीधींचे नाव घेऊन कोणी दादागिरी करत असेल, तर हे कृत्य लोकशाहीला बाधकच आहे. या घटनेबाबत नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

## अनुज अग्निहोत्री देशात अव्वल

### ■ नागरी सेवा परीक्षेचे अंतिम निकाल जाहीर
### ■ एकूण ९५८ उमेदवार झाले परीक्षा उत्तीर्ण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. त्यात डॉ. अतुल अग्निहोत्री यांनी देशात पहिला क्रमांक मिळवला आहे. एकूण ९५८ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून, त्यात राज्यातील उमेदवारांच्या यशाचा डंका वाजला आहे.

यूपीएससीतर्फे ऑगस्ट २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षेच्या लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या. त्यानंतर नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय परराष्ट्र सेवा (आयएफएस), भारतीय पोलिस सेवा (आयपीएस), केंद्रीय सेवा गट अ आणि गट ब या पदांसाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली. डॉ. अनुज अग्निहोत्री यांनी देशात पहिले, राजेश्वरी सुवे एम. यांनी द्वितीय, आकांश धुल्ल यांनी तिसरे स्थान प्राप्त केले आहे.

दरम्यान, आयोगाने विविध सेवांसाठी एकूण ९५८ उमेदवारांची शिफारस केली असली, तरी अंतिम नियुक्त्या संबंधित •➤ पान २ वर

### रायगडमध्ये गॅसचा तुटवडा | हॉटेल व्यावसायिकांमध्ये चिंता

## आता २१ दिवसांनी मिळणार सिलिंडर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मागील काही दिवसांपासून इस्त्रायल आणि इराण या देशांदरम्यान सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक स्तरावर तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, त्याचे पडसाद आता रायगड जिल्ह्यातही उमटू लागले आहेत. जिल्ह्यात घरगुती आणि व्यावसायिक गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने नागरिकांसह हॉटेल व इतर व्यावसायिकांमध्ये चिंता वाढली आहे. आठ ते पंधरा दिवसांत मिळणारा घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी आता तब्बल २१ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने येथे लहान-मोठी हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, कॉटेज आणि रिसॉर्ट्स मोठ्या प्रमाणात आहेत. पर्यटनावर आधारित व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असल्याने जिल्ह्यात घरगुती वापरासोबतच व्यावसायिक वापरासाठीही मोठ्या प्रमाणात गॅसची गरज असते. मात्र, सध्या जिल्ह्यातील अनेक गॅस एजन्सींमध्ये साठा कमी झाल्याने गॅस वितरणावर परिणाम झाला आहे.

काही गॅस एजन्सींमधील साठा पूर्णपणे संपल्याची माहिती समोर येत असून, काही ठिकाणी केवळ दोन दिवस पुरेल इतकाच साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. परिणामी, घरगुती सिंगल सिलिंडरधारक ग्राहकांना आता गॅस मिळण्यासाठी साधारण २१ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. तर, डबल सिलिंडर असलेल्या ग्राहकांनाही सुमारे ३० दिवसांनी गॅस मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

व्यावसायिक वापरासाठी लागणाऱ्या गॅसची टंचाई अधिक तीव्र असल्याने हॉटेल व्यावसायिकांसह इतर व्यावसायिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पर्यटन •➤ पान २ वर



> गॅस वेळेवर मिळाला नाही तर घरातील कामांवर मोठा परिणाम होईल. रोज सकाळी स्वयंपाक करूनच कामावर जावे लागते. जर सिलिंडर २१ दिवसांनी मिळणार असेल, तर गॅस जपून वापरावा लागेल. पण, तो संपला तर घरकामे आटोपून कामावर कसे जायचे, हा मोठा प्रश्न आहे. माझ्याप्रमाणे सर्व गृहिणींना याचा त्रास होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने आणि गॅस कंपन्यांनी यावर लवकर मार्ग काढावा.
>
> – सोनाली दांडेकर, नोकरदार

## जिल्ह्यात 'चायनीज मांजा'ला दोन महिन्यांची बंदी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नागरिकांची सुरक्षितता, पक्षी-प्राण्यांचे संरक्षण आणि पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी जिल्ह्यात नायलॉन, प्लास्टिक किंवा सिंथेटिक मटेरियलपासून बनवलेल्या कृत्रिम पतंग उडवण्याच्या धाग्यावर म्हणजे 'चायनीज मांजा'वर बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांनी जारी केला आहे.

काच किंवा धातूच्या धुळीने लेपित केलेला चायनीज मांजा वापरल्यामुळे दुचाकीस्वारांसह अनेक नागरिकांना गंभीर दुखापती होण्याचा तसेच मृत्यूचे प्रकार घडले आहेत. याशिवाय या धाग्यामुळे पक्षी आणि प्राण्यांनाही मोठ्या प्रमाणात इजा होते. हा धागा जैविकदृष्ट्या विघटनशील नसल्याने पर्यावरणालाही मोठी हानी पोहोचते.



भारत सरकारने पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत कृत्रिम मांजाचे उत्पादन, विक्री आणि वापर यावर आधीच बंदी घातली आहे. विविध उच्च न्यायालयांनीही या बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. •➤ पान २ वर

## भारताला तेल खरेदीसाठी ३० दिवसांची सूट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इराणसोबत वाढत चाललेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने भारतासाठी तात्पुरती सवलत जाहीर केली आहे. या निर्णयानुसार भारतीय रिफायनरींना रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची तात्पुरती परवानगी देण्यात आली आहे. अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेन्ट यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितलं की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ऊर्जा धोरणामुळे तेल आणि गॅस उत्पादन विक्रमी पातळीवर पोहोचलं आहे. जागतिक बाजारात तेलाचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी भारतीय रिफायनरींना रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची सवलत देण्यात आली आहे.

# मालमत्ता कराविरोधात महाविकास आघाडी आक्रमक

## • पनवेल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत अनोखे आंदोलन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत महाविकास आघाडीने मालमत्ता कर रद्द करण्याबाबत अनोखे आंदोलन करत महापालिकेत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव कधी देणार असा सवाल करत स्थानिकांच्या भावना हे सरकार समजून घेत नसल्याचे सांगितले.

पनवेल महानगर पालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत महाविकास आघाडीने मालमत्ता कर रद्द करा असे लिहिलेले फलक घालत फक्त सिडको कॉलनीमधील १० लाख लोकसंख्येवर लावण्यात आलेता अन्यायकारक, अबालवी, बेकायदेशीर, दुहेरी, पूर्वलक्षी प्रभावावा पहिल्या पाच वर्षाचा मालमत्ता कर रद्द करा असे लिहिलेले फलक घालून आंदोलन केले. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव कधी देणार, असा सवाल विचारत सरकार विरोधात घोषणा दिल्या.

यावेळीस्थायीसमितीसदस्यमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका प्रिया गोवारी यांची निवड करण्यात आली. तसेच महिला व बालकल्याण समिती सदस्यपदी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका मेघना घाडगे यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे स्वीकृत नगरसेवक म्हणून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नितीन गावंड यांची निवड करण्यात आली.

> **आजच्या बैठकीत विरोधी पक्षनेते व सभागृहनेते यांची निवड होणे गरजेचे असताना त्यांची निवड न केल्याने या मनमानी कारभाराविरोधात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे.**
> **– अरविंद म्हात्रे, नगरसेवक, महाविकास आघाडी**

## केतकीचा मळा येथे महिला मेळावा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महर्षि विनोद सिध्दाश्रम सेवा मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष महिला मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तसेच १९२६ मध्ये मॅट्रिकच्या परीक्षेत हजारो विद्यार्थ्यांमध्ये वेणू अभ्यंकर उर्फ मैत्रेयी धुंडीराज विनोद यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या अभुतपूर्व अनन्यसाधारण यशाची शतकपूर्ती कार्यक्रमदेखील होणार आहे. अलिबाग तालुक्यातील केतकीचा मळा येथील सिध्दाश्रम येथे हा कार्यक्रम रविवारी (दि. ८) सकाळी दहा वाजता होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी परिवहन मंत्री दिवाकर रावते असणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत समारंभ महर्षी विनोद सिध्दाश्रम सेवा मंडळ प्रमुख विश्वस्त ॲड. अदिती वैद्य करणार आहेत. आधुनिक भारतातील अधिकारी वर्गाने कसे राज्य चालवावे या विषयावर तामिळनाडू-मद्रासमधील सेवानिवृत्त आयएस अधिकारी, लता पडळकर (परांजपे) यांचे व्याख्यान असणार आहे. न्याय व्यवस्थेतील अनुभव या विषयावर निवृत्त जिल्हा न्यायाधीश सविता बारणे, मार्गदर्शन करणार आहेत. महिलांचे मानसिक आरोग्य या विषयावर अलिबागमधील वरदा पटवर्धन तसेच स्त्री विषयक कायद्याचा वापर किंवा गैरवापर या विषयावर ॲड. जीविता पाटील यांचे व्याख्यान असणार आहे.

# पेट्रोल पंपाजवळ दुचाकीने घेतला पेट



## जीवितहानी टळली

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-पेण मार्गावरील वडखळ नाका येथील धरमतर पेट्रोल पंपाजवळ एका दुचाकीने अचानक पेट घेतल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिकांच्या मदतीने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र या आगीत दुचाकी पूर्णतः जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठी दुर्घटना टळली.

याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात आकस्मात आगीची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकी चालक आपल्या गाडीमध्ये पेट्रोल भरण्यासाठी वडखळ नाका येथील धरमतर पेट्रोल पंपावर गेले होते. शुक्रवारी (दि. ६) सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास त्यांनी गाडीत पेट्रोल भरून घेतले. पेट्रोल भरल्यानंतर गाडी सुरू करत असताना अचानक दुचाकीने पेट घेतला. काही क्षणांतच आगीचा भडका उडाल्याने परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. पेट्रोल पंप परिसरात उपस्थित असलेल्या नागरिकांनी तत्काळ धावाधाव करून आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीचा भडका वाढतच गेल्याने परिस्थिती गंभीर बनली. अखेर पाण्याने भरलेल्या टँकरला पाचारण करण्यात आले. टँकरच्या साहाय्याने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत दुचाकी पूर्णतः जळून खाक झाली होती.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी अलिबागजवळील चेंढरे बायपास रस्त्यावरही भर रस्त्यात एका चारचाकी वाहनाने पेट घेतल्याची घटना घडली होती. त्यामुळे वाहनांना आग लागण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

पान १ वरून

## लाडकी बहीण, शेतकऱ्यांना दगा

विरोधकांकडून करण्यात आली आहे.

दरम्यान, राज्य सरकारने आज कर्जमाफीची घोषणा केली. परंतु या गोष्टीला आम्ही समाधानी नाहीये. मुळामध्ये विधानसभा होऊन दीड वर्ष झाले. दीड वर्षानंतर कर्जमाफीची घोषणा होते. तीही शेतकरी आंदोलनाच्या रेट्यामुळे ही कर्जमाफीची गोष्ट सरकारला करावी लागली. आणि दोन लाखापर्यंत कर्जमाफी आम्ही करू असा निर्णय मुख्यमंत्र्यांनी आज विधानसभेच्या सभागृहामध्ये जाहीर केला. किमान पाच लाखापर्यंतच्या शेतकऱ्यांच कर्ज माफ व्हायला पाहिजे आणि कुठलेही जाचक अटी आणि निकष त्यात नको. सरसकट कर्जमुक्ती झाली पाहिजे अशी आम्हा सगळ्या शेतकऱ्यांची मागणी आहे. आणि त्यामध्ये कुठले अटीशर्तीविना कर्ज माफी झाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे, असे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सांगितले.

**कर्ज काढून फटाके वाजणारा अर्थसंकल्प : उद्धव ठाकरे**

राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. खरो-खरच शेतकऱ्यांचे भले करायचे असेल, तर, पात्र-अपात्र, हा जो काही शाब्दिक खेळ केला आहे, तसा करू नये. अर्थसंकल्पात २०४७ चा वारंवार उल्लेख झाला, तर आताची कर्जमुक्ती २०४७ पर्यंत तरी पूर्ण करणार का? तर मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट करावे की, या तारखेपर्यंत आम्ही कर्जमुक्ती पूर्ण करू, असे आव्हानही उद्धव ठाकरे यांनी दिले. साधारणपणे पाच वर्षांपूर्वी कालबाह्य पद्धतीने शेतकऱ्यांची २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी केली होती. त्यावेळी पात्र-अपात्र, अशा काही अटींचं जंजाल नव्हतं. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती केली होती. ३ कोटी वृक्ष लावणाऱ्या सरकारकडे जमीन कुठे आहे? जेव्हा एखादा प्रोजेक्ट उभारायचा असेल तर तुम्ही बेघर करता.. मग हे वृक्ष लावण्यासाठी जमीन कुठून आणणार आहे? असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला. गुजरात-मुंबई बुलेट ट्रेन येतेय. पण, मुंबईचा माणूस गुजरातला जाऊन करणार काय? २०४७ पर्यंत भाजप टिकणार नाही फक्त कर्जाचा डोंगर उभारत आहे, अशी टीका ठाकरेंनी केली. बाळासाहेब ठाकरे स्मारकांचा अध्यक्ष मी आहे. निधी नाहीय. आणि किती वेळात ते पूर्ण होणार हे ते सांगत असल्याचे ठाकरे म्हणाले.

**सरकारकडून शेतकऱ्यांचा विश्वासघात : राजू शेट्टी**

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात राज्यातील शेतकऱ्यांचा सात बारा कोरा, कोरा, कोरा म्हणून टाहो फोडून प्रचार करून शेतकऱ्यांची मते घेतली. मात्र, याच फडणवीस सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात २ लाखांपर्यंतची तकलादू कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांचा विश्वासघात केला असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी निराशाजनक असून, मुख्यमंत्र्यांनी ५५ अब्ज डॉलरवरून ५०० अब्ज डॉलरवर कृषीक्षेत्राचा जीडीपी घेऊन जाण्याचे दिवा स्वप्न पाहिले आहे. वास्तविक पाहता, शेती क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा, साठवणूक आणि प्रक्रिया, खते आणि बियाणांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा त्यावर सबसिडी देण्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद नाही, कृषी साहित्ये व निविष्ठावरील जीएसटी व महागाई मुळे वाढलेला खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि नुकसान भरपाई देण्यासाठी ठोस आराखडा नाही, पिकविम्याबाबतची विमा कंपन्यावर मेहरबानी करून शेतकरी विरोधी धोरण यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. या अर्थसंकल्पात बळीराजासाठी ठोस काहीही नाही. केवळ एआय आणि डिजिटल शेतीचे स्वप्न दाखवून जमिनीवरच्या मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष केलं असल्याचे ते म्हणाले. मुळात, राज्य व केंद्र सरकारच्या धोरणामुळेच शेती तोट्याची झाली असून कागदावरच्या उपाययोजनांमुळे शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे, असे ते म्हणाले.

**जनतेच्या डोळ्यात धूळफेक : विजय वडेट्टीवार**

विधानसभेत सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प म्हणजे केवळ शब्दांचा आणि आकड्यांचा मारा होता, यातून जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली आहे, अशी टीका विधानसभेचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. महाराष्ट्र सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे आज लग्न लावले असून, अपत्य २०४७ मध्ये होईल, या शब्दांत वडेट्टीवार यांनी टोला लगावला. या अर्थसंकल्पातील मुख्य त्रुटींवर बोट ठेवताना विजय वडेट्टीवार यांनी हा अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्राचा नसून केवळ मुंबई आणि क्षेत्रासाठी असल्यासारखा वाटतो. पुणे, ठाणे आणि मुंबईतील प्रकल्पांवरच सर्व भर देण्यात आला असून, उर्वरित महाराष्ट्र वाऱ्यावर सोडला आहे. ग्रामीण भागातील जनतेसाठी, विशेषतः नंदुरबारसारख्या दुर्गम जिल्ह्यांसाठी या बजेटमध्ये कोणतीही ठोस तरतूद नाही. सिंचन, शिक्षण आणि आरोग्य याबाबत स्पष्टता नाही, अस वडेट्टीवार म्हणाले. शेतकऱ्यांची निराशा झाली आहे. २०१४ मध्ये जेव्हा काँग्रेसने सत्ता सोडली, तेव्हा राज्यावर २ लाख ९० हजार कोटींचे कर्ज होते, पण आज हे कर्ज वाढले आहे. हे सरकार महाराष्ट्राला कर्जाच्या खाईत लोटत आहे. राज्य भिकारी होण्याच्या मार्गावर असून, आर्थिक ताळमेळ पूर्णपणे कोलमडला आहे. शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफीची घोषणा याही वेळी करण्यात आलेली नाही. मागील वर्षीच्या घोषणांची अंमलबजावणी अद्याप कागदावरच असून, शेतकऱ्यांची निराशा झाली आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. दरम्यान, या अर्थसंकल्पातून केवळ कंत्राटदार आणि उद्योगपतींची भरभराट होणार आहे. प्रचंड कमिशन खाऊन सरकार स्वतःला मजबूत करत आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

**नेमिची येतो पावसाळा : ॲड. मानसी म्हात्रे**

अर्थसंकल्पातून वेगवेगळ्या योजनांच्या घोषणांचा पाऊस पाडला. परंतु, हा अर्थसंकल्प महिला सक्षमीकरण, रोजगार व शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पोषक नसल्याचे दिसून आले आहे. मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी दोन लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा केली आहे. प्रत्यक्षात मात्र त्याचा फारसा फायदा शेतकऱ्यांना होईल, असे वाटत नाही. पूर्वीच्या कर्जमाफीबाबत सक्षम, आधारभूत निर्णय या अर्थसंकल्पात दिसून आला नाही. या अर्थसंकल्पामध्ये बेरोजगारांसाठी रोजगाराची संधी नाही. महिला सक्षमीकरणाच्या घोषणा नाहीत. गाव व शहरी भागातील मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी निधीची तरतूद दिसून आली नाही. आठ मार्चला जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा केला जातो. त्या अनुषंगाने महिला विकासाबाबत अपेक्षित धोरण या अर्थसंकल्पात दिसून आलेले नाही. या अर्थसंकल्पात विशेष असे काहीच नाही, त्यामुळे नेमेचि येतो पावसाळा असे बोलणे वावगे ठरणार नाही, असे शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी सांगितले.

**अर्थसंकल्प म्हणजे विकासाचे गाजर– संजय राऊत**

या अर्थसंकल्पामध्ये घोषणांचा सुकाळच आहे. एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था २०३० पर्यंत करण्याच उद्दिष्ट आहे. दोन लाखांपर्यंत थकबाकी शेतकऱ्यांना माफ करणे, लाडकी बहीण योजना चालू ठेवणे, जिओटेक सेंटर, किल्ले विकास योजना, वाढवण येथे चौथी मुंबई, नागपूर येथे चित्रनगरी, हजारोंच्यावर लोकसंख्या असलेल्या गावातील सारे रस्ते कॉंक्रिट करणे, जमिनीचे अभिलेख शंभर टक्के संगणकीकरण करणे आदी अर्थ संकल्पात वैशिष्ट्य आहेत. असे असले तरी, राज्यावर नऊ लाख कोटी रुपयांचे कर्ज असणार आहे. बाकी आवश्यक असलेल्या दैनंदिन जीवनातील समस्यांबाबत कुठलाही ऊहापोह नाही. प्रशासकीय सुधारणाबाबत वाच्यता नाही. थोडक्यात, विकासाचे गाजर दाखवून २०४७ पर्यंत उद्दिष्ट गाठण्याचे नमूद केले आहे. मध्यमवर्गीयांसाठी काहीही दिलासा नाही. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने तसेच काही नाविन्यपूर्ण नाही, असे मत सीए संजय राऊत यांनी व्यक्त केले.

**मोठे आकडे, पोकळ घोषणा : हर्षवर्धन सपकाळ**

गेल्या अर्थससंकल्पात अनुसुचित जातींच्या योजनांसाठी २२ हजार ६५८ कोटींची तरतूद केली होती, पण प्रत्यक्षात ६ हजार २०० कोटी रुपयेच खर्च करण्यात आले. मागासवर्गीय, अल्पसंख्याक, आदिवासी यांच्या योजनांवर अर्थसंकल्पात मोठ मोठे आकडे जाहीर केले जातात पण प्रत्यक्षात ते खर्च केले जात नाहीत.

हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, राज्यासमोर सर्वात मोठे संकट बेरोजगारीचे असताना अर्थसंल्पात केवळ ७५ हजार नोकर भरतीची घोषणा करण्यात आलेली आहे. आजपर्यंतच्या मेगा भरतीचा भाजपा सरकारचा इतिहास पाहता हीसुद्धा एक फसवी घोषणाच वाटते. गेल्या वर्षी चांगला पाऊस पडूनही राज्याचे सिंचन क्षेत्र ५६ लाख हेक्टरवरून कमी होऊन ३९ लाख हेक्टरपर्यंत आले आहे. सिंचनासोबतच पेरणीयोग्य क्षेत्रातही घट झाली आहे. यावरून सरकारने शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येत आहे.

तिसरी मुंबई, चौथी मुंबई, शक्तीपीठ महामार्ग, वाढवण बंदर हे अदानी व अंबानी यांच्या हितासाठी आहे, यातून सामान्य जनतेला काही फायदा होणार नाही. सरकारचे सौरउर्जा धोरणही फसवे आहे, त्यामुळे वीज ग्राहकांवर दिलासा नाही तर प्रति युनिट २६ पैसे अतिरिक्त भार पडणार आहे. स्मार्टमीटरमुळे अगोदरच वीजबिलात प्रचंड वाढ झालेली आहे. दावोसमधून २०२२ ते २०२५ पर्यंत ५० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार झाल्याचा दावा करण्यात आला पण आर्थिक पाहणी अहवालानुसार तर राज्यात फक्त ६ लाख कोटी रुपयांचीच गुंतवणूक आलेली आहे, असे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## दिव्यांग कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या सर्व विभागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांची पडताळणी सुरु केली आहे. जिल्हा परिषदेमध्ये ३१८ दिव्यांग कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र, आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. त्यामुळे १६४ दिव्यांग कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. हे कर्मचारी संशयित दिव्यांग असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यांची पडताळणी ठाणे येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयात केली जाणार आहे. त्यांचा अहवाल या कार्यालयात पाठविण्यात आला आहे. आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडून आलेल्या अहवालानंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

## आता २१ दिवसांनी मिळणार सिलिंडर

हंगामात गॅसचा तुटवडा निर्माण झाल्यास व्यवसायावर मोठा परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी गॅसचा वापर जपून करावा, असे आवाहन गॅस एजन्सीकडून करण्यात आले आहे.

## अनुज अग्निहोत्री देशात अव्वल

सेवांसाठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येवर अवलंबून असतील. भारतीय प्रशासकीय सेवेसाठी (आयएएस) एकूण १८० पदे, भारतीय परराष्ट्र सेवा (आयएफएस) साठी एकूण ५५ पदे, आयपीएससाठी १५०, केंद्रीय सेवा गट अ साठी ५०७, गट ब साठी १९५ पदे उपलब्ध असतील.

जाहीर केलेल्या निकालामध्ये ३४८ उमेदवारांची शिफारस सध्या तात्पुरत्या स्वरूपातील आहे, तर २ उमेदवारांचे निकाल सध्या रोखून ठेवण्यात आले आहेत. शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी केलेल्या सर्व आरक्षण दाव्यांची अंतिम पडताळणी संबंधित प्राधिकरणांकडून केली जाणार असल्याचे निकालाच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

**राज्यातील उमेदवारांचा डंका**

निकालातील पहिल्या १०० क्रमांकांत राज्यातील उमेदवारांनी स्थान प्राप्त केले आहे. आतापर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, किरण कामठे यांनी ५३वा, हृषिकेश अलासे यांनी ६१वा, सायली पगार यांनी ८७वा, दीक्षा पाटकर यांनी ८८वा क्रमांक पटकावला आहे. तर अंकिता पाटील यांनी १४०, कार्तिक बच्छाव यांनी १७७, राहुल पाटील यांनी २२५, शुभम बेहेरे यांनी २२६, ऋषिकेश पालीमकर यांनी २८३, मोहिनी जगताप यांनी ३२३, हर्षवर्धन पाटील यांनी ३४९, हर्षवर्धन तिडके यांनी ३५५, कुणाल अहिरराव यांनी ४३०, अभिषेक मगदूम यांनी ४४९, धनश्री अहिरे यांनी ४८९, तर मनोज पाटील यांनी ४९३वा क्रमांक मिळवला आहे.

## जिल्ह्यात 'चायनीज मांजा'ला दोन महिन्यांची बंदी

या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात नायलॉन, प्लास्टिक किंवा सिंथेटिक मटेरियलपासून बनवलेल्या कोणत्याही कृत्रिम पतंग उडवण्याच्या धाग्याचे उत्पादन, विक्री, साठवणूक, पुरवठा तसेच वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येणार असून, संबंधित साहित्य जप्त केले जाईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. हा आदेश २८ फेब्रुवारी रोजी जारी झाल्यापासून पुढील दोन महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहणार असून, आवश्यक असल्यास तो पुढेही वाढविण्यात येऊ शकतो. हा आदेश सर्वसामान्यांच्या माहितीसाठी सार्वजनिकरीत्या प्रसिद्ध करण्यात आला आहे.


**अलिबाग नगर परिषद**
**ता. अलिबाग जि. रायगड**
जाहिर निविदा सन २०२५-२६

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे बांधकाम विभागा कडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत आस्थापना/व्यावसायिक/कंत्राटदाराकडुन ॲक्रेलिक/स्टील/एल.ई.डी. नामफलक बसविणे कामाकरीता जाहीर निविदा दरपत्रक मागविणेत येत आहे.

टिप:- वरील निविदे मध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती व निविदा फॉर्म साठी नगरपरिषद कार्यालयातील बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : ०९/०३/२०२६

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि. रायगड**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत, सामाईक जमीन मिळकतीचे मालक श्री. भोलानाथ गजानन पावशे व श्री.उत्तम गजानन पावशे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बोरिस | ३/१ | क्षेत्र ०-३५-०४<br>पो.ख. ०-०४-३०<br>एकूण ०-३९-५० | ६.७० |

वर नमूद मिळकतीपैकी १) श्री. भोलानाथ गजानन पावशे यांचे मालकीचे क्षेत्र ०-०१-५० हे.आर. आकार ०.२९ रु.पै. व २) श्री. उत्तम गजानन पावशे यांचे मालकीचे क्षेत्र ०-०१-५० हे.आर. आकार ०.२९ रु.पै.

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०६/०३/२०२६

**(ॲड.वैभव गिरीधर पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो. कुर्डुस,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८



**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
**अधिसूचना क्रमांक. 08/2025-26**

क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांच्या वतीने, क्षेत्रीय यातायात प्रबंधक (वाणिज्य) पात्र व सक्षम व्यक्तींकडून कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील विविध स्थानकांवर सहाय्यक (परवाना प्राप्त हमाल) म्हणून प्रवाशांचे सामान वाहून नेण्यासाठी परवाना देण्यासाठी अर्ज मागवित आहेत. प्रक्रियेचे तपशील व अर्ज नमुने क्षेत्रीय यातायात प्रबंधक (वाणिज्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., एमआयडिसी, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयात तसेच संबंधित सर्व स्थानकांच्या स्टेशन मास्टर कार्यालयात उपलब्ध आहेत. **निविदा क्र. केआर/आरएन/ सीओएमएल/ आरएन/ सहायक-सिलेक्शन दिनांक 07/03/2026,** पूर्ण भरलेला अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक 06/04/2026 आहे.



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मौजे. वरसोली, तालुका- अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. चैताली चंद्रकांत आंबेतकर. रा. पनवेल यांच्या मालकी हक्काची क्षेत्र. ०.०२.०० हे. आर. चौ. मी ही मिळकत कायम स्वरुपी आमच्या अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी ) | आकार (रु. पै ) |
|---|---|---|---|
| वरसोली | १३३/२/ब | ०.०१.५०<br>पो.ख.०.००.५०<br>एकूण क्षेत्र. ०-०२.०० | ०.६६ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांस दिलेला आहे. मात्र, तरीदेखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, इजमेंट, बोजा, साठेकरार, ताबा कब्जा, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यानी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापांसून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरुपात समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख - ०६/०३/२०२६

**ॲड. मनोज परशूराम ओव्हाळ**
रजिस्टर ऑफिस समोर अलिबाग गाळा नं.६
ता.अलिबाग जि. रायगड मो.९८८१२७७४४९



**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात**
दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ३४/२०२६

सौ. वनिता रमाकांत पाटील वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीस द्वारे असे कळविणेंत येते की,

अर्जदार क्र. १-सौ. वनिता रमाकांत पाटील, अर्जदार क्र.-२ कु.निधी विनोद पाटील आणि अर्जदार क्र. ३- कु. वरदा विनोद पाटील यांनी कै. विनोद रमाकांत पाटील यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै. विनोद रमाकांत पाटील यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार क्र. १ ते ३ यांचे व्यतिरिक्त कै. विनोद रमाकांत पाटील यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यानी या न्यायालयांत दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक ०९/०४/२०२६ रोजी या जाहीर नोटीसला अनुसरुन अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार याचे लाभात वारस दाखल जारी करणेची पुढील कार्यवाही करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

अलिबाग

**कोर्टाचा शिक्का**

**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय,**
**वरिष्ठ स्तर, अलिबाग**



Adv. For Applicant
Adv. Anupama Dhabe, Deshpande.
नि.7/J
ने.ता. २४/३/२०२६

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF THE CIVIL JUDGE (S.D.)
PANVEL AT PANVEL DISTT. RAIGAD
CIVIL MISC APPLICATION NO. 1839 OF 2026

1. MRS. ABHISHEK RAJENDRA SINGH
RESIDING AT-
FLAT NO. F-401, TULSI MANGALAM
CHS., PLOT NO. 51, SEC.-12,
KHARGHAR, NEAR TAWA HOTEL,
MAHARASHTRA-410210. --APPLICANT

V/S
1) MRS. SAROJ RAJENDRA SINGH
2)MRS. VIBHA SUBHASH SINGH
3)MRS. NIGAM SINGH
4)MRS. SUDHA AMITKUMAR SINGH -OPPONENTS

That Late RAJENDRA PRASAD SINGH was the father of Mr. ABHISHEK RAJENDRA SINGH. That Late RAJENDRA PRASAD SINGH expired on 16/11/2023 at Mumbai. The properties description is in the name of deceased are attached herewith.

**SHCEDULE OF THE PROPERTIES**

| Sr.No. | Details Of The Properties |
|---|---|
| 1. | A 100% undivided share in Flat No. F- 401, Tulsi Mangalam Chs., Plot No. 51, Sec 12., opp. Tawa Hotel,Kharghar 410210. |
| 2. | Parking place no. 10,10A and 30, in the Tulsi Mangalam chs., Plot No. 51, Sec-12, Kharghar, 410210. |
| 3. | Five Thousand equity shares, (Rs. 10/ each fully paid up) Distinctive No. (S) From 01 to 5000(Both inclusive) in ABHISHEK FORWARDING & LOGISTICS PRIVATE LTD., CIN: U74999MH2015PTC264386, SHARE CERTIFICATE NO. 01, Registered Office Office No. 207, Mayuresh Cosmos, Plot No. 37, Sector No. 11, CBD Belapur, Navi Mumbai, Maharashtra, India-400614. |

Whereas the above named applicant has filed Misc. Application for Heirship of Property under, Bombay Regulation Code, 1827, the court of Civil Judge (S.D.) Panvel. You the members of public are hereby given notice to appear in the court Civil Judge (S.D) Panvel, in person or by pleader duly instructed and to file say/objection if any within 30 days from the date of publication of this public notice Failing which the said application will be held, presuming that there is no objection of anybody and the application will be finally decided. Given today under my hand and seal of the court.

Thee next date is fixed on / /2026.

Date 4/3 /2026 Seal Order

Sd/-
**PANVEL.**
**(Senior Clerk)**

Sd/-
**Asst. Suprintendent**
**Civil Judge, SD Panvel**



**जाहीर नोटीस**

आमचे आशिल श्री. प्रकाश रामचंद्र शिंगरुत, रा. शिंगरुतवाडा, पेण-खोपोली रस्ता, ता. पेण, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे :-

मौजे बोरगांव, ता. पेण, जि. रायगड गट नं. १३३, क्षेत्र ८-२४-०० हे. आर ही मिळकत आमचे आशिलांचे प्रत्यक्ष ताबेकब्जात असून या मिळकतीबाबत सौ. छाया विराग भावे यांनी दि. ०९.१०.१९९० रोजी आमचे आशिलांचे वडील रामचंद्र गणपत शिंगरुत यांचे लाभात साठेकरार लिहून दिलेला आहे आणि आमचे आशिलांचे वडिलांनी संपूर्ण मोबदला रक्कम छाया विराग भावे यांना दिलेली आहे.

आमचे आशिलांनी सदर मिळकतीत बरीच झाडे लावलेली आहेत. दगडी कंपाऊंड व त्यावर पेरकुटाची झाडे लावलेली आहेत. कालव्यापासून रस्ता तयार केलेला आहे. शेड बांधलेली आहे व श्रीराम डेरी नावाने दूध व्यवसाय करीत आहेत. त्यासाठी बरेच पैसे खर्च केलेले आहेत.

छाया विराग भावे या मयत असल्याने सदर मिळकतीचे सातबारा सदरी अमेय विराग भावे यांचे नाव असल्याचा गैरफायदा घेऊन सदर अमेय भावे हे स्थानिक एजंटामार्फत गट नं. १३३ चा बेकायदेशीर विक्री व्यवहार करण्याचे प्रयत्नात आहेत अशी माहिती आमचे आशिलांना मिळाल्यामुळे ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

गट नं. १३३ ही जमीन हेटवणे प्रोजेक्ट अंतर्गत क्षेत्र म्हणून संपादित होणार होती आणि त्यामुळे आमचे आशिलांचे लाभात खरेदीखत होऊ शकले नाही. परंतु आता सदर मिळकत भूसंपादनातून वगळलेली आहे. त्यामुळे आमचे आशिलांचे लाभात खरेदीखत होण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया चालू केली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे बोरगांव, गट नं.१३३ या मिळकतीसंदर्भात अमेय विराग भावे यांचेशी कोणीही कसलाही व्यवहार करु नये. केल्यास कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०६.०३.२०२६

सही/-
**ॲड. डी. एन. जोशी**
'वसंतपुष्प', ए विंग,
पहिला मजला, १०१
ता. अलिबाग जि. रायगड

विरोधी पक्षाची तक्रार; न.प.कडून अतिरिक्त बांधकामाची पाहणी

# बोहरी समाज हॉलसमोर अतिक्रमण

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान नगरपरिषदमधील विरोधी पक्षाच्या तक्रारीनंतर पालिकेच्या कनिष्ठ अभियंता यांनी बोहरी समाज हॉल येथे सुरू असलेल्या अतिरिक्त बांधकामाची पाहणी दहा दिवसाआधी केली. मात्र पालिकेकडून त्या अतिरिक्त आणि वाढीव असलेल्या अतिक्रमण बांधकामावर कोणतीही कारवाई होत नसल्याचे दिसून आले.त्यामुळे आता त्याच बोहरी समाज हॉलच्या गेटसमोर अतिक्रमण केले जात आहे.

दरम्यान, माथेरान नगरपरिषद प्रशासन कोणत्या भीतीमुळे त्या वाढीव बांधकामावर कारवाई करीत नाही असा सवाल माथेरानमधील सर्वसामान्य जनता उपस्थित करीत आहे. त्याचवेळी दिवसाढवळ्या माथेरान नगरपालिका गटारावर अनधिकृत बांधकाम होत असताना सत्ताधारी गटाकडून बघ्याची भूमिका घेण्यात येत असल्याने पालिकेचे विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

माथेरान रेल्वे स्टेशन समोरील सैफउद्दिन मेमोरियल हॉलमध्ये अनधिकृत बांधकाम आणि मातीचे खोद काम चालू आहे. त्याबाबत मुख्याधिकारी आणि इतर अधिकारी यांना याबाबत तक्रार केल्या. पालिकेचे बांधकाम विभाग शाखा अभियंता यांनी विरोधी पक्षाच्या नगरसेवकांसह सदर कामाची पाहणी केली.त्यानंतर आपण ही सर्व माहिती पालिका मुख्याधिकारी यांना अहवाल स्वरूपात कळवू, असे आश्वासन शाखा अभियंता यांनी दिले होते. मात्र मागील आठ दिवसात हॉलच्या वरच्या मजल्यावर सुरू असलेल्या अतिरिक्त बांधकामावर कारवाई होण्याऐवजी त्या ठिकाणी नगरपरिषदेच्या रस्त्यावर अतिक्रमण केले जात आहे. त्या ठिकाणी शासनाचा अधिकारी वर्ग मुख्याधिकारी, अभियंता आणि इतर लोकांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम आणि वृक्षतोड, मातीचे खोदकाम चालू आहे.

बोहरी धर्मगुरू यांनी माथेरानच्या निसर्गावर प्रेम करीत निसर्ग सौंदर्य टिकवून ठेवा आणि जास्तीत जास्त लोकांना पर्यटनासाठी आणा, असे आवाहन केले आहे. त्यांच्या न कळत माथेरान शहरात कच कासल बंगला, एलफिन्स्टन बंगला, सेठ वीला, मेमोरियल हॉल इत्यादी ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामांवर कोण बोलणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

माथेरानमधील विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी वज्रमूठ उगारली असून सर्व लोकप्रतिनिधींनी शहराचे विद्रुपीकरण थांबवावे यासाठी हातात हात घालून काम करावे, असे आवाहन विरोधी पक्षाचे नेते सीताराम कुंभार यांनी केले आहे.

दरम्यान, या कामाबाबत माथेरान नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून डोळ्यावर पट्टी बांधल्यासारखे वागणे सुरू आहे. त्यामुळे आता थेट रस्त्यावर अतिक्रमण केले जात असून त्याला विरोधी पक्षाने विरोध केला आहे. परंतु पालिका अधिकारी या सर्वांकडे दुर्लक्ष करीत असल्याने पालिकेचे विरोधी पक्षाचे सर्व नगरसेवक रायगड जिल्हाधिकारी यांना भेटून या सर्व गोष्टी मांडणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

माथेरान पालिकेची डोळ्यावर पट्टी



## निवडक

### किशोर ठाकुर यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**पेण :** तालुक्यातील उंबर्डे गावचे सुपूत्र ज्येष्ठ आधुनिक शिल्कार किशोर ठाकुर यांना महाराष्ट्र शासनाचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र शासन कला, साहित्य संस्कृती आणि पत्रकारीता क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींना त्यांच्या जीवनभराच्या योगदानाबाबत जीवनगौरव पुरस्कार प्रदानकर्ते आजवर राज कपूर, व्ही. शांताराम, विंदा करंदीकर, यासारख्या दिग्गजांना हा पुरस्कार मिळालेला असून, यंदाच्या कला क्षेत्रामध्ये किशोर ठाकुर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. किशोर ठाकुर यांचा जन्म १ जून १९५७ ला उंबर्डे येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी प्राथमिक शिक्षण उंबर्डे येथेच पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी पेण शहर गाठले. पुढे जे.जे कला महाविद्यालय मुंबई येथे शिल्पकलेची पदवीका घेतली. १९८१ च्या सुमारास त्यांनी चुनाभट्टी मुंबई येथे स्वतःचे कला वर्कशॉप सुरु केले. त्यानंतर गावाच्या ओढीने ते आपल्या मुळ गावी उंबर्डे येथे आले आणि स्वताःचे सुसज्ज असे कला दालन सुरु केले आहे. गेली ४५ वर्ष अविरतपणे आधुनिक शिल्पकला ते जोपासत आहेत. त्यांच्या या योगदानाबाबत महाराष्ट्र शासनाचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे.





### सुरेश खैरे यांच्या हस्ते सुधागड तालुक्यात विकास कामांचा धडाका

**पाली/गोमाशी:** सुधागड तालुक्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून सतत कार्य करणारे रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस सुरेश खैरे यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शेष फंडातून ठाणाले येथे स्मशानभूमीचे भूमीपूजन, जिल्हा वार्षिक नियोजनातून ठाणाले येथे नवीन अंगणवाडीचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा शेकाप चिटणीस सुरेश खैरे, किसनराव उमटे, मारुती फाटे, मोहिनी खामकर, मिलिंद शेळके, महेश जाधव, बाबुराव जाधव, बबन फाटे, विष्णू खंडागळे, विरेश्वर ठोंबरे, सुधीर साखरले, सुभाष फाटे, चंद्रकांत पायगुडे, रवी ठाकूर, निलेकर नाना, रामा पवार, दत्तू पवार, सुवर्णा फाटे, वृषाली फाटे, धनश्री पांडव, ग्रामस्थ मंडळ ठाणाले आदी मान्यवर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### ‘शाळेच्या विकासात समाजाचे योगदान’

**खरोशी :** शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांनी शिक्षण परिषदेत मार्गदर्शन करताना सांगितले. त्यांनी शिक्षकांना हिंद की चादर, नवभारत साक्षरता अभियान, शिष्यवृत्ती परीक्षा आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, मूल्यशिक्षण आणि वाचनसंस्कृती जोपासण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. प्रशासनाला अपेक्षित असलेली शैक्षणिक व प्रशासकीय माहिती वेळेवर सादर करणे. ही प्रत्येक शाळेची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत शिस्तबद्ध कार्यपद्धतीबाबत सूचना केल्या. गागोदे केंद्रांतर्गत शिक्षण परिषद रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायणी कोयना येथे संपन्न झाली. केंद्रप्रमुख दत्तात्रय कोठेकर यांनी प्रास्ताविकात परिषदेचा उद्देश स्पष्ट करत शिक्षकांनी गुणवत्ता वृद्धीसाठी संघभावनेने कार्य करावे, असे आवाहन केले. निपुण महाराष्ट्र या विषयावर संतोष पवार, चौथी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन रजनी शेंदाडे, अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रभावी अंमलबजावणी या विषयावर तेजस्वी गद्रे यांनी सविस्तर माहिती दिली.

## नागाव बंदरावर आगीचा भडका

आग विझविण्यासाठी सरपंच हर्षदा मयेकरचा पुढाकार

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

नागाव बंदर परिसरातील सुरूच्या बनातील जंगलात आग लागली होती. या आगीत सुरुच्या बनातील अनेक झाडे जळून नुकसान झाले. सरपंच हर्षदा मयेकर यांनी पुढाकार घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. ग्रामपंचायत कर्मचारी, वन अधिकारी व कर्मचारी, ग्रामस्थांच्या मदतीने गुरुवारी सायंकाळी ही आग आटोक्यात आणण्यत यश आले.

नागाव बंदर परिसरातील सुरूच्या बनातील जंगलात गुरुवारी(दि.५) सायंकाळी आग लागली. बंदर परिसरातील सुरूच्या बनातील जंगलात आग लागल्याची माहिती मिळताच सरपंच हर्षदा मयेकर यांच्यासह वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने वेगवेगळ्या मार्गाने आग विझविण्याचा प्रयत्न केला.वन अधिकारी तायडे, हटवार, भोईर तसेच ग्रामपंचायत कर्मचारी मानकर, ग्रामस्थ आदी सर्वांनी मिळून ही आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. ही आग सिगारेटसह चुलीवर जेवण बनविताना उडालेल्या ठिणगीमुळे लागल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या निष्काळजीपणामुळे अनेक झाडांचे नुकसान झाले. सुरुच्या बनातील जंगलामध्ये वहिवाट असणाऱ्या पक्षीसह काही जंगली प्राण्यांवरही त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेणे गरजेचे आहे. ठिणगीमुळे आग लागणार नाही, याचेदेखील भान प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे, असे सरपंच हर्षदा मयेकर यांनी आवाहन केले आहे.

## पनवेलमध्ये मुख्य जलवाहिनी फुटली

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

पोयंजे बारवई पूल परिसरात १३२० मिमी व्यासाची मुख्य जलवाहिनी फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. ही जलवाहिनी दुरुस्त करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पनवेल यांनी तातडीने ब्रेकडाउन घेत जलवाहिनी दुरुस्तीचा निर्णय घेतला आहे.

या दुरुस्तीच्या कामामुळे काळुंद्रे, पनवेल, करंजाडे, कामोठे आणि कळंबोली या परिसरात पुढील सुमारे ९ ते १० तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा आणि सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पनवेल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अभिवाचन स्पर्धेत पीएनपीच्या विद्यार्थ्यांचे यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

पारिजात मुंबई या संस्थेतर्फे दरवर्षी मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात येणारी गोष्ट मराठीची शालेय विद्यार्थ्यांसाठी सांघिक कथा अभिवाचन स्पर्धा नुकतीच सुधागड एज्युकेशन सोसायटी माध्यमिक विद्यालय कुरुळ, अलिबाग येथे पार पडली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ०१ मार्च रोजी पार पडला. पारिजात मुंबई आणि गंमत शाळा अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला, सदर कार्यक्रमास श्रद्धा पोखरणकर, हिमालय चोरघे, सुशांत म्हात्रे, अवंती वर्तक, अनिष पानसरे, सुनील यादव, गौरी पालवणकर हे उपस्थित होते.

या स्पर्धेत पाचवी ते सातवी गटामधून पीएनपी माध्यमिक शाळा, वेश्वी ( कथा नाद, लेखक द. मा. मिराजदार ) या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला, सं. मं. हायस्कूल, नागांव (कथा पिटक्या डुकराची गोष्ट) या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला तसेच रा. जि. प. शाळा, वायशेत (कथा हत्तीला वाचविणे, लेखक आ. ना. पेडणेकर) या शाळेला उत्तेजनार्थ प्रमाणपत्र प्राप्त झाले. तसेच उत्तम अभिवाचक म्हणून मनस्वी राकेश कोरगावकर हिस व ध्रुव किरण म्हात्रे पास प्रमाणपत्र प्राप्त झाले.

या स्पर्धेतील आठवी ते दहावी या गटामधून पी.एन. पी. माध्यमिक शाळा, वेश्वी (कथा श्यामची आई, लेखक साने गुरुजी) या शाळेने प्रथम क्रमांक पटकाविला, या मध्ये कस्तुरी लोलगे, उपासना पाटील, अनुष्का लोंढे, कल्याणी बाणे यांनी सहभाग घेतला होता. पी.एन.पी. होली चाईल्ड, वेश्वी (कथा अंधारातून प्रकाशाकडे ) शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. यामध्ये यश जानकर, श्रेया मालोदे, जानवी जाधव, स्वरा मोरे, समृद्धी जयस्वाल तसेच पी. एन. पी. सायरस पूनावाला इंग्लिश मिडीयम स्कूल, नागांव (कथा चिमुकली दिवटी, लेखिका सुधा मूर्ती) या शाळेला उत्तेजनार्थ प्रमाणपत्र प्राप्त झाले. यामध्ये अथर्व घरत, तीर्था कर्णेकर, आस्था बळी, संस्कृती मयेकर, काव्या प्रधान तसेच उत्कृष्ट अभिवाचक म्हणून पीएनपी माध्यमिक शाळा वेश्वीची विद्यार्थिनी उपासना पाटील हिस प्रमाणपत्र प्राप्त झाले.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, मुख्याध्यापिका सुजाता पाटील, मुख्याध्यापक निलेश मगर, मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, मुख्याध्यापिका गीतिका भूचर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## विद्युत खांब अपघाताला निमंत्रण

बेलकडे- सहाण मार्गावरील विजेचे खांब काढण्याची मागणी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |


● (संग्रहित :अमोल नाईक)

रुंदीकरणाच्या नावाखाली बेलकडे पासून सहाणबायपास पर्यंत ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. त्यासाठी पर्यायी वाहतूकीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे एकाच मार्गावरून दुहेरी वाहतूक होत आहे. या मार्गावरील विद्यूत खांब रस्त्याच्या मध्यभागी आले आहेत. हे खांब अपघाताला निमंत्रित ठरण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हे खांब काढण्यात यावे, अशी मागणी प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत रस्ते विकास महामंडळामार्फत बेलकडेपासून सहाण बायपासपर्यंत रस्त्यांचे रुंदीकरण सुरु केले आहे. ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. वर्दळीचा भाग असलेल्या अरुंद रस्त्यावरून दुहेरी वाहतूक केली जात आहे. त्यामुळे अनेकवेळा एकाच वेळी दोन्ही बाजूकडील वाहने जाणे कठीण होऊन बसले आहे.सर्वत्र रस्ते खोदकाम केले आहे. त्यामुळे धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. धुळीचे कण, नाका, तोंडात व तसेच डोळ्यात जाऊन मानवी आरोग्यावर परिणाम होण्याची भिती निर्माण झाली आहे.

पावसाळा सुरु होण्यासाठी अवघे अवघे अडीच महिने शिल्लक राहिले आहेत. पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम होणे अपेक्षित आहे. अन्यथा साळाव ते तळेखार मार्गावरील प्रवाशांच्या झालेल्या दुरावस्थेचे संकट अलिबागकरांवर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यासाठी नियोजबध्द काम करावे, अशी मागणी होत आहे.




पनवेल-कर्जत कॉरिडॉर प्रकल्प अंतिम टप्प्यात | काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता

# लोकलचा प्रवास डोंगररांगांतून होणार

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्याला थेट उपनगरी रेल्वेची जोड देणाऱ्या पनवेल-कर्जत उपनगरी रेल्वे कॉरिडॉरचे काम आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. या महत्त्वाच्या प्रकल्पाचे समारे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे; मात्र संपूर्ण प्रकल्पात सर्वाधिक लक्ष वेधणारा आणि तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग म्हणजे सह्याद्रीच्या



**डोंगररांगांतून तीन बोगदे**

सह्याद्रीच्या डोंगराळ भागातून मार्ग काढताना या प्रकल्पात एकूण तीन बोगदे उभारण्यात आले आहेत. या बोगद्यांची एकत्रित लांबी सुमारे ३,२०६ मीटर आहे. त्यापैकी वावरले येथील २.६३९ किलोमीटर लांबीचा बोगदा हा सर्वात मोठा असून मुंबई उपनगरी मार्गावरील सर्वाधिक लांबीचा बोगदा म्हणून ओळ-खला जात आहे. या बोगद्यांची उभारणी आधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करण्यात आली आहे.विशेष म्हणजे, बो-गद्यातून जाणाऱ्या रेल्वे रुळांसाठी पारंपरिक खडीऐवजी खडीविरहित (बॅलेस्टलेस) ट्रॅक प्रणाली बसविण्यात येत आहे.

> **“या बोगद्यांमध्ये प्रकाश व्यवस्था, वायुवीजन प्रणाली आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. या आधुनिक सुविधांमुळे बोगद्यांमधून गाड्यांची वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुरळीत होणार आहे. हा कॉरिडॉर सुरू झाल्यानंतर नवी मुंबई आणि रायगड परिसरातील प्रवाशांना उपनगरी रेल्वेचा नवा पर्याय उपलब्ध होणार आहे. खडकाळ रचना आणि पाण्याची झिरपण यामुळे काम कठीण झाले होते; मात्र आधुनिक तंत्रज्ञान आणि नियोजनाच्या मदतीने हे बोगदे यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत.”**
> **– योगेश शर्मा, प्रकल्प व्यवस्थापक, एमआरव्हीसी.**

डोंगररांगांतून उभारण्यात आलेले तीन रेल्वे बोगदे. डोंगराळ आणि खडकाळ भाग भेदत उभारण्यात आलेल्या या बोगद्यांमुळे उपनगरी रेल्वे मार्ग उभारण्याचे मोठे अभियांत्रिकी आव्हान यशस्वीरीत्या पेलले गेले आहे. हे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

मुंबई रेल विकास महामंडळामार्फत मुंबई अर्बन ट्रान्स्पोर्ट प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत हा मार्ग उभारण्यात येत आहे. पनवेल ते कर्जतदरम्यान २९.६ किलोमीटर लांबीचा दुहेरी रेल्वेमार्ग तयार केला जात असून या प्रकल्पासाठी सुमारे २,७८३ कोटी रुपये खर्च केले आहेत.

# दणादण आकड्यांचा संकल्प

हजार कोटी, लाख कोटी अशा आकड्यांनी जनतेला गांगरवून टाकायचे आणि प्रचंड विकास होत असल्याचे चित्र निर्माण करायचे हा सध्याच्या राज्यकर्त्यांचा हातखंडा खेळ आहे. अर्थसंकल्पाचे सादरीकरण ही त्यासाठीची सुवर्णसंधीच असते. अजितदादांनंतर तात्पुरती म्हणून जबाबदारी स्वीकारलेले महाराष्ट्राचे अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस ही संधी साधणार नाही हे संभवत नव्हतेच. त्यानुसार दणादण आकड्यांचा २०२६-२७ चा संकल्प त्यांनी शुक्रवारी राज्य विधिमंडळात सादर केला. मात्र यातले फारच थोडे आकडे लोकांना समजतील असे आहेत. शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतची कर्जमाफी हा त्यातला एक आकडा होय. गेल्या वर्षी बच्चू कडू यांनी याबाबत केलेल्या उपोषणानंतर सरकारने जून २०२६ पूर्वीपर्यंत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. मुळात खरे तर हे महायुतीचे विधानसभा निवडणुकीतले आश्वासन होते. त्याची पूर्तता करण्याबाबतत सरकार काहीही चकार शब्द काढीना म्हणून विरोधी नेत्यांना आंदोलन करावे लागले. ते सरकारने आता पूर्ण केले आहे. मात्र अशा कर्जमाफीच्या प्रत्यक्ष अटीशर्ती खूप बारकाईने पाहाव्या लागतात असा शेतकऱ्यांचा पूर्वीचा अनुभव आहे. कारण नियम व अटींमधून त्यांचा गळा कापला जात असतो. त्यामुळे ही माफी प्रत्यक्षात मिळेल तेव्हाच त्याचे स्वागत करता येऊ शकते. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे विशेष अनुदान देण्याचा प्रस्तावही असाच स्वागतार्ह असेल. लाडकी बहीण योजना सुरु राहील असे यापूर्वी हजारो वेळा सांगून झाले आहे. फडणवीसांनी त्याचा पुनरुच्चार केला आहे. वास्तविक ही योजना म्हणजे सरकारच्या आणि राज्याच्या गळ्याचा फास बनली आहे. महाराष्ट्र कितीही प्रगत व श्रीमंत असला तरी दरवर्षी सुमारे ४० हजार कोटी रुपये फुकट वाटणे हे त्यालाही शक्य नाही. याची जाणीव झाल्यामुळेच मध्यंतरी आधारकार्ड वगैरे तपासणी करून सुमारे ६० लाख महिलांना यातून वगळण्यात आले. येत्या काळात आणखी अधिक कडक कसोट्या लावल्या जातील असे दिसते. पण तूर्त तरी या योजनेतून सरकारची सुटका नाही हेच खरे आहे.

### सगळे लक्ष शहरांकडे

राज्यातील शेती क्षेत्राच्या विकासाचा दर गेल्या वर्षीच्या ९ टक्क्यांवरून यंदा केवळ ३ टक्क्यांवर आल्याचे गुरुवारी सादर करण्यात आलेल्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये म्हटले आहे. बांधकाम, उद्योग आणि सेवा हीच महसुलाची व विकासाची मुख्य केंद्रे झाल्याचे त्यातून दिसते. याचे स्पष्ट प्रतिबिंब फडणवीसांच्या अर्थसंकल्पात दिसून येते. पूर्वीच्या अर्थसंकल्पांमध्ये शेतीसंबधीच्या योजना, पाणलोट क्षेत्र कार्यक्रम इत्यादींवर अधिक भर असे. आता रस्ते, मेट्रो, शहरातील बांधकामे याचाच सर्वाधिक उल्लेख आहे. मुंबई, पुणे या विभागात ५ हजार कोटी डॉलरची गुंतवणूक होईल असे गृहित धरून या भागाच्या विकासाला सध्या सर्वाधिक प्राधान्य आहे. सर्व शहरांसाठी मिळून ५५८० कोटी रुपयांचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. मुंबईत वडाळा ते गेटवे या नव्या मेट्रोची घोषणा करण्यात आली आहे. तिसरी व चौथी मुंबईबाबत तर सतत सांगितले जात आहे. पण एकाच भागात विकासाचे असे केंद्रीकरण करणे सयुक्तिक आहे का याचा कधीतरी विचार करण्याची गरज आहे. यातून विस्थापनाचे असंख्य प्रश्न निर्माण होणार आहेत. शिवाय नागरी आयुष्याचा दर्जा दिवसेंदिवस अशा ठिकाणी अधिकाधिक भकास होतो असा यापूर्वीचा अनुभव आहे. यापूर्वी उल्हासनगर किंवा बदलापूर किंवा शहापूर इत्यादींनी जो अनुभव घेतला तो आता उरण, पालघर इत्यादी परिसराला घ्यायला लावला जाणार आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेत विरोधकांनी किमान या मुद्द्यावर सरकारला काही रोकडे सवाल करावेत अशी अपेक्षा आहे. स्टार्टअप हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. येत्या काळात ५० हजार नवीन स्टार्टअप्सना बळ दिले जाईल तसेच २५ लाखांपर्यंतची कामे या स्टार्टअप्सना निविदेविना दिली जातील अशा काही घोषणा चांगल्या आहेत. पण सरकारची तिजोरी त्यासाठी तयार आहे का हा कळीचा मुद्दा आहे. राज्यातील विविध कंत्राटदारांचे सुमारे ८० हजार कोटी रुपये थकले असल्याची तक्रार कंत्राटदार संघटनेने वारंवार केली आहे. इतर अनेक खात्यातील गेल्या वर्षीचा प्रस्तावित निधी खर्ची पडलेला नाही वा इतरत्र वळवण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारचे मनोदय पूर्ण होणार की कागदावरच राहणार हे पाहावे लागेल.


### ऑडिटची गरज

राज्यातील पालिका व नगरपंचायतींमध्ये आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी एक स्वतंत्र शहरी आयुक्तालय स्थापन करण्याची कल्पना नाविन्यपूर्ण आहे. मात्र तिचा उद्देश काय हे स्पष्ट व्हावे लागेल. अन्यथा, आणखी एका सरकारी बाबूंची सोय एवढेच त्याचे महत्व राहील. राज्यात ३०० कोटी नवीन झाडे लावण्याचा कार्यक्रम हा डोळ्यात धूळ फेकणारा आहे. गडचिरोलीमध्ये सध्या खाणी तसेच उद्योगांसाठी प्रचंड वृक्षतोड सुरू आहे. मुंबईत सर्रास कांदळवनांची हत्या चालू आहे. ती न रोखता आता ३०० कोटी असा नवा आकडा फेकण्यात आला आहे. महायुतीच्या विकासाच्या कल्पनेमुळे सह्याद्री व कोकणाची वाट लागली आहे. ती रोखण्यासाठी गंभीर व प्रामाणिक प्रयत्न हे अधिक उपयुक्त ठरतील. लखपती दीदींसारख्या योजना चांगल्या आहेत. मात्र त्यांचा फायदा शेतकऱ्यांना कितपत होतो याचे ऑडिट करण्याची गरज आहे. बळिराजा योजनेत शंभर टक्के वीजबिल सवलत वगैरे योजनेंचे नेमके लाभार्थी कोण आहेत हेही एकदा तपासायला हवे. महावितरणचे विजेचे दर देशात सर्वात महागडे असल्याचे कालच्या आर्थिक पाहणी अहवालावरून स्पष्ट झाले आहे. मागेल त्याला सौरपंप, मागेल त्याला शेततळे किंवा विहिर अशा योजना ऐकायला आकर्षक वाटत असल्या तरी त्यांची अंमलबजावणी संशयास्पद आहे. रायगड जिल्ह्यात डॉ बाबासाहेब आंबेजकर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विशेष पायाभूत सोईंचा विकास केला जाणार आहे. ते स्वागतार्ह असले तरी त्याआधी सरकारने मुंबई ते गोवा रस्ता पूर्ण करण्यासाठी आणि अलिबाग वडखळ किंवा अलिबाग मुरुड यासारख्या रस्त्यांची दुर्दशा सुधारायला हवी. या अर्थसंकल्पात राजकोषीय तूट दीड लाख कोटी व महसुली तूट ४० हजार कोटी रुपये दाखवण्यात आली आहे. ती निर्धारित उद्दिष्टापेक्षा खाली आहे हे चांगले आहे. पण मुळात सरकारकडे पैसे नसल्याने अनेक योजनांना कागदावर दाखवलेला निधी मिळत नाही हे विदारक वास्तव यातून दडवले जाते. सध्या जागतिक राजकीय स्थिती अत्यंत अस्थिर आहे. आखातातील युध्दामुळे राज्यातील शेतकऱ्यांची द्राक्षे, कांदा, केळी इत्यादी शेतमाल बंदरात अडकून पडला आहे. येत्या काळात आंब्यालाही असाच फटका बसण्याची शक्यता आहे. यावर उपाय करण्यासाठी सरकार काय करणार याचे सूतोवाच या अर्थसंकल्पात केले जाण्याची आवश्यकता होती. ते झालेले नाही. ट्रम्प यांच्या आयातकरांच्या धोरणामुळे राज्यातील उद्योग तसेच आगामी काळात सेवांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. त्याची तयारीही या संकल्पपत्रामध्ये दिसत नाही.

विचार

# ‘एआय समिट’मध्ये नाचक्की

*‘ग्लोबल साउथ’मध्ये भारताच्या प्रगतीवर टीका करणाऱ्या पाश्चात्य माध्यमांना ग्रेटर नोएडा येथील ‘गलगोटियास विद्यापीठा’च्या चौर्यकर्मामुळे टीकेची आणखी एक संधी मिळाली. या कृतीमुळे पाश्चात्य माध्यमांमध्ये बरीच चर्चा झाली. तांत्रिक शिक्षणात खासगी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होऊ शकतो. मूलभूत गुणवत्तेशी तडजोड केल्यामुळे आपण देशासाठी कोणते भविष्य घडवत आहोत, हेदेखील या निमित्ताने समोर आले.*




अजय तिवारी

नवी दिल्लीमध्ये पार पडलेल्या जागतिक पातळीवरील ‘एआय समिट’मधील प्रदर्शनात ‘एआय’ संबंधित वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. या प्रदर्शनात सहभागी झालेल्या नोएडातील ‘गलगोटियास विद्यापीठा’ने केलेल्या दाव्याने जगभरात आपली नाचक्की झाली. या घटनेने देशातील वेगाने वाढणाऱ्या नकारात्मक प्रवृत्तीवरही प्रकाश टाकला. शॉर्टकटद्वारे जलद यश मिळवण्याचा प्रयत्न अंगलट येतो, हे या निमित्ताने पुन्हा दिसले. विडंबनाची गोष्ट म्हणजे या घटनेने ‘ग्लोबल एआय समिट’च्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. ‘गलगोटियास विद्यापीठा’तील धोरणकर्त्यांनी हे का विचारात घेतले नाही, की चीनी बनावटीच्या रोबोला स्वतःचे यश म्हटल्याने देशाची प्रतिष्ठा कमी होईल. विद्यापीठ आता स्पष्टीकरण देत आहे, की त्यांनी रोबो बनवल्याचा दावा केला नव्हता. दुसरीकडे, ज्या सरकारी अधिकाऱ्यांनी विद्यापीठाला योग्य ती काळजी न घेता ‘एआय समिट’मध्ये स्टॉल लावण्याची परवानगी दिली, त्यांनाही जबाबदार धरले पाहिजे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान आणि रोबोटिक उत्पादन क्षेत्रात निश्चितच मोठी प्रगती केली आहे. तरुणांचा देश असलेल्या भारताने अमेरिका आणि चीननंतर ‘एआय’ क्षेत्रात तिसरे स्थान मिळवले आहे. शेतीपासून औषध आणि उत्पादन क्षेत्रांपर्यंतच्या क्षेत्रात ‘एआय’ आणि ‘रोबोटिक्स’चा वापर वाढत असताना भारताकडे भरपूर कर्मचारी असले, तरी काळाशी जुळवून घेतले पाहिजे. आपण ‘एआय’ आणि ‘रोबोटिक्स’चा स्वीकार केला पाहिजे. त्याच वेळी आपण ‘एआय’जगतात आपली विश्वासार्हतादेखील स्थापित केली पाहिजे. असे असताना देशाला ‘गलगोटियास विद्यापीठा’सारख्या विद्यापीठाच्या खोटारडेपणामुळे मान खाली घालावी लागली.

वस्तुत: आपली संशोधन आणि विकास व्यवस्था इतकी मजबूत असावी, की कोणत्याही संस्थेला परदेशी उत्पादन स्वतःचे असल्याचा दावा करण्याची गरज भासू नये. अन्यथा, केवळ ‘एआय समिट’च नाही, तर देशाच्या प्रतिष्ठेलाही धक्का पोहोचू शकतो. देशातील संशोधन संस्था आणि विद्यापीठांनी लक्षात घेतले पाहिजे, की आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंटरनेटच्या युगात कोणत्याही शोधाबद्दल खोटे दावे करणे अशक्य आहे. खरे तर, अशा कृती संबंधित संस्थेच्या आणि देशाच्या प्रतिष्ठेलाच हानी पोहोचवतात. येत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता कोणत्याही देशाच्या ताकदीचा आणि समृद्धीचा पाया बनेल यात शंका नाही; परंतु या मार्गावर यश मिळवण्यासाठी देशातील संशोधन आणि विकासाचा पाया मजबूत करणे आवश्यक आहे. अन्यथा, खोट्या दाव्यांमुळे देशाला अस्वस्थ परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. यामुळे देशाच्या प्रतिष्ठेलाही हानी पोहोचू शकते. आज भारताला रोबोटिक्ससाठी एक मजबूत परिसंस्था विकसित करण्याची आवश्यकता आहे. हे साध्य करण्यासाठी देशाकडे तांत्रिक क्षमता आणि प्रतिभा आहे; परंतु पायाभूत सुविधांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सरकारी पाठिंबा आणि सर्व अभियांत्रिकी शाखांमध्ये चांगला समन्वय आवश्यक आहे. १९६० च्या दशकात रोबोटिक्सचा पाया रचणाऱ्या अमेरिकेशी स्पर्धा करण्यासाठी आपल्याला नक्कीच काही वेळ लागेल. भारतीय उद्योग अजूनही बाल्यावस्थेत असताना देशातील प्रत्येक ‘आयआयटी’मध्ये ‘रोबोटिक्स लॅब’ आहे.

जलद प्रगतीचा भारताला अभिमान बाळगण्यास हरकत नाही; परंतु नवी दिल्लीतील ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट’मधील गैरव्यवस्थापनाचे आरोप समोर येत असताना एका खासगी विद्यापीठाच्या सहभागामुळे टीका होत आहे. ‘गलगोटियास विद्यापीठा’वर शिखर परिषदेत चीनी बनावटीचा रोबो कुत्रा स्वत:च्या नावे सादर केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेमुळे ‘सोशल मीडिया’वर व्यापक चर्चा सुरू झाली. विद्यापीठाने ही घटना गैरसमजामुळे घडली असे सांगत शिखर परिषदेतील आपला स्टॉल रिकामा केला. ‘एक्स’वर दिलेल्या निवेदनात ‘गलगोटियास विद्यापीठा’ने लिहिले आहे, की आमच्या स्टॉलवरील प्रतिनिधीला तांत्रिक माहिती नव्हती. माध्यमांशी बोलण्याचा अधिकार नसतानाही कॅमेऱ्यासमोर येण्याच्या उत्साहात त्यांनी उत्पादनाबद्दल चुकीची माहिती दिली. या विद्यापीठाच्या प्रा. नेहा सिंग या रोबो कुत्र्याबद्दल मीडियाशी बोलणाऱ्या पहिल्या सदस्य होत्या. त्यांनी सांगितले, की हा रोबो विद्यापिठामध्ये विकसित केला गेला आहे. यामुळे ‘गॅलगोटियास विद्यापीठा’ला ‘सोशल मीडिया’वर ट्रोल करण्यात आले. प्रा. सिंग यांचा एक व्हिडीओ आता ‘सोशल मीडिया’वर व्हायरल होत आहे. त्या दावा करतात, की ‘एंड-टू-एंड इंजिनीअरिंग’पासून ‘ॲप्लिकेशन’पर्यंत सर्व काही त्यांच्या विद्यापीठात विकसित केले गेले आहे. त्यांनी दावा केला, की ‘गॅलगोटियास विद्यापीठा’मध्ये भारतातील पहिले ड्रोन सॉकर अरेना आहे. तिथे विद्यार्थी गेम खेळतात, ते उडवतात आणि नवीन आणि सुधारित वैशिष्ट्यांसह ते विकसित करत आहेत. या व्हिडीओमध्ये प्राध्यापक दाखवत असलेला ड्रोन दक्षिण कोरियाची कंपनी हेल्सेलने बनवलेल्या ड्रोनसारखाच आहे. हेल्सेलच्या वेबसाइटनुसार फुटबॉल हा जगभरातील सर्वात लोकप्रिय खेळ आहे आणि या पार्श्वभूमीवर फुटबॉल आणि ड्रोन एकत्र करून या खेळाची एक नवी आवृत्ती तयार करण्यात आली आहे. तिथेही ‘गॅलगोटियास विद्यापीठ’ उघड्यावर पडले. ‘गॅलगोटियास विद्यापीठ’ २०११ मध्ये उत्तर प्रदेशमधील ग्रेटर नोएडा येथे सुरू झाले. सुनील गलगोटिया त्याचे संस्थापक आहेत. ते ‘गलगोटिया पब्लिकेशन्स’चे मालक आहेत. या विद्यापीठाच्या वेबसाइटनुसार सुनील गलगोटिया हे नवी दिल्लीतील कनॉट प्लेस येथील त्यांच्या कुटुंबाच्या पुस्तकांच्या दुकानात, ‘ईडी गलगोटिया अँड सन्स’ येथे काम करत होते. १९८० मध्ये त्यांनी एक प्रकाशनगृह सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ‘गलगोटिया पब्लिकेशन्स’ या नावाने प्रकाशन सुरू केले. गलगोटिया यांनी सुरुवातीला त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित करण्यासाठी नऊ हजार रुपये कर्ज घेतले होते. परदेशात शिक्षणासाठी ‘सॅट’, ‘टॉफेल’, ‘जीआरई’ आणि ‘जीएमएटी’ परीक्षांचे प्रकाशन हक्क मिळवण्यात या प्रकाशन गृहाला यश मिळाले. त्यानंतर त्यांनी पुस्तकांमधून बाहेर पडून शिक्षणक्षेत्रात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. २००० मध्ये त्यांनी ४० विद्यार्थ्यांसह ‘गलगोटियास इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी’ सुरू केले. त्याच वर्षी ‘गलगोटियास कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी’ची स्थापना झाली. या दोन्ही संस्थांनी नंतर २०११ मध्ये ‘गॅलगोटियास विद्यापीठा’ची स्थापना केली.

आज ग्रेटर नोएडामध्ये ‘गॅलगोटियास विद्यापीठा’चा ५२ एकर जागेत कॅम्पस आहे. विद्यापिठाचा दावा आहे, की दिलेल्या शैक्षणिक सत्रात ४० देशांमधील अंदाजे ४० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. जगभरातील ९६ देशांमध्ये त्याचे एक लाखांहून अधिक माजी विद्यार्थी आहेत. हे विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठ पॉलिटेक्निक, पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि पीएचडी शिक्षण देते. विद्यापीठ त्याच्या वीस संस्थांमध्ये दोनशे कार्यक्रम घेण्याचा दावा करते. या विद्यापीठाला ‘फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया’, ‘बार कौन्सिल ऑफ इंडिया’, ‘इंडियन नर्सिंग कौन्सिल’, ‘नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन’ आणि ‘नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंटच्या नॉर्म्स’नेदेखील मान्यता दिली आहे. सुनील गलगोटिया हे विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्यांचा मुलगा ध्रुव ‘सीईओ’ आहेत. सुनील यांची मुलगी आराधना ही विद्यापीठाची ‘ऑपरेशन्स डायरेक्टर’ आहे. गलगोटियास विद्यापीठाचे म्हणणे आहे, की त्यांचे ध्येय बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणारी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध संस्था बनणे आहे. जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि त्यांच्या क्षेत्रात लीडर बनण्यास तयार असलेले पदवीधर निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. तथापि, ‘गॅलगोटियास विद्यापीठ’वादात अडकण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान, विद्यार्थ्यांच्या एका गटाने संपत्ती वाटप आणि वारसा कराच्या मुद्द्यावरून नवी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयाबाहेर निदर्शने केली. त्यांनी ‘आधी आपण मतदान करू, मग आपण मंगळसूत्र घेऊ’ असे लिहिलेले पोस्टर हातात धरले होते.

गेल्या वर्षी जूनमध्ये ‘गॅलगोटियास विद्यापीठ’ कॅम्पसच्या ‘ब्लॉक बी’मध्ये विद्यार्थ्यांच्या दोन गटांमधील हाणामारीचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर यशाचा दावा करणारे, संशोधनात अव्वल असल्याचे सांगणारे असे हे विद्यापीठ त्याच्या ‘कर्तृत्त्वा’मुळे वादाचे केंद्र ठरले नाही, तर त्याच्यामुळे देशाचीही मान खाली गेली.

चर्चा आजची

# आशा सेविका दुर्लक्षित



अंतरा पारंगे

ग्रामीण भागातील तळागाळापर्यंत योजना पोहचविण्याचे तसेच घराघरात जाऊन शेवटच्या घटकाला योजनांची माहिती देण्याचे काम आशा सेविकांनी कायमच केले आहे. निवडणुकीच्या कालावधीतदेखील मतदान करण्यासाठी मतदाराला प्रोत्साहित करण्याचे काम आशा सेविकांनी केले. परंतु, आजही आशा सेविका दुर्लक्षित असल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीत काम करणाऱ्या आशा सेविकांना अद्याप निवडणूक भत्ता दिला नाही. ही मोठी चिंताजनक बाब आहे. घराघरात पोहचून मतदारांना मतदान करण्यासाठी मतदार स्लीप वाटण्याचे काम करणाऱ्या आशा सेविकांबाबत अन्याय का? असा प्रश्न जनसामान्यांकडून विचारला जात आहे.

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्याबरोबरच शासनाच्या सर्व योजना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने मानधनावर महिला आशा स्वयंसेविकांची नियुक्ती केली. बालमृत्यू कमी करणे, लसीकरण, स्वच्छता आणि सरकारी आरोग्य योजनांची माहिती घरपोच देण्याच्या उद्देशाने आशा स्वयंसेविकांची निवड करण्यात आली. आरोग्य यंत्रणा आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून आशा सेविकांकडे पाहिले जाते. गरोदर मातांची नोंदणी, पोषण आहार सल्ला देणे, लहान मुलांचे लसीकरण, कुटूंब नियोजन, क्षयरोग मलेरिया या आजारांसह कुष्ठरोगाबाबत जनजागृती करण्याचे काम आशा सेविका प्रामाणिकपणे करतात. तसेच ताप, जुलाब, व इतर प्राथमिक आजारांसाठी असणारी औषधे आशा सेविकांपर्यंतच पोहचविण्याची कामे केली जातात. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य सुविधा पुरवण्यात त्यांचा वाटा मोठा आहे. त्यांना आरोग्य यंत्रणेचा कणा बोलणे वावगे ठरणार नाही. गाव पातळीवर आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी आशा सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लॉकडाऊनच्या काळातही आशा सेविकांची भुमिका महत्वपूर्ण राहिली आहे. आपल्या जिवाची पर्वा न करता, आशा सेविकांनी काम केले आहे. कोरोना काळात विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता राज्य सरकारने ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावी करण्यावर भर दिला होता. त्यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी व मिनी अंगणवाडी सेविका-मदतनीस, तसेच आशा कार्यकर्त्या यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात जनजागृती, स्वच्छता मोहिमा आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच संसर्ग रोखण्यासाठी घरभेटी, सर्वेक्षण आणि विलगीकरणाबाबत सूचना देण्याचे कामही त्यांनी केले.

नुकतीच रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी निवडणुकीची लढत झाली. जिल्ह्यात ५०२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे होते. त्यात जिल्हा परिषदेचे १७३ व पंचायत समितीचे ३२९ उमेदवार होते. ७ फेब्रुवारीला मतदान झाले. त्या निमित्ताने मतदारांपर्यंत शासकीय पध्दतीने मतदार स्लीप वाटप करण्याचे काम आशा सेविकांकडे सोपविण्यात आले. आशा सेविकांनी घरोघरी जाऊन १७ लाख मतदारांपर्यंत पोहचून त्या मतदार स्लीप वाटप करण्याचे काम केले. जिल्ह्यात दोन हजार ३२३ मतदान केंद्र होते. या मतदान केंद्रामध्ये आशा सेविकांकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. आरोग्य कीटसह मतदानासाठी येणाऱ्या मतदारांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम आशा सेविकांनी केले. सकाळी सात वाजल्यापासून मतदान होईपर्यंत सायंकाळपर्यंत आशा सेविका मतदान केंद्राच्या बाहेर बसून होत्या. शासनाने दिलेली जबाबदारी त्यांनी खंबीरपणे पार पाडली. निवडणूकीत काम केल्यावर अनेकांना निवडणूक भत्ता दिला जातो. मात्र, आशा सेविकांना हा भत्ताच दिला नसल्याची माहिती समोर आली आहे. तुटपुंज्या मानधनात काम करणाऱ्या आशा सेविका मात्र दुर्लक्षित राहिल्या. त्यांना मानधन देण्यास प्रशासन उदासीन ठरल्याचे दिसून येत आहे.

शासनाच्या कोणत्याही योजना असो, त्यांची अंमलबजावणी चोखपणे करण्याचे काम आशा सेविका करतात. शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करीत आशा सेविका काम करतात. जिल्ह्यातील गावे, वाड्यांसह खेड्या-पाड्यात जाऊन योजनांची माहिती देण्याचे काम आशा सेविकांमार्फत केले जाते. त्यामुळे खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे आधार म्हणून त्या ठरत आहेत. गरोदर मातेला दवाखान्यात घेऊन जाणे, त्यांची तपासणी करून घेणे. त्यांना औषधांसह इतर पोषण आहार वेळेवर उपलब्ध करून देण्याचे काम आशा सेविका करतात. आशा सेविकांना कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, यासाठी गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा केला जात आहे. परंतु, त्यांच्या या मागणीकडे अद्यापर्यंत लक्ष देण्यात आले नाही. मात्र त्यांच्याकडून योजना राबवून घेण्याचे काम शासन कायमच करीत आहे.

आरोग्य विभागाची ऑनलाईन कामे आशा सेविकांच्या माध्यमातून करून घेण्याचे करून घेतले जात आहे. त्यासाठी लागणारा मोबाईल रिचार्जचा भत्ताही शासनाकडून दिला जात नाही. ऑनलाईन कामे करून घेतले जातात. परंतु, त्यांना सुविधा दिल्या जात नाही. ही मोठी चिंताजनक बाब आहे. सरकारने आशा सेविकाच्या कामांची दखल घेऊन त्यांना निवडणूक भत्ता देण्याबरोबरच इतर सुविधा उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे.

लोकसंसद


### “आर्मगेडन युद्धाच्या निमित्ताने”

सध्या चालू असलेले अमेरिका इजराइल विरुद्ध इराण हे युद्ध पेट्रोडॉलर्स भोवती फिरत आहे असे म्हटले जात आहे पण हे धर्मयुद्ध आहे. यामध्ये ख्रिस्ती विरुद्ध ख्रिस्तेत्तर अथवा मुसलमान विरुद्ध मुसलमानेत्तर असे आहे. आर्मगेदन म्हणजे सर्वात मोठे युद्ध जे मानव आणि देव धर्माचा अधिकार न मानणारे यांच्यात होणारे युद्ध. जो माझा धर्मावर श्रद्धा ठेवणार नाही त्याच्यावर बलपुर्वक नियंत्रण मिळवण्याचा माझा धार्मिक अधिकार आहे ही बहिष्कारवादी विचारसरणी या युद्धाला कारणीभूत आहे. ख्रिस्ती आणि इस्लाम या दोन्ही धर्मानुसार या धर्मयुद्धातून एक तर मानवी विश्वाचा शेवट होणार अथवा जगावर त्यांचे वर्चस्ववादी राज्य प्रस्थापित होणार आहे. या युद्धात इराणचे सर्वोच्च नेते आयातउल्ला खामेनी यांना ठार मारल्यानंतर जगभरातील मुसलमानांचे पित्त खवळले आहे. देशातही १३ राज्यांमध्ये मुसलमानांनी निदर्शने केली, मोर्चे काढले. काश्मीरमध्ये तर ७५ वाहनफेऱ्या काढण्यात आल्या. मुसलमानांसाठी पायघड्या घालणारी काँग्रेस आणि अन्य कथित धर्मनिरपेक्षतावादी पक्ष यांना खामेनी यांचा पुळका आला आहे. धर्मांधांकडून हिंदूंच्या हत्या होत असताना, त्यांचे धर्मांतरण होत असताना त्यांच्यावर आत्याचार होत असतांना गप्प बसणाऱ्या सोनिया गांधी यांनी खामेनी यांच्या समर्थनार्थ इंडियन एक्सप्रेस मध्ये लेख लिहिला आहे. खामेनी यांच्या हत्येनंतर सरकारने गप्प राहणे याला मौन म्हणत नाही तर हा दायित्व झिडकारण्याचा प्रकार आहे. सरकारने खामेनी ह्यांच्या हात्येचा निषेध करायला हवा अशी इच्छा प्रगट केली आहे.

**– लीना मकरंद गाडगीळ,** न्यू पनवेल

दिनविशेष

# कृतीशील नेते गोविंद वल्लभ पंत



गोविंद वल्लभ पंत हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते. पंतांचे मूळ घराणे महाराष्ट्रातील; तथापि दहाव्या शतकात त्यांचे पूर्वज उत्तर प्रदेशात गेले आणि तेथेच स्थायिक झाले. त्यांचा जन्म १० सप्टेंबर १८८७ रोजी अलमोडा येथे झाला. त्यांचे वडील मनोरथ पंत हे जमीनमहसूल खात्यात नोकरी करीत. गोविंदांनी अलमोडा येथेच मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतले. पुढे ते अलाहाबाद येथील म्यूर सेंट्रल कॉलेजमधून बी.ए. झाले (१९०७) व नंतर एल.एल.बी. झाले (१९०९). या परीक्षेत पहिला क्रमांक आल्यामुळे त्यांना लॅम्सडेन सुवर्णपदक मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांच्यावर गोपाळ कृष्ण गोखले व पंडित मदन मोहन मालवीय या दोन देशभक्तांच्या विचारांचा परिणाम झाला. ‘सार्वजनिक जीवनाचा पहिला धडा मालवीयांकडून मिळाला’, असे ते म्हणत. त्यांनी नैनिताल येथे प्रथम वकिलीस सुरुवात केली.

वकिलीच्या व्यवसायात त्यांनी प्रतिष्ठा व पैसा दोन्ही मिळविले. आपल्या प्रदेशातील मागासवर्गीय जातिजमातींचे प्रश्न सोडिविण्यासाठी, तसेच त्यांच्या समस्यांसाठी, तसेच त्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी कुमाऊँ परिषदेची स्थापना केली (१९१६). कुमाऊँ प्रदेशातील सार्वजनिक चळवळीत भाग घेऊन त्यांनी भिकाऱ्यांची व्यवस्था, मजुरांची सक्तीने भरती, जंगलवासीयांवरील अत्याचार इ. प्रश्न कुमाऊँ परिषदेतर्फे हाताळले. यावेळी कुमाऊँ प्रदेश अनुसूचित जातिजमातींच्या विभागात अंतर्भूत केला होता. म्हणून त्यांनी साउथबरोच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मताधिकार समितीसमोर योग्य तो पुरावा सादर करून कुमाऊँ प्रदेश या विभागातून अलग करण्यात संपूर्ण यश मिळविले.

उत्तर प्रदेशाच्या विधान परिषदेत ते निवडून आले (१९२३). त्याच वर्षी मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास आदींनी स्वराज्य पक्षाची स्थापन केली. महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत सहभागी झाल्याने त्यांना १९३०-३२ च्या दरम्यान दोन वेळा तुरुंगवास घडला. उत्तर प्रदेशात कृषिविषयक सुधारणा करण्यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. तिचा अहवाल त्यांनी १९३२ साली सादर केला. गोविंद पंत हे एक खंबीर नेते होते, ते कमी बोलत; त्यांचा भर प्रत्यक्ष कृतीवर असे. भारतातील सर्वांत मोठ्या घटकराज्याचे सर्वांत जास्त वर्षे ते मुख्यमंत्री होते. आपल्या कारकीर्दीत प्रशासनव्यवस्थेत त्यांनी अनेक आमुलाग्र सुधारणा केल्या; उत्तर प्रदेशातील जमीनदारी पद्धत नष्ट करून त्यांनी जमीन सुधारणेचे कायदे केले; तेथे शासकीय कार्यालयांतून त्यांनी हिंदी भाषेचा उपयोग सुरू केला.

१९३८-३९ मध्ये त्यांच्या प्रोत्साहनाने हिंदीमध्ये पारिभाषिक शब्दकोश तयार झाला. मुख्यमंत्री या नात्याने १९४८ मध्ये देवनागरी लिपी सुधारून हिंदी टंकलेखन-यंत्र व दूरमुद्रक तयार करविण्याचे प्रयत्न त्यांनी केले. केंद्रीय गृहमंत्रीपदावर असतानाही केरळमधील कम्युनिस्ट राजवट, पंजाबी सुभा, आसाममधील दंगली इ. प्रश्न त्यांनी अत्यंत कुशलतेने हाताळले. राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी ‘भारतरत्न’ हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला (१९५७). मुत्सद्दीपणा, कणखरपणा, कृतिशीलता आणि संसदपटुता यांसारखे आदर्श नेतृत्वाचे गुण त्यांच्यात होते. अशा या महान नेत्याचे ७ मार्च १९६१ रोजी निधन झाले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

स्व परेश नवीनचंद्र गाला स्मरणाथ सांताक्रूझ मुंबई

# सिडकोच्या ‘विमान’ भरारीत रेल्वे प्रवाशांचे हाल

## बेलापूर स्टेशन परिसरातील रस्त्यांची दुरवस्था

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईचे शिल्पकार म्हणवून घेणाऱ्या सिडको प्रशासनाला आपल्याच मुख्यालयाशेजारील रेल्वे स्थानक परिसरातील रस्त्यांची दुरवस्था दिसत नाही का? असा संतापजनक सवाल आता उपस्थित केला जात आहे. सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक परिसरातील रस्त्यांवर सध्या खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, यामुळे सामान्य प्रवाशांचे आणि रिक्षा चालकांचे कंबरडे मोडण्याची वेळ आली आहे. वारंवार तक्रार करूनही सिडको याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप एकविरा माता रिक्षा चालक-मालक संघटना (नवी मुंबई) यांनी केला आहे.



बेलापूर रेल्वे स्थानक (पूर्व), सेक्टर-११ आणि सकाळ भवन समोरील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या खड्ड्यांमुळे रिक्षातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विशेषतः गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक, अपंग आणि आजारी व्यक्तींना असह्य वेदना सहन कराव्या लागत आहेत. अनेक वाहनचालकांना आणि रिक्षा चालकांना मणक्याचे आजार जडले आहेत. सिडको केवळ मोठे प्रोजेक्ट आणि त्यांच्या जाहिरातींमध्ये मग्न असून सामान्य जनतेच्या मूलभूत सोयींकडे त्यांचे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासारख्या मेगा प्रोजेक्टवर हजारो कोटी रुपये खर्च करणाऱ्या सिडकोला आपल्या अखत्यारीतील रेल्वे स्थानकांचे रस्ते नीट ठेवता येत नाहीत, हा संशोधनाचा विषय आहे. रेल्वे स्थानकाच्या इमारतीत सिडकोची स्वतःची अनेक कार्यालये आणि १० टॉवर्स असतानाही, आपल्याच दारात असणारे हे खड्डे प्रशासनाला दिसत नाहीत का, असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे.

मोठमोठ्या प्रोजेक्ट्सचे प्रेझेंटेशन आणि प्रसिद्धीमध्ये मग्न असणाऱ्या सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी एकदा वातानुकूलित कार्यालयातून बाहेर पडून सर्व रेल्वे स्थानक परिसराची पाहणी करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

### केवळ डेब्रिज टाकून मलमपट्टी?

रिक्षा संघटनेने यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही सिडकोने केवळ थातूरमातूर काम केले आहे. तक्रार केल्यावर खड्ड्यांमध्ये केवळ डेब्रिज (कचरा/दगडाचा ढिगारा) टाकून खड्डे बुजवण्याचा प्रकार केला जातो, जो पावसाळ्यात किंवा काही दिवसांतच पुन्हा उघडा पडतो. यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे.

### आंदोलनाचा इशारा

पावसाळा सुरू होण्यापूर्वी जर बेलापूर रेल्वे स्थानक परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करून ते सुस्थितीत केले नाहीत, तर एकविरा माता रिक्षा चालक-मालक संघटना सिडको प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

> **एकविरा माता रिक्षा चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सजग नागरिक मंच नवी मुंबईच्या निदर्शनास रस्त्यांची दुरवस्था लक्षात आणून दिली. त्यानंतर मंचाच्या सदस्यांनी प्रत्यक्ष स्थळ भेट देऊन पाहणी केली असून सदरील ठिकाणचे रस्ते अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याचे आढळून आले आहेत.**
> **– विनय मोरे, सदस्य सजग नागरिक मंच, नवी मुंबई**

## ‘महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठाची गरज’

**मुंबई :** महिलांच्या कला, सृजनशीलता आणि कर्तृत्वाला योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक असून महिलांच्या प्रतिभेला सजगतेने ओळख देणे गरजेचे आहे, असे मत सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केले. मुंबईतील पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे आयोजित महिला कला महोत्सव २०२६च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, ज्येष्ठ गायिका पद्मश्री अश्विनी भिडे-देशपांडे, राजश्री कुलकर्णी, नृत्यांगना सोनिया परचुरे, पुढारी मल्टीमीडियाच्या संपादक मृणालिनी नानिवडेकर, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, विविध क्षेत्रातील कलाकार, साहित्यिक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर बोलताना ॲड. शेलार यांनी सांगितले की, महिला दिन महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा आणि त्यांना प्रोत्साहन देण्याचा दिवस आहे. समाजाने आपल्या घरात, कुटुंबात आणि परिसरात महिलांची प्रतिभा आणि क्षमता ओळखून त्यांना पुढे येण्यासाठी संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## महिला दिनानिमित्त योगा सत्राचे आयोजन

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या आरोग्य आणि तंदुरुस्तीबाबत जनजागृती करण्यासाठी समाजसेविका शुभांगी सुरेश खरात व महिला ग्रुप यांच्या संकल्पनेतून विशेष योग व झुंबा सत्र आयोजित करण्यात आले आहे. हा उपक्रम रविवार, दि.८ मार्च रोजी सकाळी ६ ते ७.३० या वेळेत सेक्टर २६ येथील आदिनाथ बिल्डिंगसमोरील मोकळ्या मैदानात पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांनी दैनंदिन जीवनातील धावपळीमधून काही वेळ स्वतःच्या आरोग्यासाठी

**● महिलांच्या आरोग्यासाठी विशेष उपक्रम**

द्यावा, हा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. योग हा प्राचीन भारतीय परंपरेचा महत्त्वाचा भाग असून नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शांतता, तणाव कमी होणे तसेच शरीरातील ऊर्जा वाढण्यास मदत होते. कार्यक्रमात योगासने, प्राणायाम तसेच उत्साहवर्धक झुंबा सेशन घेण्यात येणार असून महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाजसेविका शुभांगी सुरेश खरात यांनी केले आहे.

## डायलिसिस मशीनचा हस्तांतरण समारंभ

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा परिसरातील गरजू रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड पाताळगंगा यांच्या सौजन्याने सी एस आर निधीमार्फत रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांना अत्याधुनिक डायलिसिस युनिट देण्यात आले. निरामय हॉस्पिटल, रीस येथे हे मशीन रुग्णांच्या सेवेसाठी त्वरित उपलब्ध झालेले आहे.



या सीएसआर निधीमार्फत केलेल्या उपक्रमाचा हस्तांतरण समारंभ बुधवारी (दि.४) रीस येथील निरामय हॉस्पिटल येथे पार पडला. याप्रसंगी अल्काईल अमाइन्सचे सीएचआरओ उदय घाग आणि सिनियर मॅनेजर एचआर यांनी हे मशीन रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि निरामय हॉस्पिटल यांना त्वरित सेवेसाठी हस्तांतरित केले. रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष विजय पाटील, सचिव वर्तक आणि माननीय रोटरियन तसेच निरामय हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ.संजय कुरंगळे आणि त्यांचे सहकारी, मुख्य समन्वयक डॉ. पद्माकर मते, अल्काईल अमाइन्सच्या पाताळगंगा युनिटच्या एचआर अर्चना माने, सिनियर सीएसआर अधिकारी निकिता म्हात्रे, सीएसआर कन्सल्टंट रवी ओंकार आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला.

## मांडला येथे ओजस्विनी महिला पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था, अलिबाग यांच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवार दि.८ मार्च रोजी एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुरुड तालुक्यातील मांडला येथील ग्रीनकिंग रिसॉर्टच्या सभागृहात दुपारी ३ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना आगरातील ओजस्विनी महिला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षपद ज्येष्ठ पत्रकार तथा प्रख्यात साहित्यिक उमाजी केळुसकर भूषविणार आहेत. तसेच, आगरी बोलीचे वैभव सातासमुद्रापार नेणारे आणि आगरी बोलीचे बादशहा म्हणून ओळखले जाणारे चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

यावर्षी आगरातील ओजस्विनी महिला पुरस्कार देऊन रेखा अशोक मोकल (हाशिवरे), सुवर्णा राजेंद्र भगत (मोठेशहापूर) आणि मेघना सुरेश पाटील (तळाशेत) या तिघींना गौरविण्यात येणार आहे. या महिलांनी आपापल्या क्षेत्रात जिद्दीने आणि चिकाटीने कार्य करत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कर्तृत्वाचा गौरव करून त्यांना सन्मानित करणे, हे संस्थेचे कर्तव्य असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. केवळ पुरस्कारांपुरता मर्यादित न राहता, या कार्यक्रमात ‘महिला जगत’ या विषयावर आधारित

**● जागतिक महिला दिनी साहित्याचा जागर**

एका विशेष निमंत्रितांच्या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये नामवंत कवी आणि कवयित्री सहभागी होऊन स्त्री जीवनाचे विविध पैलू, त्यांचे संघर्ष आणि यशाच्या गाथा कवितांच्या माध्यमातून मांडतील. शब्दांच्या या मैफिलीमुळे उपस्थितांना एक वैचारिक आणि सांस्कृतिक मेजवानी मिळणार आहे.

## आर्या नारंगीकरला नृत्यांगना पुरस्कार

**चिरनेर :** चिरनेर गावातील टीव्ही स्टार नृत्यांगना आर्या मंगेश नारंगीकर हिला नवी मुंबई कुंभार समाजाच्या वतीने नृत्यांगना रत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले असून तिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. चिरनेर येथील मंगेश नारंगीकर यांची ही सुकन्या असून, तिचा नृत्यप्रवास खडतर असला तरी तो अत्यंत कौतुकास्पद आहे. नृत्य ही तिला मिळालेली दैवी देणगी आहे. लावणी सम्राज्ञी म्हणून तिची ओळख आहे.

## ‘लोकल रेल्वेतील गर्दीवर उपाययोजना करणार’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकल रेल्वेतील गर्दीवर उपाययोजनासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याशी चर्चा करून ठोस उपाययोजना करणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत सांगितले. डोंबिवलीवरून कळवा येथे बारावीचा पहिलाच पेपर देण्यासाठी जात असताना मुंब्रा-कळवा स्टेशन दरम्यान गर्दीमुळे लोकलमधून पडून सोहम कटारे या विद्यार्थ्याचा १० फेब्रुवारी रोजी मृत्यू झाल्याची घटना घडली. अशा घटनांवर नियंत्रणासाठी उपाययोजनाबाबत लक्षवेधी विधानसभा सदस्य काशिनाथ दाते यांनी विधानसभेत मांडली. यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, रेल्वेतील अपघात रोखण्यासाठी बंद दरवाजाच्या रेल्वे सुरू करण्याबाबत उपाययोजना करण्यात येणार आहेत. मेट्रोंची संख्या वाढवणे, जास्तीत जास्त बसेस सुरू करून रेल्वेवरील गर्दीचा ताण कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. महिला व दिव्यांगासाठी राखीव डब्या प्रमाणेच परीक्षा काळात विद्यार्थ्यांना प्रवासात प्राधान्य देण्याबाबतही विचार करू, असेही परिवहन मंत्री यांनी सांगितले.

## गुलाब तरे यांचे निधन

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील वाळवडे गावच्या गुलाब गंगाराम तरे (७६) यांचे बुधवार दि.२५ फेब्रुवारी रोजी निधन झाले. लग्न सराईत उत्कृष्ट धवला गाणारी गायिका हरवल्याची खंत सर्वांना मनाला चटका लागून गेल्याची सूर जनसामान्यात दिसून येत आहे. त्यांच्या पार्थिवावर वाळवडे गावाच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, एक मुली असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया शुक्रवार दि.६ मार्च रोजी श्री क्षेत्र कनकेश्वर येथे, तर तेरावे सोमवार दि.९ मार्च रोजी राहत्या घरी वाळवडे येथे होणार आहे.

## शिवज्योत यात्रेद्वारे शिवरायांना मुजरा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

श्री शिवप्रेमी मित्रमंडळ खारआंबोली वतीने शिवजयंती सोहळ्यानिमित्त रायगड किल्ला ते मुरूड खारआंबोलीपर्यंत शिवज्योत भव्य मशाल पायी यात्रा दिमाखात काढण्यात आली. यावेळी शिवप्रेमींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता.



खारअंबोली मुरूड श्री शिवप्रेमी मित्रमंडळ अध्यक्ष चिंतामणी बेडेकर यांच्या हस्ते रायगड किल्ल्यावरील जगदीश्वर मंदिरात शिव शंकराची पुजा करुन शिवज्योत प्रज्वलीत करून गुरुवारी रात्री १२ वाजता भव्य मशाल पायी यांत्रेला सुरुवात करण्यात आली. या पायी यात्रेचे शुक्रवारी (दि.६) सकाळी मुरूड शहरात आगमन झाले. यावेळी जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, धर्मवीर संभाजी महाराज की जय, अशा जयघोषाने परिसर दुमदुमला. यावेळी शिवज्योतीचे पद्मदुर्ग ढोल ताशा ध्वज पथक मुरुडच्या वतीने शिवज्योत यात्रेचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर बाजारपेठ ते मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयापर्यंत पायी भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांनी छ.शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करण्यात आला.

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश | प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना

# चालक-वाहकांची मद्यपान तपासणी सक्तीची

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला २५ जानेवारी २०२६ रोजी अचानक भेट दिली असता तेथे काही धक्कादायक प्रकार आढळून आला. या प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत, यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते. त्याअनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत, यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत. हा चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. तसेच वाहकांचीही ड्यूटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. चालक व वाहकांची मद्यपान तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. चालकाने नोंद केल्यानंतर त्याची पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करून योग्य नोंद घेतल्यानंतरच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे.

> **प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी प्रशासनाने मद्यपानासंदर्भात कठोर भूमिका घेतली आहे. या उपाययोजनांमुळे बससेवा अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध होईल.**
> **– परिवहन मंत्री प्रताप सरनाईक**

# निवडक

## वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा



**रसायनी :** संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानचा रसायनी प्रखंडाचा २०२५-२६ या वर्षाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा बुधवारी (दि.४) दिमाखात पार पडला. नैतिक शिक्षण योजनेअंतर्गत चौथी ते आठवीच्या वर्गाच्या परीक्षा घेतल्या जातात; त्यात प्रत्येक शाळेच्या प्रत्येक वर्गात पहिल्या आलेल्या मुलाला ट्रॉफी देऊन सन्मानित केले जाते. रसायनी परिसरातल्या १२ शाळा या योजनेत सहभागी होत्या. त्यातील एकूण १७०० विद्यार्थ्यांनी या परीक्षेत भाग घेतला होता. त्यातील ४२ मुलांना प्रथम पारितोषिक मिळाले. इतर पास झालेल्या मुलांना सर्टिफिकेट्स् नंतर पाठवण्यात येणार आहेत. अल्कलीच्या अधिकारी अर्चना माने प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित होत्या. तसेच मॅथ्यू, तुषार शिंदे, रवी ओंकार, निकिता म्हात्रे हे कंपनीचे पदाधिकारी खास आमंत्रित होते. संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान या संस्थेचे संस्थापक व मानद विश्वस्त मोहनजी सालेकर, प्रांत सहसंयोजिका शीतल निकम, नवी मुंबई संयोजिका प्रणाली खत्री, नवी मुंबईतील मुखर्जी व केतकी गाला हे मान्यवरही संस्थेतर्फे उपस्थित होते. यावेळी कांब्यातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी अभिनय गीत सादर केले. मुलांनी शिवाजी महाराजांवर प्रेरणादायी भाषण केले. तर संजीवनी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर केले. नंतर वर्षभरात घेतलेल्या स्पर्धांची बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

## महागणपतीच्या दर्शनाला भाविकांची गर्दी




**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात शुक्रवारी (दि.६) संकष्टी चतुर्थी निमित्ताने मंदिराची फुलांच्या माळांनी सजावट करण्यात आली होती. यावेळी भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पेशवेकालीन मंदिरात प्राचीन महागणपतीची मूर्ती विराजमान आहे. श्रींचे दर्शन घेण्यासाठी गणेश भक्तांची पहाटेपासूनच सुरुवात झाली होती. संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने हार, गावठी भाज्या, वाल चवळीच्या शेंगा, स्थानिक कुंभारांनी बनविलेली मातीची भांडी तसेच अन्य पदार्थांच्या विक्रीला ग्राहकांनी पसंती दर्शविल्याचे निदर्शनास आले. चिरनेर परिसरातील अनेक रहिवाशांना दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थी निमित्ताने रोजगार मिळत आहे. नेहमीप्रमाणे उरण, पनवेल, पेण, नवी मुंबई येथील भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. तर दिवसभर मंदिरात भजनांचा सूर ऐकायला मिळाला असल्याचे गणपती देवस्थानचे कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी सांगितले.

## चिरनेरमध्ये शिवछत्रपतींचा जयजयकार



**चिरनेर :** श्री छत्रपती शिवाजी महाराजच्या जयंती निमित्ताने उरण तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा चिंचपाडा या ग्रामस्थ मंडळाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने गुरुवारी (दि.५) सायंकाळी ६:३० वाजता अध्यात्मिक पौर्णिमा मंडळाच्या वतीने हरिपाठ सादर करण्यात आला. रात्री आठ वाजता महाप्रसाद, तर शिवजयंतीच्या मुख्य दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिषेक सोहळा पार पडला. यावेळी कीर्तनकार शिवचरित्र व्याख्याते हभप अमित महाराज म्हात्रे यांचे कीर्तन झाले. दुपारी १२ वाजता शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी गायिका प्रांजल पाटील हिने शिव जन्माचे पाळणा गीत सादर केले. सायंकाळी चार वाजता छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य पालखी मिरवणूक संपूर्ण चिरनेर गावातून काढण्यात आली. रात्री आठ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तर शिव सोहळ्यानिमित्ताने शनिवारी (दि.७) अतिश पाटील सुशांत पाटील यांच्या निवेदनातून ‘हसू या, खेळू या, पैठणी जिंकू या’ हा महिलांसाठी कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.

## उर्दू शाळेत घुमला मराठी भाषेचा आवाज




**माणगाव :** भाषा, धर्म, जात आणि पंथ वेगवेगळे असले तरी भारताची ओळख एकात्मतेत आहे, याचा जिवंत अनुभव माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील ए.के.आय.उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे पाहायला मिळाला. येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उर्दू शाळेच्या प्रांगणात मराठी भाषेचा घुमणारा आवाज ऐकून उपस्थितांच्या मनात अभिमान आणि आपुलकीची भावना निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून ‘भाषा वेगळी असली तरी संस्कृती आणि देश एकच’ असा हृदयस्पर्शी संदेश दिला. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या निमित्ताने शाळेत मराठी साहित्य, कविता, नाटिका आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे मराठी भाषेचे सौंदर्य आणि महत्त्व विद्यार्थ्यांनी अनुभवले. कार्यक्रमात शिक्षिका प्रतिभा मोरे यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जीवनकार्याची माहिती देत त्यांच्या साहित्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. विद्यार्थिनींनी मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी प्रभावी भाषणे सादर केली. तसेच पाठ्यपुस्तकातील कविता तालबद्ध आणि हालचालींसह सादर करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व आणि मोबाईलच्या अतिरेकी वापराचे दुष्परिणाम यावर आधारित लघुनाटिका सादर करून उपस्थितांना सामाजिक संदेश दिला. कार्यक्रमातील सर्वाधिक आकर्षण ठरले ते ‘महाराष्ट्र गीत’चे सामूहिक सादरीकरण आणि ‘नारींचे महत्त्व’ अधोरेखित करणारी विविध पारंपरिक वेशभूषा. या सादरीकरणातून विद्यार्थिनींनी स्त्रीशक्तीचा सन्मान आणि संस्कृतीची जपणूक याचा प्रभावी संदेश दिला. स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना मराठी विभागाच्या वतीने बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

## अलिबाग नगर परिषद
## ता.अलिबाग जि.रायगड

ई-निविदा सुचना क्रमांक (०९) सन २०२५-२६ (पहिली वेळ)

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे कडुन बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-२ नमुन्यातील निविदा पहिल्यांदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत.

टिप:- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

दिनांक : ०९/०३/२०२६

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि.रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत आणि त्या मिळकतीमध्ये नोंदणीकृत दस्त अलब ३७९४/२०११ अन्वये वेश्वी सर्व्हे क्र.८१, हिस्सा क्र.२/ब/२ क्षेत्र ००-५९-०० हे.आर. पैकी ००-०२-५० हे.आर. इतक्या क्षेत्रामधून ३० फूट रूंदीचा निरंतर वहिवाटीच्या प्राप्त झालेल्या हक्कासह खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत त्यांचे निर्वेध मालकीची आणि ताबा वहिवाटीची असल्याचा भरवसा विद्यमान मालक संदीप कमळाकर गोठीवरेकर यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | उपविभाग क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ८१ | २/क/२ | ००-२४-४० | १.२० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा विकसन करारनामा पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक : ०६/०३/२०२६

**ॲड.रविंद्र वि.ओक**
"गुरूकृपा"
अलिबाग अर्बन बँकेशेजारी
महर्षी कर्वे रोड, मु.पो.
ता.अलिबाग, जि.रायगड

## निविदा सुचना
**ग्रामपंचायत आपटा**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत आपटा हद्दीत अंगणवाडी क्र.४ ला सीलिंग करणे. | ५८७७८/- | ०९/०३/२०२६ | १६/०३/२०२६ | ग्रामनिधी |
| २) | ग्रामपंचायत आपटा हद्दीत डिंपल मोहल्ला येथे रस्ता करणे. | ९९४३०/- | ०९/०३/२०२६ | १६/०३/२०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ३) | समद मुल्ला ते मजीद मुल्ला घरापर्यंत रस्ता बनविणे. | १,५०,०००/- | ०९/०३/२०२६ | १६/०३/२०२६ | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे**
१) वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकिटात मा. प्रशासक ग्रामपंचायत आपटा यांचे नाव दिनांक १६/०३/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२) ठेकेदार अधिकृत व अनुभवी असावा व अर्जासोबत पॅन व जीएसटी नंबर असणे आवश्यक आहे.
३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १७/०३/२०२६ रोजी व इतर सोयीच्या दिवशी मा.प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी यांचे समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.
५) उत्तम साहित्य दर्जाचे आयएआय/आयएसओ मार्क प्रमाणित असावे, गॅरंटी व वॉरंटी तपशील नमूद करावा.

सही /-
**(श्री.कैलास राया मोरे)**
**ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत आपटा**

सही /-
**(सौ.वंदना शरद वाघे)**
**प्रशासक, ग्रामपंचायत आपटा**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे टेंभोर्डे, ता.मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) काजल सचिन जैन, २) खिमराज जयंतीलाल जैन, ३) संगीता खिमराज जैन, ४) सचिन जयंतीलाल जैन यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे टेंभोर्डे, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| टेंभोर्डे ता.मुरूड | ६४ | क्षेत्र १-१५-६० पो.ख. ०-०४-३० एकुण क्षेत्र १-१९-९० | १५.३५ |

दिनांक : ०६/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## महावितरण — ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-११४, टी- ११५, टी-११६, टी-११७, टी-११८, टी-११९, टी- १२०, टी-१२१, टी-१२२, टी-१२३ आणि टी-१२४ (२०२५-२६) अशा एकुण **अकरा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०७.०३.२०२६ पासून ते दि. १५.०३.२०२६** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १६.०३.२०२६** ला **दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल. **(सही)**

**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिन, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर जि. रायगड येथील शेत जमीन मिळकती:-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. जगदिश परबत गोठी | ६१ | १/ब | ०-२७-३० | ० | ८० |
| | ६१ | २/ब | ०-०३-५० | ० | २५ |
| | ६४ | ३ | ०-०४-०० | ० | ७० |

येणप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक ०७.०३.२०२६

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
**कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड.४१०२०१**
**मो.नं. ९०२८९८२२७७**
**ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.योगेश सचदेव, रा. ए १८ आरबीआय एमप्लोयी आशिष लोखंडवाला कॉम्प्लेक्स अंधेरी वेस्ट मुंबई ४०००५३ यांचेकडून कायम खरेदीकरणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - आतोणे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|
| ३७ | १.०७.२० | १८.७२ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०७/०३/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर २४२/२ ब, क्षेत्र ०-२३-५० हे. आर, पो. ख. ०-०२-५० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२६-०० हे. आर., आकार ५.०६ रू. तसेच या मिळकतीवरील ग्रामपंचायत कोप्रोली, घर नं. ६३३ क्षेत्र १०० चौ. फुट ही घर मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. स्मिता हेमंत मोडक रा. प्लॉट नं. ४, मोहिनी गुलमोहर को.ऑप.हौ.सो.लि. प्रकाश कोटणीस क्रॉस रोड, माहिम ४०००१६ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०६/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत तिचे मालक श्री.भूषण एकनाथ ओगले आधार क्र.९१५८४८०२९४२५ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे - कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७८ | १८ | ३११-०० | ३१-१० |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसम, कंपनी, भागीदारी संस्था अथवा अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०३/२०२६

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

## अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ३२/२०२६

श्री. संजय अनंत म्हात्रे वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेंत येते की, अर्जदार क्र. १ श्री. संजय अनंत म्हात्रे, अर्जदार क्र. २ श्री उदय अनंत म्हात्रे आणि अर्जदार क्र. ३ सौ. अश्विनी अजय गायकवाड यांनी कै. अनिता अनंत म्हात्रे यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै. अनिता अनंत म्हात्रे यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार क्र. १ ते ३ यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी कै. अनिता अनंत म्हात्रे यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयांत दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक ०९/०४/२०२६ रोजी या जाहीर नोटीसला अनुसरुन अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार याचे लाभात वारस दाखल जारी करणेची पुढील कार्यवाही करेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

अलिबाग — कोर्टाचा शिक्का — अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
वरिष्ठ स्तर, अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे रासळ, ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-रासळ, ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि. नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. विलास वसंत भिडे | ७९/७ | १-०१-०० | ०-२५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी-विक्रीबाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-पाली-सुधागड
दिनांक : ०६/०३/२०२६

सही/-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड,जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| ४०/२ | एकूण क्षेत्र ०-३१-०० हे. आर | ०.२८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आम चे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०३/२०२६

**ॲड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो कामार्ली, ता. पेण, जि. रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|
| १३१/१३६ | एकूण क्षेत्र ४-०४-३० हे. आर या पैकी १) मीनाक्षी प्रशांत जोशी व प्रतीक प्रशांत जोशी याचे खाता नं. १३४९ ज्याचे क्षेत्र ०-९५-०० हे. आर २) हितेश प्रदीप वीर व हर्षल प्रदीप वीर याचे खाता नं. १३५४ ज्याचे क्षेत्र ०-४०-०० हे. आर ३) कुंदा रमेश पाटील याचे खाता नं. १३६८ ज्याचे क्षेत्र ०-०७-४४ हे. आर ४) स्मिता सुधीर अंबुरे याचे खाता नं. १३६९ ज्याचे क्षेत्र ०-१५-०० हे.आर |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०३/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो कामार्ली, ता. पेण, जि. रायगड पिन नं.४०२१०७

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालकाने खालील नमुद मिळकत आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

**मौजे हेदवली, ता. कर्जत, जि रायगड येथील मिळकत**

| मालकांची नावे | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र. हे. आर. पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १) श्री. मारुती रामा भालेराव २) श्री. संतोष सखाराम जाधव ३) श्री. विलास सखाराम जाधव ४) मीना विवेकानंद गोडबोले | २७/२ | ०-३४-०० यापैकी ३० गुंठे क्षेत्र | ०-३१ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सुध्दा.
ता. ०७ मार्च २०२६

खरेदीदारातर्फे
**ॲड. स्नेहल बंडु तुरडे**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस : गाळा नं.९, विहंग अपार्टमेंट
कोतवाल नगर कर्जत, ता. कर्जत जि रायगड
मो.नं.७६२०२२३९५९

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. अशोक नारायण पाटील, श्री. विजय नारायण पाटील, सौ. कल्याणी किशोर पाटील, श्री. निखिल नितीन म्हात्रे, श्रीमती पूजा नितीन म्हात्रे, राहणार चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकी हक्काची असून, सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-९०-०० (हे. आर) शेत जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. अशोक नारायण पाटील, श्री. विजय नारायण पाटील, सौ. कल्याणी किशोर पाटील, श्री. निखिल नितीन म्हात्रे, श्रीमती पुजा नितीन म्हात्रे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| नारंगी, ता. अलिबाग | ४८/१ | १-१४-०० ०-१५-२० पो.ख. १-२९-२० एकूण | १७-८० |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-९०-०० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०६/०३/२०२६

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७
- **कर्जतमधील एका नामांकित** सोसायटीतील २ bhk बंगला विकणे आहे. एजंट क्षमस्व संपर्क- ९६०४१२३५५४/+९८२२४९९३२१
- **सुवर्णसंधी** (WORK FROM HOME) **वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा** इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घरातून मोबाईलवरून किंवा ऑफिसमधून काम करा. Income- 12000 To 15000 Age 18+ Contact Number- 7744956912
- **वॉन्टेड अलिबागेतील वृद्ध अपंग जोडप्यास** रात्री साडेदहा ते पहाटे साडेचारपर्यंत पेशंटला मदतनीस म्हणून सावध झोप असणारी महिला वृद्ध मदतनीस पगार रोजच्या रोज आठशे रूपये. ८५३०३०९७६५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## RASHTRIYA AAROGYA NYAYASANSHODHAN SANSTHA
## RAIGAD INSTITUTE OF NURSING EDUCATION

**A/P-Murud-Janjira, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad, Maharashtra**
**(Affiliated to Maharashtra University of Health Science, Nashik)**
**Institute Code: 09416** **MUHS Code: 151146**
**Contact No.: 9028658792 / 9920261017/ 9819071198 Email: raigadine@gmail.com**

### WANTED

**Applications are invited for filling up the following posts in the above said College /Institute**

| Sr. No. | Designation | Subject | Total Posts | SC | ST | VJNT | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN | Person with Disabilities |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Professor cum Principal | Any Speciality | 01 | - | - | - | - | - | - | - | 01 | - |
| 2. | Professor Cum Vice Principal | Any Speciality | 01 | - | - | - | - | - | - | - | 01 | - |
| 3. | Tutor/Clinical Instructor | Msc Nursing/ B.Sc. Nursing | 04 | 00 | 00 | 00 | - | 01 | 00 | 00 | 03 | - |

**Note:**
1. Nursing teacher shall be registered under the State Nursing Registration Act.
2. Qualification and Experience as per MUHS Nashik. Web: https://www.muhs.ac.in
3.Last date of submission of application on or before 14/03/2026

**Secretary**
Rashtriya Aarogya Nyaya Sanshodhan Sanstha

For More Details: www.raigadine.co.in / 9028658792/ 9920261017 / 9819071198




## राशीभविष्य

- **मेष** : भागीदारीत फायदा होईल. विचारपूर्वक निर्णय घ्यावे. अर्थप्राप्ती वाढेल.
- **वृषभ** : नोकरीत अधिकारी नाराज राहतील. कामास प्राधान्य द्यावं. अनावश्यक खर्च टाळा.
- **मिथुन** : हितशत्रूपासून सावध रहा. व्यसनांवर नियंत्रण ठेवा. दगदग टाळा.
- **कर्क** : कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागेल. अपेक्षित घटना घडतील. सुखस्वास्थ्य लाभेल.
- **सिंह** : विनम्र होऊन कार्य केलं तर यश मिळेल. शैक्षणिक प्रगती घडेल. कलागुणांचा विकास.
- **कन्या** : मानसन्मान लाभेल. प्रिय व्यक्तींची भेट होईल. व्यवसायात अपेक्षित प्रगती होईल.
- **तूळ** : कौटुंबिक अडचणी दूर होतील. नोकरीत पदोन्नतीचा योग आहे. सन्मान वाढेल.
- **वृश्चिक** : नोकरीत इच्छेप्रमाणे घटना घडतील. कुटुंबात आनंददायी वातावरण राहील. ओळखी वाढतील.
- **धनु** : व्यापारात प्रगती साधता येईल. प्रभावशाली व्यक्तींच्या भेटी होतील. राजकारणापासून दूर रहा.
- **मकर** : आपली कार्यक्षमता वाढणार आहे. स्थावर वाहनसौख्य लाभेल. संततीची काळजी घ्यावी.
- **कुंभ** : कौटुंबिक प्रश्न दूर होतील. व्यवसायात प्रगती साधता येईल. घाईने निर्णय नकोत.
- **मीन** : कार्यक्षेत्रातील अडचणी कमी होतील. नव्या योजन्या विचारपूर्वक स्वीकाराव्या. अर्थप्राप्ती वाढेल.

स्टाईल स्टेटमेंट

## मेकओव्हर उन्हाळ्यातला

✻ टाय डाय टी शर्ट हा २०१९ चा सर्वात कूल ट्रेंड आहे. एकदम हटके असलेले हे टी शर्ट तुमचा लूक एका क्षणात बदलून टाकतील. हे टी शर्ट वेगवेगळ्या रंगांमध्ये उपलब्ध आहेत. ही फॅशन नक्कीच भाव खाऊन जाईल.

✻ मधल्या काळात स्ट्रॉ बॅग्जना बरीच लोकप्रियता मिळाली. डिझायनर आणि ट्रेंडी लूक देणाऱ्या या बॅग्ज तुमच्याकडे असायला हव्यात. बास्केटच्या आकाराच्या बॅग्जपासून स्लिंग बॅगपर्यंत यात भरपूर वैविध्य पहायला मिळतं.

✻ न्यूट्रल रंग हा सध्याचा हॉट ट्रेंड आहे. लेअरिंग करण्यासाठी तुम्ही या रंगांचे कपडे कॅरी करू शकता. सुरूवात करायची असेल तर बेज रंगाचं जॅकेट घ्या. उन्हाळ्यात असे सौम्य न्यूट्रल रंग थंडावा देतील.

## ७ मार्च

दिनविशेष

**२०१३** : पोलीस उपअधीक्षक झिया उल हक यांच्या हत्येप्रकरणी उत्तर प्रदेशचे मंत्री राजाभैया यांच्याविरुद्ध अन्वेषण विभागाकडून गुन्हा दाखल.

**२०१४** : अटारी आंतरराष्ट्रीय रेल्वे स्थानकात सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोठा शस्त्रसाठा जप्त केला.

**२०१६** : विजय मल्ल्यावर मनी लॉंडरिंगप्रकरणी गुन्हा दाखल.

**२०१८** : त्रिपुरामध्ये रशियन क्रांतिकारक लेनिन यांचे पुतळे पाडल्यानंतर पुतळा विटंबनेचं लोण देशाच्या अन्य भागांमध्ये पसरलं.

व्हॉट्स न्यू?

## तंत्रज्ञानाच्या नव्या जगात

स्मार्टफोन्सच्या भविष्यातल्या अनोख्या जगात फेरफटका मारू या.

✻ १८ हजार एमएएच क्षमतेची बॅटरी स्मार्टफोनमध्ये सामावली तर काय होईल? 'एनर्जायजर' नावाच्या कंपनीने हे करून दाखवलं आहे. 'पॉवर मॅक्स पी १८ के पॉप' हा जगातला सर्वात जाड आणि वजनदार अँड्रॉइड स्मार्टफोन ठरला. प्रचंड बॅटरी क्षमतेमुळे १८ के पॉपची बॅटरी संपता संपणार नाही. एकदा चार्ज केल्यानंतर या फोनवर २०० तास व्हिडिओ बघता येतील. हा फोन चार्ज व्हायला आठ तास लागतील.

✻ 'क्लाउडमाईंडस' नावाच्या कंपनीने 'एक्सआय' नावाचा स्मार्टफोन सादर केला आहे. यातून लेसर किरणं बाहेर पडतील. ही किरणं शरीरातल्या रासायनिक प्रक्रियेची माहिती तुम्हाला देईल.

✻ 'हायसेन्स ए ६' नावाच्या स्मार्टफोनमध्ये दोन प्रकारचे डिस्प्ले असतील. 'ओएलईडी' आणि 'ई इंक' प्रकारच्या डिस्प्लेमुळे हा फोन वेगळा ठरणार आहे. वाचनाची आवड असलेल्यांसाठी 'ई इंक डिस्प्ले' सर्वात चांगला मानला जातो. 'ई इंक' स्क्रीनला खूप कमी बॅटरी लागते.

आरोग्यमंत्र

## 'ब्रेन फॉग' घालवण्यासाठी...

'ब्रेन फॉग' हा शब्द कोरोना काळापासून वापरला जाऊ लागला आहे. आरोग्य तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, ज्या लोकांना या विषाणूची लागण झाली आहे, त्यांना सतत विसरण्याचा त्रास होत आहे. हा कोरोनाचा एक दुष्परिणामच आहे. आता याला सामोरे जाण्यासाठी लोक विचित्र पद्धतीचा अवलंब करत आहेत. ते विजेचे झटके घेत आहेत.



'ब्रेन फॉग' म्हणजे एक वैद्यकीय समस्या नाही तर दुष्परिणाम आहे. 'ब्रेन फॉग' स्थितीत, व्यक्तीच्या वर्तनात झपाट्याने बदल होतो. अशा लोकांमध्ये थकवा, चिडचिड, नैराश्य, डोकेदुखी, कोणत्याही कामात रस नसणे, झोप न लागणे, छोट्या-छोट्या गोष्टी विसरणे यासारख्या समस्या नेहमीच दिसतात. काही लोक 'ब्रेन फॉग'पासून मुक्त होण्यासाठी घरातील 'ब्रेन स्टिम्युलेशन' तंत्राचा अवलंब करत आहेत. यामध्ये घरातच शरीराला विजेचे झटके दिले जातात. त्यामुळे मेंदू आधीसारखा होतो. यंत्राद्वारे डोक्याला इलेक्ट्रोड जोडलेले असतात. याद्वारे हळूहळू मेंदूपर्यंत विजेचा धक्का पोहोचतो. शास्त्रज्ञांच्या मते, त्याचे विज्ञान अद्याप प्राथमिक अवस्थेत आहे. २०१० पासून मेंदूला उत्तेजना देण्यासाठी ही पद्धती वापरली जात आहे. 'नेचर न्यूरोसायन्स जर्नल'मध्येही याविषयीचा एक अभ्यास प्रकाशित झाला होता. यामध्ये ६५ ते ८८ वयोगटातील १५० जणांचा समावेश होता. त्यांच्यामध्ये एक प्रकारची 'न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर' होती. त्यांना आठवड्यातील चार दिवस २० मिनिटे झटके देण्यात आले. त्याचे चांगले परिणाम पहायला मिळाले.

## पंचांग

**शनिवार, ७ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
फाल्गुन कृ. ४ , चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : चित्रा, योग : ध्रुव,
सूर्योदय ६.५६, सूर्यास्त ६.४४

## फॉरवर्ड्स

**कल तलक़ हमसें ज़ो ख़ैरात लिया करतें थें...**

**आज़ वों लोग़ हमारें दाम लगानें निकलें हैं...!**

## स्टायलिंग फंडे

✻ सँडल्स आणि सॉक्स अजिबात कॅरी करू नका. सॉक्समुळे पायांना घाम आल्याने दुर्गंधी येऊ शकते. त्यामुळे सगळीकडे मंद सुगंध दरवळत असताना, प्रेमाचं गोडगुलाबी वातावरण असताना असले प्रयोग अजिबात करू नका.

✻ लोगो किंवा स्लोगन्सवाल्या टीशर्टचा ट्रेंड असला तरी डिनर डेटला असा टी शर्ट घालू नका. एखाद्यावर स्वत:ची छाप पाडताना ही फॅशन उपयोगी पडत नाही. एखाद्या ब्रँडचं नाव किंवा स्लोगन तुमची ओळख ठरणार नाही याची काळजी घ्या.

युवा विश्व

## डेटिंगचा हेल्दी मंत्रा



डेटिंगचे ठराविक फंडे आजमावले जातात. छानशा रेस्टॉरंट किंवा कॅफेमध्ये बसायचं, गप्पा मारायच्या सोबत आवडीचे पदार्थ खायचे. पिझ्झा, फ्रँकी, फ्राईज, पास्ता असं बरंच काही मागवायचं. शेवटी डेझर्ट किंवा आईसक्रीम हवं. अशी खादाडी केली की वजन वाढणारच. पण तुम्ही आणि जोडीदार हेल्थ कॉन्शियस असल्यावर काय करायचं? घाबरू नका. हेल्दी डेटींगच्या या संकल्पना जोडीदाराला नक्कीच आवडतील.

✻ एखाद्या बागेत किंवा रम्य ठिकाणी संध्याकाळी वॉकला जा. एकमेकांसोबत घालवलेला हा वेळ नातं जास्त घट्ट करेल. हे निवांत क्षण रिफ्रेशिंग अनुभव देतील. चालल्याने कॅलरी खर्च होतील. मुख्य म्हणजे काय मागवायचं यावरून वाद, रूसवेफुगवे होणार नाहीत. ✻ किराणा सामानाच्या शॉपिंगला जा. तंदुरूस्ती राखायची तर आरोग्यदायी पदार्थ खायला हवेत. या कामी जोडीदाराची मदत करा. इन्स्टंट नूडल्स, सूप्सऐवजी हेल्दी ऑप्शन्स सुचवा. ✻ घराबाहेर पडून व्यायाम केल्याने नवी ऊर्जा मिळते. त्यातच आवडती व्यक्ती सोबत असेल तर मस्त वाटतं. मग काय, जीम जॉईन करा. झुंबा क्लास, योगा असे बरेच पर्याय आहेत. स्वस्तात मस्त म्हणजे जॉगिंगला जा.

खेचाखेची

## १५ चे २० झाले!

तो पुण्यात नवा होता. त्याच्या ठरलेल्या रस्त्यावर एक आजीबाई वडापावाची गाडी चालवायच्या. त्यांना पाहून त्याला आईची आठवण यायची. तो रोज त्यांच्यासमोर १५ रुपये सुटे ठेवायचा आणि जंक फूड खायचं नसल्याने वडापाव न घेताच निघून जायचा. असं महिनाभर चाललं.

एक दिवस त्याने १५ रुपये ठेवले आणि पुढे निघायच्या आत त्या आजीने त्याचा हात धरून त्याला थांबवलं. आजीबाई म्हणाल्या, गेल्या आठवड्यापासूनच वडापावाची किंमत २० रुपये झाली आहे!!!

## वेगळं काही

जगभरात सगळीकडेच गुन्हेगारीचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. अनेक देशांमध्ये तर गुन्हेगार जास्त आणि तुरुंगांमध्ये जागा कमी अशी परिस्थिती पहायला मिळते. त्यामुळे तुरूंग बंद करण्याची वेळ येणं म्हणजे आश्चर्यच. युरोपमधल्या एका देशात एकही गुन्हेगार किंवा कैदी उरलेला नाही. त्यामुळे इथले तुरुंग बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पश्चिम युरोपमध्ये वसलेल्या या देशात गुन्हेगारीचं प्रमाण खूप खाली आलं आहे. आता असा कोणता बरं देश असेल, हा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. नेदरलँडमध्ये गुन्हेगारीचं प्रमाण वाढलं आहे. इथे एकही कैदी उरलेला नाही. मात्र तुरुंग बंद झाल्याने तब्बल दोन हजार लोकांवर बेरोजगारीची वेळ येणार आहे.
**(क्रमश:)**

ट्रेंडी

## लग्नात मिरवायचं तर...



लग्नसमारंभात नेसण्यासाठी मोठे काठ आणि सुंदर रंगांच्या नऊवारी पैठणीला सध्या मोठी मागणी आहे. पैठणीप्रमाणेच इरकली साडीलाही महत्त्व आहे. चमकदार घागऱ्यांनीही स्थान मिळवलं आहे. टिकल्या आणि काचा लावलेले सुंदर डिझाईन्सचे घागरे जड असले तरी खूप सुंदर दिसतात. विशेषतः लग्न सोडून एखाद्या इतर विधीच्या वेळी ते वापरले जातात. रिसेप्शनसाठी शक्यतो बनारसी शालूला आजही पसंती दिली जात आहे. या आकर्षक पेहरावावर तितकेच आकर्षक दागिने वापरले जातात. सहसा साखरपुडा, संगीत यांसाठी महागडे, गळ्यावर भरगच्च दिसणारे मोती अथवा खडे बसवलेले सेट वापरण्याची पद्धत आहे. लग्नात मात्र पारंपरिक दागिन्यांना मागणी आहे. नवरी आणि विवाहित स्त्रिया बांगड्या, पाटल्या, तोडे, गोठ वापरतात. भरदार वाकीही वापरली जात आहे. पूर्वीच्या राणीहार, बकुळहार, चपलाहार, चिंचपेटीलाही पुन्हा मानाचं स्थान प्राप्त झालं आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सगळे दागिने एक ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांतही मिळतात. त्यामुळे तुम्ही कपाळावर चंद्रकोर लावून पूर्वीच्या महाराण्यांप्रमाणे लग्नात मिरवू शकता.

## सुडोकू ७४


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६ | ३ | ५ | ७ | | | | |
| १ | | ७ | | | २ | ३ | | ९ |
| | | | ९ | | | | | |
| | | | | १ | | | २ | |
| २ | | ८ | ६ | | ३ | १ | | ७ |
| | १ | | | ५ | | | | |
| | | | | | ५ | | | |
| ८ | | ४ | १ | | | २ | | ५ |
| | | | | ८ | ६ | ७ | ३ | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७३चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | १ | ५ | ७ | ९ | ४ | ८ | ६ |
| ७ | ६ | ८ | ४ | २ | ३ | १ | ५ | ९ |
| ४ | ९ | ५ | १ | ६ | ८ | ३ | ७ | २ |
| ९ | ४ | ३ | ७ | १ | ६ | ५ | २ | ८ |
| ६ | १ | २ | ८ | ३ | ५ | ७ | ९ | ४ |
| ८ | ५ | ७ | ९ | ४ | २ | ६ | ३ | १ |
| १ | २ | ६ | ३ | ९ | ७ | ८ | ४ | ५ |
| ३ | ८ | ४ | २ | ५ | १ | ९ | ६ | ७ |
| ५ | ७ | ९ | ६ | ८ | ४ | २ | १ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक ७४



**आडवे शब्द :-**
१) सुगंधी लाकूड
४) कमलनयन
८) दक्षतेचा इशारा
११) अनुमती
१३) बारा वर्षाचा काळ
१४) वस्त्र, कापड
१६) नंतर
१७)केव्हा (ग्रा)
१८) झकास
१९) मद्य
२०) उत्सव
३१) झोपेचे खोबरे
२३) म्हातारपण
२४) अंड्यातील पिवळा गर
२८)जास्वंद
२९) ताडाच्या झाडाचा शिळा रस
३०) वैर, भांडण
३१) बडबड
३३) मज्जाव
३५) मसाल्यातील एक टोकदार पदार्थ
३७) परमेश्वर
३८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
३९) खंदक
४०) केर
४३) खटमल
४५) नाका, रस्ते एकमेकांना छेदतात ती जागा
४६) जन्ममृत्यू
४९) चविष्ट
५२) यथाशास्त्र
५३) कर्णेंद्रिय
५४) साखरेचा रस
५५) रामदासस्वामींचा एक ग्रंथ
५७) वक्र
५९) उणीव, न्यूनता
६१) एक शिकारी पक्षी
६३) वाळवी
६५) एक जंगली फूल
६६) मर्कट
६८) पुष्परस
६९) राहण्यास घर नसलेला
७०) साडेसातीचा ग्रह
७१) जास्तीत जास्त
७३) सत्वयुक्त
७५) देवीचा महोत्सव
७७) ओटा, कट्टा
७९)चकणा
८०) एक चतुर्थांश भाग
८१) पुरा पुरा अंदाज
८३) टवाळक्या करणारा
८४) दहा लाख
८५) रीतीरिवाज

**उभे शब्द :-**
१) चाफा
२) दार
३) नूतन
४) नाचणी
५) जमीनजुमला
६) नाश, अभाव
७) यजमान
८) लहान
९) सापाची एक जात
१०) पर्वत
१२) हवालदार
१५) कारण
१९) शक्य तितके
२०) च्या सह
२२) हत्ती
२५) मीठ
२६) पादत्राण
२७) ताठा, हिंमत, शक्ती
२९) एक तंतूमय वनस्पती
३२) धाग, दरारा
३४) नृत्य
३६) नमस्कार
३८) कीव, दया
४१) सुंदर व सुकुमार
४२) जे करावयास पाहिजे ते न करता नको ते करणारा
४४) सैन्याचे पुढे जाणे
४५) चौकोनी आकार
४७) पाताळ
४८) एक धान्य
५०) मोठा भाऊ
५१) जोड, संधी, भेग
५४) पाप घालविणे
५६) जाचणारे, प्रतिकूल
५८) पोष्ट ऑफिस
६०) तारणारा
६१) सारखा
६२) साधना करणारा
६४) फटाक्याची माळ
६६) सामान
६७) इमारतीच्या पायात भरण्याचा दगडी प्रकार
६९) मनुका
७०) कलेवर
७२) हाणामारी
७४) प्रभात
७५) आश्चर्य
७६)परका, तिऱ्हाईत
७८) स्तुती करणारा
८०) बंधन
८२) निमग्न, गुंग.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

# हिंदी चित्रपटसृष्टीतील सौंदर्य साम्राज्ञी

# मधुबाला

**अनेक दंतकथा जीच्या नावावर सांगितल्या जातात ती म्हणजे सौंदर्य साम्राज्ञी मधूबाला. १४ फेब्रुवारी!! तारखेसह अनेकांच्या डोळ्यासमोरून 'व्हेलेंटाईन'स डे' तथाकथित ''प्रेमदिन'' सरकून गेला असावा....भारतातही हा दिवस थाटामाटात साजरा केला'च' जावा, असं मला वाटण्याचं एकमेव कारण म्हणजे, सौंदर्यवती 'मधुबाला' हिचा जन्मदिन!!**



श्रीराम शेटये

मधुबाला, भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेलं एक सुरेख स्वप्न. स्वप्नच जणू. ती आली, तिने जिंकले आणि ती गेली. सगळ्यांना चुटपुट लावून. तिचं जीवन केवळ एक अभिनेत्री म्हणून समृद्ध नव्हतं तर एक माणूस म्हणूनही ती मोठी होती. प्रेमासारख्या सुंदर गोष्टीचा 'इजहार' एका लावण्यवतीच्या जन्मदिनी करण्यास हरकत नसावी!! किंवा 'इजहार, इकरार' झालेला असल्यास ह्या सुंदर दिनी गोड-गुलाबी फुलं देण्यास हरकत नसावीच... तिचा जीवनपट पाहिल्यास तिच्या आठवणीत, 'एखादे प्रेम सफल व्हावे' म्हणून शुभेच्छा देण्यास हाच दिवस योग्य ठरावा!!

आजही सौंदर्यातील शेवटचा शब्द म्हणजे 'मधुबाला'च समजला जातो! तिचं आरस्पानी सौंदर्य, तिचं लज्जतदार लाजणं, तिचं खळाळून हसणं, खोडकरपणे हसणारे तिचे जीवघेणे नेत्रकटाक्ष, प्रेमातील उत्कटता आणि विरहातील व्याकुळता टिपणारे तिचे डोळे, सारं कसं जिवंत मनाला सुखावणारे होते! एकूणच तिचा रूपेरी वावर आजही एक 'आयडॉल' समजला जातो. आजच्या पिढीला कदाचित हे वाचून आश्चर्य वाटेल मधुला पडद्यावर पाहतानाच नव्हे तर तिच्या उल्लेखानेही रोमांचित होणारे हजारो रसिक होते. अभिनय सम्राट दिलीपकुमारपासून गानसम्राट किशोरकुमारपर्यंत सारेच तिच्यावर फिदा होते. सौंदर्याची अनभिषिक्त सम्राज्ञीचा जन्मदेखील १४ फेब्रुवारी, हा तमाम प्रेमिकांकरिता शुभसंकेत समजायला हवा. आजच्या पिढीला मधुचे सिनेमे पहायला मिळत नसले तरी तिच्यावर चित्रित गाणी यू ट्यूबच्या माध्यमातून सहज शक्य आहे.

दिनांक १४ फेब्रुवारी १९३३ रोजी, श्री अताऊल्लाखान (मूळ पठाणी), ह्यांना दिल्लीच्या निवासस्थानी कन्यारत्न प्राप्त झाले, हे रत्न अवघ्या भारताला काही काळासाठी काबीज करेल ह्याची जाणीव खुद्द त्या माता- पित्यालाही नसावी! नाकी डोळी नीटस, सुंदर कांतीच्या ह्या मुलीचे 'मुमताज जहान बेगम देहलावी' असे नामकरण झाले! देहलावी कुटुंबियांच्या अकरा पैकी हे पाचवे अपत्य! मुमताजच्या जन्मानंतर काही कालावधीच अताऊल्ला खान ह्यांना 'इम्पेरिअल टबोको कंपनी' च्या नोकरी वरून कमी करण्यात आले (आजवर वाचलेल्या विविध लेखांतील माहितीनुसार अताऊल्लांचा भयंकर तापट स्वभाव आणि अतिमहत्त्वाकांक्षा ही कारणे लक्षात येतात)... इथून कुटुंबाचे हलाखीचे जिणे सुरू झाले... एका वेळच्या खाण्याची मारामार आणि घरात तब्बल १३ तोंडे, ह्यांचा ताळमेळ त्या घरच्या कुटंबप्रमुखाच्या तऱ्हेवाईक स्वभावामुळे बसता बसेना... पर्यायी घरात अशांतीच अधिक.. टक्के टोणपे खात, ही नाही ती नोकरी कर (प्रत्येक ठिकाणी काही दिवस राहिल्यानंतर, वाद उपटून खानसाहेब पुढील ठिकाणी रवाना होत असत) असे दिवस सरत होते, त्यातच त्यांना त्यांच्या दोन मुलांना प्रदीर्घ आजारपण व योग्य उपचार न मिळाल्यापायी गमवावे लागले!

''दिल्ली हमें राज ना आई'' म्हणत, हा कुटुंबमेळा ''जिसका कोई नही, उसकी मुंबई'' ह्या तत्वावर, आमच्या मुंबईत दाखल झाला.

अवघ्या नऊ वर्षांची मुमताज आता घरची परिस्थिती चांगलीच उमजून होती.

चलचित्रपट जोमात असतानाचा हा काळ! ''तुम्हारी बिटियाँ खुबसुरत है, किसी पिक्चर मे काम क्यो नही करवाते''असे सल्ले वारंवार ऐकलेल्या अताऊल्लाची महत्वाकांक्षा न बळावली तरच नवल... आणि सुरू झाल्या ''बॉम्बे टॉकीज स्टूडियो''च्या वाऱ्या... अताऊल्लांच्या प्रयत्नांच्या शर्थीने ''बेबी मुमताज'' रूपेरी पडद्यावर साकारली गेली, १९४२ साली, ''बसंत'' ह्या चित्रपटातून.. बसंतने बॉक्स ऑफिसवर बऱ्यापैकी काम केले! एक 'चाईल्ड आर्टिस्ट' म्हणून सुरू झालेला हा प्रवास सुरूच राहणार होता, आता तिच्या अंतापर्यंत!

अताऊल्लाखान स्वतःच्या तापट स्वभावाला मूरड घालत इथे जम बसवण्याचा अतोनात प्रयत्न करू लागले, आणि अंगच्या कलागुणांच्या बळावर ही चाईल्ड आर्टिस्ट- बेबी मुमताज गाजू लागली.. त्या काळच्या सुप्रसिद्ध नायिका 'देविका राणी' ह्यांनी, बेबी मुमताजचा प्रसन्न वावर, आकर्षक देहबोलीवर लुब्ध होत तिचे ''मधुबाला'' नामकरण केले! ती सर्वांची लाडकी मधू झाली, घराचा चरितार्थ चालविण्याचे मुख्य साधन झाली, अताऊल्लाखानांच्या महत्त्वाकांक्षेची दुधार तलवार झाली...

मधूची खऱ्या अर्थाने घोडदौड सुरू झाली ती चित्रपट 'नील कमल' पासून.. ती अवघ्या १४ वर्षांची असताना, किदार शर्मा लिखीत, दिग्दर्शीत चित्रपट तिला मिळाला ज्यात 'राज कपूर' प्रमुख नायक होते, १९४७ साली प्रदर्शित ह्या चित्रपटाने फार कमाई केली नसली तरी, नवतरूण युवतीचे स्वागत जोरदार झाले, इथे तिच्या अभिनयापेक्षा तिच्या रुपाचे कौतुक जास्त झाले...आता ही रुपयौवना, तारुण्याच्या 'धोक्याच्या वरिसात' पदार्पण करती झाली, वय १६! तिच्या डोळ्यांच्या अदाकारीने, कमनीय बांध्याने दिलखूलास हास्याने अनेकांच्या काळजांचा ठाव घेणारी, ही मनमोहिनी अवतरली रूपेरी पडद्यावर ''महल'' चित्रपटातून....!मुरलेला अभिनेता अशोक कुमार ह्यांना घेऊन बॉम्बे टॉकीज स्टूडिओ ने १९४९ मधे आणलेल्या ह्या चित्रपटातून खऱ्या अर्थाने ३ लोक प्रकाशझोतात मधे आणले गेले- स्वरसम्राज्ञी - लता मंगेशकर, दिग्दर्शक - कमल अमरोही, आणि लिडिंग ॲक्ट्रेस- मधूबाला!!!

''आयेगा आनेवाला'' ह्या गाण्याने जी धूम केली त्या काळात, ती हे गाणे आताही ऐकल्यास कपाळावरून डोळ्यांवर ओढणी घेऊन, तिरके कटाक्ष टाकणारी मधू आठवतेच! मधू जितकी मोहक होती, तितकीच काहीशी गूढही.. लोकांमधे फार मिसळण्याचा तिचा स्वभाव नव्हता, परिस्थितीशी चार हात करत वर आलेल्या ह्या मुलीत मात्र लाघवीपणा ओतप्रोत होता, कामाशी एकनिष्ठ, कर्तव्यात कसूर न पडू देणाऱ्या ह्या अप्सरेला पहिला शाप होता तो असाध्य आजाराचा-'वर्निक्युलार सेप्टल डिफेक्ट- हृदयात छिद्र असणे''

१९५० साली, आजसारखे प्रगत तंत्रज्ञान भारतात असते, तर कदाचित मधूचा जीवनप्रवास वेगळा असता, अजून हसरा हसता, आनंदी असता... प्रत्येक स्वर्गीय सौंदर्यावर शापांची खैरात असावी. तिचे हे आजारपण चित्रपटसृष्टीपासून बराच काळ लपवून ठेवण्यात आले. ह्या आजारपणा दरम्यान घरून तिची फार काळजी घेतली जायची, घरचेच अन्न, ठराविक एका विहीरीतलेच पाणी तिला दिले जायचे! मधू शिवाय घरात कमावणारे कुणी नसल्यानेही असेल कदाचित. भावंडांचे शिक्षण आणि घराच्या जबाबदारीपुढे येईल तो चित्रपट/ भूमिका साकारायची इतकेच तिच्या ध्यानी- मनी बिंबवण्यात आले होते!

महल चित्रपटाच्या यशानंतर, म्हणजे साधारण १९५०-५४ ह्या कालावधीत तिने २४ चित्रपटांत कामे केली, घरासाठी, घरातल्यांसाठी..! तिच्याकडे वेळ कमी होता, तिच्या अर्थार्जनात खंड नव्हता. केलेले अर्थार्जन, करू घातलेले अर्थार्जन ह्या सगळ्यांचा हिशेब मात्र एकाच व्यक्तीकडे होता- अताऊल्लाखान!!!! १९५४ साली 'बहोत दिन हुवे' नावाच्या चित्रपट निर्मिती प्रक्रियेदरम्यान मधूला रक्ताची उलटी झाली आणि प्रसारमाध्यमांनी ह्या प्रकरणाला उठाव दिला! (हा चित्रपट मात्र इतरही काही कारणास्तव पूर्ण झाला नाही)

तिच्या रुप- सौंदर्याची नोंद भारतीयांनीच घेतली असे नाही, तर त्या काळी 'हॉलीवूडच्या' काही मॅगझीन्स नेही तिला डोक्यावर घेतले- थिएटर आर्ट्स त्यातलेच एक! १९५२ साली त्यांनी मधूचा एक पूर्ण पानभर फोटो छापून आणला, एक गूढ स्वर्गीय सौंदर्य असा तिचा उल्लेख केला गेला आणि ह्या लेखाचा मथळा होता ''दि बिगेस्ट स्टार इन द वर्ल्ड''!! जगभरातून कौतुकाची फुलं उधळली जाताना, ती मात्र त्रस्त होती, आजारपणाने, मनाजोगते वागण्याची मुभा नसल्याने... हळवी होत गेली, हळवीच होत गेली... आता घर आणि कुटुंबियांनाच तिने सर्वस्व मानल्याने, त्यांच्यासाठी निर्णय घेताना तिला फारसा विचारही करावा लागत नसे ! मध्यंतरीच्या काळात साधारण १९५५-५८) तिने केलेला प्रत्येक चित्रपट पडला, तो काळ तिच्यासाठी पडताच असावा... 'बॉक्स ऑफिस पॉइजन'' अशी प्रसारमाध्यमांनी उपाधी दिली..

पुन्हा १९५८ नंतर 'हावडा ब्रिज' पासून कमान उंचावली.. ती उंचच राहिली.... ''मेरा नाम चिं ची चू'' , त्यानंतर ''आईये मेहरबान...'' ही गाणी आजही हिट आहेत!

मुहम्मद युसुफ खान- दिलीपकुमार- दिलीपसाब! ह्या एका व्यक्तीवर तिने जीवापाड प्रेम केले, जीव ओतून प्रेम केले!! 'ज्वार भाटा'च्या चित्रिकरणाच्यावेळी दिलीपसाब ह्यांना भेटलेली बेबी मुमताज, 'तराना' चित्रपटाच्या चित्रीकरणाच्यावेळी त्यांच्या प्रेमात पडली, तिनेच पहिला 'इजहार' कळविला, सेटवरच चित्रिकरणादरम्यान, एक एवलेसे प्रेमपत्र लिहून... मग 'इकरार' दिलीपकुमारचा .. आनंदाचे हे काही क्षण मात्र मधू दिलखूलास जगली, जगण्याची सारी शक्ती एकवटण्यासाठी 'हे काही क्षण' तिला पुरेसे ठरले, हेच सुदैव की दुर्दैव, की फक्त भाव भावनांचा खेळ- हे मधुच जाणो! ५ वर्षे एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या ह्या प्रेमी युगूलाला वेगळे करण्यासाठी नियती सरसावून होतीच, इतक्या वाईट पद्धतीने की दोघांचे प्रेम शेवटी कोर्टात उभे राहिले! हा मधुला असलेला आणखी एक शाप... प्रेमभंग!


नया दौर (१९५६ दरम्यान) च्या चित्रिकरण भोपाल येथे केले जावे अशी चित्रपट दिग्दर्शक 'बी सी चोप्रा' ह्यांनी जाहिर केले, भोपाल येथे हे संपूर्ण युनीट जाण्याचे नियोजिल्यानंतर, अताऊल्लाखानाने 'माझ्या मुलीबरोबर एकांत वेळ घालवण्यासाठी केलेला हा कट आहे' असा आरोप दिलीपकुमारवर करत, मधुबालेला ह्या चित्रपटातून निवृत्त होण्यास सांगितले, वडिलांचे म्हणणे मान्य करत मधूने चित्रपट सोडताच, चोप्राजींनी तिला कोर्टात खेचले, चित्रपटाचे ॲडवान्स घेतलेले पैसे तिच्याकडून वसूल करण्यात आले... नया दौर 'वैजयंतीमाला' ला घेऊन पूर्ण करण्यात आला...ह्या कोर्ट केसमध्ये हार झाल्यानंतर अताऊल्लाखान आणि मधुबाला ह्यांना मात्र प्रसारमाध्यमे आणि सामान्य लोकांचे ताशेरे सोसावे लागले...ह्या काळात मधू-दिलीप दूरावले, कायमचेच! हृदयाला खरोखरच छेद गेला!

आयुष्यात इतक्या उठाठेवी एकीकडे घडत असताना, दुसरीकडे दुखरी 'अनारकली' खऱ्या अर्थाने जन्म घेत होती! भावविश्वात प्रचंड उलाढाल असलेली एक अनारकली जगाला भूलवणारी अदाकारी साकारत होती... के असिफ, कृत 'मुघल-ए आझम' बनण्यास तब्बल ९ वर्षे लागली! १९५१-६०!! काय घडलं नव्हतं मधूच्या आयुष्यात ह्या काळात? १९५० ला समजलेलं आजारपण, १९५१-५६ प्रेम, प्रेमभंग, कोर्टकेस, १९५५-५८ बॉक्स ऑफिस पॉईजन चा ठपका!! संपूर्णपणे ढासळलेली मधूबाला आणि नव्याने जन्मलेली अनारकली!! मुघल-ए-आझम.च्या वेळेस तासन्तास चित्रीकरण, अनेक तास ढणाणत्या दिव्यांखाली उभे राहून मेक-अप ह्यामुळे तिची तब्बेत पार ढासळाली. दिलीप कुमारचे असूनही नसण्याने तिच्याकडून तिची उरली सुरली इच्छाशक्ती काढून घेतली. ५ ऑगस्ट १९६० रोजी इतिहास जिवंत झाला, एक नवा इतिहास कोरत. सलीम- अनारकलीचा मुघल- ए -आझम.प्रदर्शित झाला!! असे म्हणतात, हा चित्रपट इतका गाजला की तब्बल १५ वर्षे सुपरहिट होता, १९७५ ला शोले येईपर्यंत मुघल-ए-आझम.सुपरहिट म्हणून नावाजला गेला! **

---

# समीर परांजपेचा आरके चर्चेत

मराठी छोट्या पडद्यावर सध्या नवनवीन मालिकांची लाट आली असून टीआरपीच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी वाहिन्यांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळत आहे. याच शर्यतीत आता कलर्स मराठीने एका मालिकेचा प्रोमो नुकताच प्रसिद्ध केला आहे. स्टार प्रवाहवरील 'थोडं तुझं थोडं माझं' या मालिकेतील अभिनेता



समीर परांजपे आता 'कलर्स मराठी'वरील 'मोहिनी' या मालिकेत मुख्य भूमिकेत झळकणार आहे. मनोरंजन सृष्टीचा झगमगाट, त्यामागील संघर्ष आणि स्टारडमचा अहंकार अशा विविधांगी छटा असलेली 'मोहिनी' ही एक प्रेमकहाणी असणार आहे. या मालिकेत समीर परांजपे 'आरके' नावाच्या एका सुपरस्टारची भूमिका साकारत आहे. तर त्याच्या विरुद्ध 'मोहिनी'; ही भूमिका अभिनेत्री अनघा ठाकूर साकारणार आहे. एकाच सेटवर काम करणारा सुपरस्टार आणि त्याच सेटवरची एक सामान्य मेकअप आर्टिस्ट यांच्यातील संघर्षातून ही कथा आकाराला येणार आहे.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मालिकेच्या प्रोमोमध्ये आरकेचा रुबाबदार अंदाज पाहायला मिळतो. शूटिंगच्या सेटवर आरकेची एन्ट्री होताच वातावरण कसं बदलतं आणि त्याचा अहंकार कसा स्पष्टपणे दिसून येतो, याची झलक प्रोमोमध्ये दाखवण्यात आली आहे. सेटवर मेकअपचं सामान सांडल्यानंतर 'मेकअपचं तर सामान आहे फक्त' असं म्हणणाऱ्या अहंकारी आरकेला मोहिनी तितक्याच ठामपणे उत्तर देते. 'हेच सामान माणसाला कलाकार आणि स्टारला सुपरस्टार बनवतं,' असं सांगून ती आरकेच्या अहंकाराला आव्हान देते. या एका प्रसंगामुळे दोघांमधील वादाची ठिणगी पडली असून, पुढे हा प्रवास कोणत्या वळणावर जातो, याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे.

---

# क्रूर आणि शक्तिशाली व्यक्तिरेखा



छोट्या पडद्यावरून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवणारी अभिनेत्री मोना सिंग आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर एका अत्यंत वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहे. आगामी 'सुभेदार' या चित्रपटात ती एका गुन्हेगारी साम्राज्याची प्रमुख म्हणजेच 'क्राइम ओव्हरलॉर्ड'ची भूमिका साकारत आहे. या भूमिकेबद्दल बोलताना मोनाने व्यक्त केलेले विचार सध्या चित्रपट वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहेत. ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवर ५ मार्च रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'सुभेदार' या चित्रपटात अनिल कपूर मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटात मोना सिंग 'बबली' नावाच्या एका स्थानिक वाळू माफियाच्या भूमिकेत दिसणार आहे. नावावरून ही भूमिका साधी वाटत असली, तरी प्रत्यक्षात ती एक क्रूर आणि शक्तिशाली व्यक्तिरेखा आहे, जी अनिल कपूर यांनी साकारलेल्या अर्जुन मौर्य या माजी सैनिकाच्या मार्गात अडथळे निर्माण करते. या भूमिकेबद्दल सांगताना मोना सिंग म्हणाली की, ''मला अशा भूमिका करायला आवडतात ज्या मला अस्वस्थ करतात आणि ज्यांच्यामुळे माझ्या रात्रीची झोप उडते.

प्रत्येक कलाकाराला स्वतःला सिद्ध करण्यासाठी आव्हानांची गरज असते आणि मी नेहमीच स्वतःला चकित करतील अशा भूमिकांच्या शोधात असते. 'सुभेदार' मधील ही भूमिका माझ्यासाठी पूर्णपणे नवीन होती, कारण मी याआधी कधीही पडद्यावर गुंड किंवा माफियाची भूमिका साकारलेली नाही.''

मोनाने या भूमिकेसाठी विशेष मेहनत घेतली आहे. एका ग्रामीण भागातील वाळू माफियाची देहबोली आणि तिथली स्थानिक बोलीभाषा आत्मसात करणे हे तिच्यासाठी मोठे आव्हान होते. या चित्रपटात तिच्या बबली या पात्राने सुभेदारजींच्या आयुष्यात मोठी खळबळ माजवली असून, दोघांमध्ये अनेक ॲक्शन दृश्यही पाहायला मिळणार आहेत. 'कोहरा' सारख्या वेब सिरीजमधील दमदार कामगिरीनंतर मोना सिंग पुन्हा एकदा एका वेगळ्या रूपात प्रेक्षकांसमोर येणार आहे. या चित्रपटात अनिल कपूर आणि मोना सिंग यांच्यासोबत राधिका मदान, आदित्य रावल, सौरभ शुक्ला आणि फैसल मलिक यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. ५ मार्चपासून हा ॲक्शन-ड्रामा चित्रपट प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे.

---

# ओटीटी कट्ट्यावर येणार 'सुभेदार'

मार्च महिन्याचा पहिला आठवडा ओटीटी प्रेमींसाठी अत्यंत खास ठरणार आहे. ६ मार्च २०२६ रोजी विविध ओटीटी प्लॅटफॉर्मवर अनेक मोठे चित्रपट आणि वेब सिरीज प्रदर्शित होत आहेत. नेटफ्लिक्स, झी-५ आणि ॲमेझॉन प्राईम व्हिडिओ यांसारख्या प्रमुख माध्यमांनी आपल्या प्रेक्षकांसाठी वैविध्यपूर्ण आशयाची मेजवानी तयार केली आहे. यामध्ये दिग्गज कलाकारांच्या अभिनयाने नटलेल्या सिनेमांपासून ते ऐतिहासिक क्रांतीपर्यंतचे विषय पाहायला मिळणार आहेत.

या आठवड्यातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे 'सुभेदार' हा ॲक्शन ड्रामा चित्रपट जो मेझॉन प्राईम व्हिडिओवर या आठवड्यात प्रदर्शित होत आहे. अनिल कपूर यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट ५ मार्चला प्रदर्शित होत असला तरी, वीकेंडला प्रेक्षकांसाठी तो मुख्य आकर्षण ठरेल. निवृत्त सैनिकाचा नागरी जीवनातील संघर्ष आणि आपल्या कुटुंबासाठी दिलेला लढा या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. यात अभिनेत्री मोना सिंग खलनायिका म्हणून झळकणार आहे. वाळू माफियाच्या भूमिकेत असलेल्या मोना सिंगची भूमिकेची विशेष चर्चा होत आहे. झी-५ वर प्रदर्शित होणारा 'जब खुली किताब' हा चित्रपट. ज्येष्ठ अभिनेते पंकज कपूर आणि डिंपल कपाडिया यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट एका वृद्ध दांपत्याच्या विखुरलेल्या नात्याची गोष्ट मांडतो. ५० वर्षांच्या संसारानंतर घटस्फोट घेण्याचा निर्णय घेणारे हे दांपत्य आणि त्यांच्या कुटुंबाची होणारी ओढाताण यात विनोदी आणि भावनिक पद्धतीने गुंफण्यात आली आहे. सौरभ शुक्ला यांचे दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटात अपारशक्ती खुराना आणि समीर सोनी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. याच दिवशी झी-५ वर आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट 'गांधी टॉक्स' प्रदर्शित होत आहे. विजय सेतुपती, अरविंद स्वामी, अदिती राव हैदरी आणि सिद्धार्थ जाधव यांची फौज असलेला हा एक मूक चित्रपट आहे. संवाद नसतानाही



केवळ हावभाव आणि संगीताच्या जोरावर सामाजिक विषयावर भाष्य करणारा हा प्रयोग प्रेक्षकांसाठी नक्कीच वेगळा ठरेल. या चित्रपटाला ऑस्कर विजेते ए.आर. रहमान यांनी संगीत दिले आहे.

---

# शकीराच्या इंडिया कॉन्सर्टची क्रेझ

जागतिक स्तरावरील लोकप्रिय पॉप स्टार शकीरा तब्बल १९ वर्षांनंतर भारतात परतत असून तिच्या आगामी 'फिडिंग इंडिया कॉन्सर्ट २०२६' मुळे सध्या सोशल मीडियावर उत्साहाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक संगीत सोहळ्याचे तिकीट दर नुकतेच जाहीर करण्यात आले असून मुंबई आणि दिल्लीतील शोसाठी चाहत्यांना मोठी किंमत मोजावी लागणार आहे. १ मार्चपासून तिकीटांची अधिकृत विक्री सुरू झाली असून अवघ्या काही तासांतच तिकीट दरांचे आकडे पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेषतः व्हीआयपी श्रेणीतील तिकीटांच्या किमती सर्वसामान्यांच्या महिन्याच्या पगारापेक्षाही जास्त असल्याचे दिसून येत आहे. शकीराच्या मुंबईतील शोसाठी सर्वात स्वस्त तिकीट ६,००० रुपयांपासून सुरू होत आहे, तर दिल्लीसाठी हेच दर ४,५०० रुपयांच्या आसपास आहेत.





# बालांगण

## पृथ्वीच्या अंतरंगात...

आपण सगळे पृथ्वीवर राहतो. नऊ ग्रहांमधला एक ग्रह म्हणजे पृथ्वी. वेगवेगळ्या उपग्रहांमार्फत फोटो घेता येऊ लागले आणि आपल्याला पृथ्वीचा निश्चित आकार कळला. आधी पृथ्वीचा आकार कोणता हेच माहीत नव्हतं. पण आता आपण पृथ्वी कशी दिसते हे निश्चितपणे जाणतो. अंतरिक्षातून काढलेले पृथ्वीचे फोटो पाहतो. चला, आज पृथ्वीच्या अंतरंगाची माहिती घेऊ या!

✻ पृथ्वी स्वत:भोवती गिरकी घेण्यास २४ तास घेते म्हणूनच एक दिवस २४ तासांचा असतो. ✻ पृथ्वी सूर्यापासून १५०,०००,००० कि.मी. अंतरावर आहे.



✻ पृथ्वीच्या गर्भामध्ये चार वेगवेगळे स्तर आढळतात. भूपृष्ठ, मॅन्टल, वरचा थर आणि खालचा थर. सगळ्यात वरच्या थराला भूपृष्ठ म्हणतात. हा थर १० ते ४० कि.मी. पर्यंत असतो. या थरावर आपण राहतो. या थरावर उंचच्या उंच डोंगर त्याचप्रमाणे विशाल समुद्र आहेत. त्याच्या खालच्या थराला मॅन्टल असं म्हणतात. हा थर पृथ्वीच्या गर्भामध्ये २००० ते ३००० कि.मी. खाली असतो. हा थर सिलिकेट दगडांपासून बनलेला असतो. यातच लोखंड आणि मँगेनिज सापडतं. पृथ्वीच्या त्याच्या आतल्या थरात निकेल आणि लोखंड सापडतं. एकंदर आपली पृथ्वी वरून समृद्ध दिसते तेवढीच तिचं अंतरंगही सुंदर आहे. पृथ्वीच्या गर्भातच आपल्याला खनिज तेल, विविध खनिजं, धातू आढळतात. ही आपली अमूल्य संपत्ती आहे. पण वाढणाऱ्या प्रदुषणामुळे ही संपत्तीही धोक्यात येते आहे. म्हणूनच ही संपत्ती जपणं पर्यायानं पृथ्वीचं रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकानंच उचलायला हवी.

**माहीत आहे?**

## सूर्यप्रकाशामुळे का नाही वितळत बर्फ?

**नॉलेज अपडेट**

सूर्याच्या प्रकाशामुळे किंवा उष्णतेमुळे बर्फ वितळत नाही. बर्फ वितळण्यासाठी निसर्गातली वेगळीच गोष्ट कारणीभूत ठरते. असं का बरं होत असावं? हा निसर्गाचा चमत्कार म्हणायचा की त्यामागे विज्ञान आहे? जाणून घेऊ या.

सूर्यप्रकाश परावर्तित करण्याची क्षमता निसर्गातल्या काही गोष्टींमध्ये असते. त्यापैकी एक म्हणजे बर्फ. नव्याने पडलेला बर्फ ९० टक्के प्रकाश परावर्तित करतो. त्यामुळेच सूर्याच्या उष्णतेमुळे बर्फ वितळत नाही. आकाश निरभ्र असताना, स्वच्छ सूर्यप्रकाश असताना बर्फ वितळत नाही तर समुद्रावरून वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे मात्र बर्फ वितळतो.

या हिमकणांचं रूपांतर बर्फात होतं तेव्हा मात्र वेगळी परिस्थिती निर्माण होते. यावेळी बर्फ दोन तृतीयांश सूर्यप्रकाश शोषून घेतो. पण पारदर्शक असल्याने शोषून घेण्याची प्रक्रिया सुरू होण्यासाठी थोडा जास्त वेळ लागतो. शोषला जाण्याआधी प्रकाश बर्फाच्या जाड थरातून आत प्रवेश करतो तेव्हा वितळण्याच्या बिंदूपर्यंत बर्फाचं तापमान वाढू शकत नाही. बर्फाळ प्रदेशात बर्फ खूप थंड असताना उन्हाळा संपून जातो. या काळात बर्फ वितळत नाही. अंटार्टिका खंडात हेच घडत आहे. हिमयुगाच्या कालखंडात उत्तर युरोपातही हेच घडलं असावं, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.




समजा काही कारणांमुळे बर्फ अपारदर्शक झाला तर मात्र सूर्यप्रकाश बर्फाच्या पातळ थरातच शोषला जाईल आणि बर्फाचं तापमान वाढून तो वितळू लागेल. अशा परिस्थितीत हिमनग अवघ्या काही वर्षांत वितळून जातील आणि समुद्राची पातळी झपाट्याने वाढेल. सहाजिकच अर्ध्यापेक्षा जास्त जग पाण्याखाली जाईल.

## काय सांगतं लेबल?

**हेल्थ वेल्थ**

आपण बाजारातून बरंच काही खरेदी करतो. त्यापैकी महत्त्वाच्या असतात त्या खाण्यापिण्याच्या वस्तू. कारण त्यावर आपलं आरोग्य अवलंबून असतं. विविध मसाले, सरबतं, सूप्स, नूडल्स, ज्यूस, हेल्थ ड्रिंक्स, बिस्किटं, चॉकलेट्स आणली जातात. त्यावर लेबल्स असतात. त्यावर पदार्थांमधले घटक आणि पोषण मूल्यं लिहिलेली असतात. त्याकडे तुम्ही कधी लक्षं दिलं आहे का? आता आपण याबद्दलच जाणून घेऊ या.

पदार्थांमधल्या पोषक घटकांचं प्रमाण ग्रॅममध्ये नमूद केलेलं असतं. काही घटकांचं प्रमाण मिलीग्रॅममध्येही असतं. पदार्थांमध्ये फॅट्स, फायबर, प्रथिनं, कर्बोदकं असे घटक असतात. ङ्गअङ्घ आणि ङ्गकङ्घ सारखी जीवनसत्त्वं आणि लोह, कॅल्शियम सारखी खनिजंही असतात. अर्थात यावर नमूद करण्यात आलेलं प्रमाण वाढत्या वयातल्या मुलांसाठी नसतं. पूर्ण वाढ झालेल्या प्रौढांच्या गरजा लक्षात घेऊन हे प्रमाण नमूद केलेलं असतं. वाढत्या वयातल्या मुलांना कमी किंवा जास्त कॅलरींची गरज असू शकते. तसंच त्यांना लागणाऱ्या पोषक घटकांचं प्रमाणही वेगळं असू शकतं.




असं असलं तरी तुम्हा मुलांना अशा लेबल्समधून बरीच माहिती मिळू शकते. आपण खात आहोत त्यात किती कॅलरीज आहेत, त्यात कोणते पोषक घटक आहेत, प्रत्येक घटकाचं प्रमाण किती आहे हे तुम्हाला कळू शकतं. या लेबल्सवरून तुम्ही दोन ब्रॅण्डसमध्ये तुलना करू शकता. कोणत्या पदार्थात कोणत्या घटकाचं प्रमाण जास्त किंवा कमी आहे हे बघू शकता.

एकंदरच पदार्थ तयार करताना कोणत्या घटकांचा वापर करण्यात आला आहे त्याकडेही लक्ष द्या. या यादीवर नजर टाका. पदार्थात कोणत्या घटकाचं प्रमाण किती आहे हे त्या घटकाच्या यादीतल्या क्रमांकावर ठरतं. म्हणजे घटक पदार्थांच्या यादीत साखर पहिल्या किंवा दुसऱ्या स्थानी असेल तर तो पदार्थ साखरयुक्त आहे असं समजायला हरकत नाही. जास्त साखरयुक्त पदार्थ टाळायला हवे हे तुम्ही जाणताच. कोणते पदार्थ टाळायचे हे या यादीवरून तुम्ही ठरवू शकता. साखरेची वेगवेगळी नावं आहेत. हाय फ्रुक्टोस कॉर्न सिरप, कॉर्न सिरप, सुक्रोज किंवा ग्लुकोज अशा नावांनी साखर नमूद केलेली असू शकते. त्यामुळे पुढच्या वेळी एखादा पदार्थ विकत घेतला की त्यावरचं लेबल वाचायला विसरू नका. यामुळे त्या पदार्थामधल्या पोषक घटकांची आणि तो बनवण्यासाठी वापरल्या गेलेल्या घटक पदार्थांची माहिती मिळू शकेल.

## बहुपयोगी ग्रॅफाईट

**खनिजांची माहिती**

ग्रॅफाइट हा एक महत्त्वाचा खनिज पदार्थ आहे. तो दिसायला काळसर किंवा करड्या रंगाचा असतो आणि हाताला लागल्यावर थोडा मऊ वाटतो. ग्रॅफाइट हा धातू नाही. तो कार्बनचा एक प्रकार आहे. कार्बनपासूनच कोळसा आणि हिरे तयार होतात. पण ग्रॅफाइटचे गुणधर्म वेगळे असतात. ग्रॅफाइट पृथ्वीच्या पोटात खडकांमध्ये सापडतो. तो बहुतेक वेळा सुळक्यासारख्या किंवा थरांच्या स्वरूपात आढळतो. जगात ग्रॅफाइटचे मोठे साठे चीन, भारत, ब्राझील, कॅनडा आणि श्रीलंका या देशांमध्ये आहेत. भारतात झारखंड, ओडिशा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांत ग्रॅफाइट सापडतो.


ग्रॅफाइट मिळवण्यासाठी खाणींमधून खडक बाहेर काढले जातात. हे खडक फोडून त्यावर प्रक्रिया केली जाते. त्यामधून ग्रॅफाइट वेगळा केला जातो आणि स्वच्छ केला जातो. नंतर त्याचे बारीक चूर्ण किंवा दांडे तयार केले जातात. ग्रॅफाइटचा सर्वात ओळखीचा उपयोग म्हणजे पेन्सिल. पेन्सिलच्या आत असलेली काळी दांडी ग्रॅफाइटपासून बनवलेली असते. अनेक लोक त्याला शिसे म्हणतात. पण ते शिसे नसते. ग्रॅफाइट कागदावर घासला की सहज रेघ उमटते. त्यामुळे ग्रॅफाइट लिहिण्यासाठी उपयोगी ठरतो.



ग्रॅफाइटचे इतरही उपयोग आहेत. तो उष्णता सहन करू शकतो. त्यामुळे काही भट्ट्या आणि यंत्रांमध्ये वापरला जातो. विजेचा प्रवाह तो सहज वाहून नेतो. म्हणून काही विद्युत उपकरणांमध्ये त्याचा उपयोग होतो. गाड्यांमध्ये आणि यंत्रांमध्ये घर्षण कमी करण्यासाठीही ग्रॅफाइट वापरला जातो. ग्रॅफाइट शरीरासाठी धोकादायक नाही. रोजच्या आयुष्यात वापरात असलेला हा साधा दिसणारा पदार्थ विज्ञान आणि उद्योगांसाठी खूप महत्त्वाचा आहे. म्हणूनच पेन्सिलमधील साधी रेघ काढणारा ग्रॅफाइट हा खरोखरच उपयोगी आणि महत्वपूर्ण खनिज आहे.

## बर्फ पाण्यावर का तरंगतो ?

बर्फ आणि पाण्याची रचना थोडी वेगळी असते. पाणी गोठताना त्यातील कण थोडे दूर दूर पसरतात. त्यामुळे बर्फाचे घनफळ वाढते आणि तो हलका होतो. हलकी वस्तू जड द्रवावर तरंगते, म्हणून बर्फ पाण्यावर तरंगतो. हे निसर्गासाठी खूप महत्त्वाचे आहे. बर्फ बुडाला असता, तर तळी आणि नद्या पूर्ण गोठल्या असत्या. परंतु त्यामुळे बर्फ तरंगत असल्यामुळे पाण्याखालील भाग तुलनेने उबदार राहतो आणि जिवांना जगण्यासाठी सुरक्षित जागा मिळते. त्यामुळेच पाण्यातील मासे व इतर जीव जगू शकतात. म्हणूनच थंड प्रदेशांतही पाण्यातील जीव जिवंत राहू शकतात.



## नकाशा तयार करताना...

**कोण होणार?**

गुगल मॅप किंवा नेव्हिगेशन तंत्रज्ञानामुळे एखादं ठिकाण शोधणं खूपच सोपं झालं आहे ना? पण हा नकाशा कोण बरं तयार करत असेल? या तंत्रज्ञानाचं काम कसं चालत असेल? नकाशा ही संकल्पना नसती तर काय बरं झालं असतं? असे प्रश्न तुमच्या डोक्यात येते असतीलच. मित्रांनो, नकाशा तयार करणं ही एक कला आहे. या कलेला कार्टोग्राफी म्हणतात. नकाशा बनवणाऱ्या लोकांना कार्टोग्राफर किंवा मॅप मेकर असं म्हटलं जातं. नकाशा बनवण्यासाठी विज्ञानाची मदत घेतली जाते. या क्षेत्राची माहिती घेऊ या.

कार्टोग्राफी म्हणजे काय?

कार्टोग्राफीमध्ये नकाशा तयार करायचं प्रशिक्षण दिलं जातं. या प्रक्रियेत विज्ञान आणि कलात्मकता या दोन्हीची गरज भासते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि कला या तिघांचा संगम या क्षेत्रात



पहायला मिळतो. आजच्या डिजिटल युगात कार्टोग्राफी करणं सोपं झालं आहे. जुन्या काळात नकाशे तयार करण्यासाठी जागोजागी हिंडावं लागत असे. सर्वेक्षण करावं लागत असे. यानंतर हाताने मानचित्र साकारावं लागत असे. पण आता सॅटेलाईट्स म्हणजे उपग्रहांच्या मदतीने नकाशे तयार केले जातात. गुगल मॅप हे याचं उत्तम उदाहरण आहे. आता व्हॉट्स ॲपनेही लोकेशन पाठवण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.

उपयोग

विविध ठिकाणी नकाशाचा उपयोग होतो. सरकारी कार्यालयं, देशाच्या संरक्षणाशी संबंधित विभाग, हवामान विभाग, नेव्हिगेशन, नव्या शहरांची उभारणी, रस्तेबांधणी, मेट्रो रेल्वेचं काम आदी ठिकाणी नकाशाचा वापर केला जातो.

संधी


तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने कुशल तंत्रज्ञांची गरज भासू लागली आहे. म्हणूनच कार्टोग्राफर्सची मागणी वाढली आहे.

शिक्षण

कार्टोग्राफीशी संबंधित पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या विषयात मास्टर्स पदवी मिळवता येते. बारावीनंतर डिप्लोमा करून या क्षेत्रात येता येईल.

## पाण्याचा थेंब गोल का असतो?

पाण्यात एक खास गुणधर्म असतो, त्याला पृष्ठताण म्हणतात. पाण्याचे अतिशय लहान कण एकमेकांना घट्ट धरून ठेवतात. प्रत्येक कणाला शक्य तितके जवळ राहायचे असते. त्यामुळे पाण्याचा थेंब अशी आकृती बनवतो, ज्या आकारात कण कमी पसरतात आणि जवळ जवळ राहू शकतात. गोल आकारात बाहेरील पृष्ठभाग कमी असतो. म्हणून थेंब गोल बनतो. पानावर पडलेले पाण्याचे थेंब मोत्यासारखे गोल दिसतात कारण पानाचा पृष्ठभाग गुळगुळीत असल्यामुळे पाणी त्यावर पसरत नाही. पण पाणी जमिनीवर सांडले तर मात्र ते पसरते. कारण तिथे पृष्ठभाग वेगळा असतो. पाण्याचा गोल थेंब हा निसर्गातील एक छोटा आणि रंजक चमत्कार आहे.



## असे आहेत कॉलिंग हेडफोन

**स्मार्ट टेक**



हेडफोन्सचा वाढता वापर आणि महत्त्व लक्षात घेऊन न्यूयॉर्कमधल्या ङ्गइंस्पॅरो इंकङ्घ कंपनीने कॉलिंग हेडफोन्सची निर्मिती केली आहे. ङ्गविंची २.०ङ्घ असं या हेडफोनचं नाव असून फोन आणि मेसेज करणं तसंच महत्त्वाची नोटिफिकेशन्स जाणून घेण्याच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरू शकतात. या हेडफोनमध्ये सीमकार्ड घालण्याची सोय आहे. त्यात मोबाईल नंबर सेव्ह करता येतो. ङ्गहाय विंसीङ्घ असं म्हणून ज्याला फोन करायचं आहे त्याचं नाव घेतल्यावर फोन लागतो. बोलल्यावर मेसेज टाईप होतो. या हेडफोनमध्ये आणखीही वेगवेगळे फीचर्स आहेत. या फीचर्सबद्दल जाणून घेऊ या.

✻ व्हॉईस कंट्रोल

व्हॉईस कंट्रोलच्या मदतीने या हेडफोनचा अगदी सहजपणे वापर करता येतो. हात कानाजवळ नेऊन हलवला की हेडफोन ॲक्टिव्हेट होतो.

✻ क्लियर व्हॉईस रेकग्निशन

या हेडफोनमध्ये विशिष्ट प्रकारचा माईक बसवण्यात आला आहे. त्यामुळे गजबजाटातही युजरचा आवाज समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहचू शकतो.

✻ आट्रिफिशियल इंटेलिजन्स

हेडफोन बनवण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करण्यात आला आहे.

✻ सेंसर्स

हेडफोन्समध्ये एकूण १० सेंसर्स आहेत. या सेंसर्सच्या मदतीने तुम्ही फिटनेस तसंच आरोग्याशी संबंधित डाटा तपासू शकता.

## प्राण्यांना स्वप्ने पडतात का?

शास्त्रज्ञांच्या मते अनेक प्राण्यांना स्वप्ने पडतात. माणसांप्रमाणेच प्राण्यांच्या मेंदूतही झोपेच्या वेगवेगळ्या अवस्था असतात. एका खास अवस्थेत मेंदू खूप सक्रिय असतो आणि याच वेळी स्वप्ने पडतात. कुत्रा झोपेत पाय हलवतो. हलकेच भुंकतो किंवा शेपूट हलवतो. त्यावेळी तो कदाचित स्वप्न पाहत असतो. मांजर, उंदीर आणि काही पक्ष्यांवर केलेल्या अभ्यासातूनही असे दिसून आले आहे की माणसाप्रमाणेच त्यांचा मेंदू झोपेत काम करत राहतो. त्या काळात मेंदू दिवसभरात शिकलेल्या गोष्टी नीट लावतो. त्यामुळे स्वप्ने केवळ माणसांनाच नव्हे, तर बहुतेक सर्व प्राण्यांनाही पडतात.



## आरशात प्रतिबिंब उलटे दिसते का ?

आरशात आपले प्रतिबिंब उलटे दिसते असे आपल्याला वाटते. आपल्या शरीरावरून प्रकाश परावर्तित होऊन आरशावर पडतो आणि परत आपल्या डोळ्यांकडे येतो. त्यामुळे आपल्याला आपली प्रतिमा दिसते. समजा तुम्ही उजवा हात वर केला, तर आरशातील प्रतिमेचा हात तुमच्यासमोरच्या बाजूला दिसतो. आपला मेंदू आरशातील आपले प्रतिबिंब म्हणजे आपल्यासमोर दुसरी व्यक्ति आहे असे समजतो आणि त्या प्रतिबिंबाची तुलना खऱ्या माणसाशी करतो. म्हणून आपल्याला प्रतिबिंब उलटे असल्यासारखे वाटते. हा प्रकाश आणि मेंदूच्या समजुतीचा एक रंजक खेळ आहे.




## अमेझॉन- पृथ्वीचे फुफ्फुस

**ओळख नद्यांची**

अॅमेझॉन नदी ही जगातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्यांपैकी एक आहे. ही नदी दक्षिण अमेरिका खंडात वाहते. अमेझॉन नदीचा उगम पेरू देशातील अँडीज पर्वतरांगांमध्ये होतो. तेथून ही नदी पूर्वेकडे वाहत जाते आणि शेवटी अटलांटिक महासागराला मिळते.

अमेझॉन नदी पेरू, कोलंबिया आणि ब्राझील या देशांतून वाहते. यापैकी ब्राझीलमध्ये तिचा सर्वात मोठा भाग आहे. अमेझॉन नदीची एकूण लांबी सुमारे ६४०० किलोमीटर आहे. पावसाळ्यात ही नदी खूप रुंद होते आणि आजूबाजूचा मोठा भाग पाण्याखाली जातो.



अमेझॉन नदीच्या काठावर जगातील सर्वात मोठे जंगल आहे. ज्याला अमेझॉनचे पर्जन्यवन म्हणतात. या जंगलात हजारो प्रकारचे वृक्ष, वनस्पती आणि औषधी झाडे आहेत. तसेच अनेक दुर्मिळ प्राणी इथे आढळतात. वाघासारखा दिसणारा जग्वार, माकडे, अजगर, बेडूक, रंगीबेरंगी पक्षी आणि असंख्य मासे अमेझॉनमध्ये राहतात. अमेझॉन नदीला अनेक महत्त्वाच्या उपनद्या मिळतात. मादेरा, नेग्रो, तपाजोस आणि झिंगू या तिच्या मोठ्या उपनद्या आहेत. या नद्यांमुळे अमेझॉन नदीत प्रचंड पाणी येते. अमेझॉन नदीवर मोठी धरणे नाहीत. कारण नदी खूप रुंद आहे आणि परिसर घनदाट जंगलाचा आहे. मात्र तिच्या काही उपनद्यांवर धरणे बांधलेली आहेत. ही नदी वाहतुकीसाठी खूप उपयोगी आहे. रस्ते नसलेल्या जंगल भागात लोक बोटीने प्रवास करतात. मालवाहतूक, मासेमारी आणि दैनंदिन जीवनासाठी अमेझॉन नदी फार महत्त्वाची आहे. अमेझॉन नदी आणि तिचे जंगल पृथ्वीच्या हवामानासाठी खूप गरजेचे आहे. त्यामुळे तिला पृथ्वीचे फुफ्फुस असेही म्हणतात.

## अंतराळवीर झोपतात कसे?

अंतराळवीरांची झोप अगदी वेगळी असते. कारण अंतराळात गुरुत्वाकर्षण नसते. त्यामुळे माणूस खाली पडत नाही. हवेतच तरंगत राहतो. अंतराळवीर अंतराळयानात किंवा अवकाश स्थानकात झोपतात. तिथे पलंग, उशी किंवा गादी नसते. त्याऐवजी त्यांच्याकडे झोपायच्या पिशव्या असतात. या पिशव्या भिंतीला, छताला किंवा जमिनीला बांधलेल्या असतात. अंतराळवीर त्या पिशवीत शिरतात आणि झोपताना स्वत:ला हलकेच बांधून घेतात. नाहीतर ते झोपेतच इकडून तिकडे तरंगत जाऊ शकतात. शुभांशु शुक्ला यांनी एका मुलाखतीत संगितले होते, पृथ्वीवर आपण बाजूला वळतो. पाय हलवतो. पण अंतराळात तसे करता येत नाही. एकदा झोपायच्या पिशवीत शिरले की शरीर हवेत स्थिर राहते.

सुरुवातीला झोपेत आपण खाली पडू की काय, अशी भीती वाटते. पण काही दिवसांत सवय लागते. तर सुनीता विल्यम्स म्हणाल्या होत्या की, झोपताना हात मोकळे ठेवले, तर ते हवेत तरंगत राहतात. म्हणून हात पिशवीत ठेवून झोपावे लागते. काही जण उभे, काही आडवे, तर काही उलटेही झोपतात. काही अंतराळवीर भिंतीला चिकटून, तर काही छताजवळ तरंगत झोपतात. कारण तिथे वर-खाली असे काही नसतेच. कोणत्याही दिशेला झोपले तरी चालते. पृथ्वीभोवती फिरताना अवकाश स्थानकाला एका दिवसात अनेक वेळा सूर्योदय आणि सूर्यास्त दिसतो. त्यामुळे झोपेची वेळ ठरवण्यासाठी घड्याळाचा आधार घ्यावा लागतो. झोपताना प्रकाश आणि आवाज त्रास देऊ नये म्हणून अंतराळवीर डोळ्यांवर पट्टी लावतात आणि कानात मऊ बोळे घालतात. पहिल्या काही दिवसांत झोप नीट न लागण्याची शक्यता असते. पण एक नक्की की अंतराळवीरांची झोप म्हणजे अंतराळातील मजेशीर अनुभव आहे

विनायक दळवी

## ‘वानखेडे’वरील सनसनाटी क्रिकेट नाट्याचा समारोप भारताच्या बाजूने



गुरुवारी रात्री वानखेडे स्टेडियमवर क्रिकेट सामना नव्हता तर एक रोमहर्षक असं नाटक सुरू होते. चौकार षटकारांची बरसात होत होती. सामना २०-२० षटकांचाच परंतु जवळजवळ पाचशे धावा कालच्या रात्रीत फटकावल्या गेल्या. क्षणाक्षणाला त्यामध्ये अनिश्चिततेचे रंग भरले जात होते. या नाटकाचा रंगमंच होता, वानखेडे स्टेडियमची खेळपट्टी आणि प्रेक्षागृह होतं सभोवतालच संपूर्ण वानखेडे स्टेडियम. या स्टेडियमचे सर्व स्टॅण्ड, रसिकांनी खचाखच भरले होते.

पंचाने ‘प्ले: असा उद्घोष केला आणि या रोमहर्षक नाटकाची तिसरी घंटा वाजली. भारताचा या रंगमंचावरचा फलंदाजीचा नायक होता संजू सॅमसन. अपेक्षेप्रमाणे अभिषेक शर्मा कार्ड पंच करून तंबूत परतला. सॅमसन जेमतेम वीस धावा करतो न करतो तोच, आर्चरच्या गोलंदाजीवर इंग्लंडच्या कप्तान ब्रुक्स याने सोपा झेल सोडला. त्यानंतर मात्र चौफेर फटकेबाजीची सॅमसनची मैफल रंगली. त्याने कधी ८० धावा ओलांडल्या ते कळलच नाही. त्याला ईशान किचनची देखील तोडीची साथ लाभत होती.

दहापेक्षा अधिक धावांच्या सरासरीने भारतीय संघाने १५ षटका दरम्यानच पल्ला गाठला होता. त्यावेळी ३०० धावसंख्या देखील अशक्य वाटत नव्हती. मात्र, इंग्लंडच्या फिरकी गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांना काही वेळा जखडून ठेवले आणि त्यांच्या विकेट देखील काढल्या. तरी देखील भारताच्या हार्दिक पांड्या आणि अन्य फलंदाजांनी अडीचशे धावसंख्येचा टप्पा ओलांडलाच. इंग्लंडला ही धावसंख्या गाठणे कठीण आहे असे वाटत असतानाच त्यांनी भारतापेक्षा धाव सरासरी उत्तम राखत दहा षटकात निम्मा पल्ला गाठला होता. मात्र त्यावेळी त्यांनी आपले चार बिनीचे मोहरे गमावले होते प्रामुख्याने हॅरी ब्रुक्स हा इंग्लंडचा सेनानी आणि प्रमुख फलंदाज भारताने लवकर टिपला होता त्यामुळे इंग्लंड संघ अडीचशे धावसंख्येची मजल मारू शकेल अशी त्यावेळी तरी शक्यता वाटत नव्हती. मात्र, क्रिकेटची अनिश्चितता त्यावेळी पुन्हा एकदा वानखेडे स्टेडियमवर अवतरली डावखुऱ्या जेकब येथील याने धुवाधार फटकेबाजी करीत सात षटकार आठ चौकारांसह ४८ धावा फटकावल्यामुळे इंग्लंडचा विजय नजरेच्या टप्प्यात आणला होता. मात्र, अखेरच्या षटकात त्याचे अचानक धावचित होणे, इंग्लंड संघाच्या विजयासाठी घातक ठरल. बॅन्टन आणि विल जॅक्स यांचे बळी भारताच्या विजयाची शक्यता वाढवणारे होते. सॅम करन आणि ओव्हरटन यांचे बळी गेल्यानंतर देखील इंग्लंडने विजयाची आशा सोडली नव्हती त्याचे कारण झोपला अर्चना उंच पुरा खेळाडू मोठे फटके खेळण्यासाठी प्रसिद्ध आहे त्यांनी आपल्या लौकिकाला तडा जाऊ दिला नाही त्यांनी अवघ्या चार चेंडू तीन षटकारांसह वानखेडे व स्टेडियमवरील या एक सणसणाटी नाट्यावर पडदा पाडला त्याचे इंग्लंडच्या विजयाचे प्रयत्न अवघ्या सात धावांनी कमी पडले मात्र त्याच्याकडे फटकावण्यासाठी चेंडूत उरला नव्हता.

भारताच्या विजयाच्या श्रेय अर्थात सामनावीर सॅमसन याला द्यावे लागेल त्याच्या तडाखेबंद खेळीमुळे भारताला अडीचशे धावसंख्या पार करता आली. त्याचा वीस धावा नंतर सुटलेला झेल आणि त्यानंतर त्याने वाढवलेल्या ५५-६० धावा अखेर निर्णायक ठरल्या. भारताच्या विजयाला आणखी एका खेळाडूचा हातभार लागला आणि तो खेळाडू म्हणजे अक्सर पटेल. त्याने गोलंदाजीत तीन शतकात ३५ धावा देऊन एक बळी घेतला असला तरी देखील त्याच्या चपळ क्षेत्ररक्षाने तीन फलंदाज टिपले आणि त्या त्याच्या दक्ष आणि चपळ फील्डिंगमुळे भारताला विजय मिळवता आला. विजयाच एक श्रेय गोलंदाज बुमरा यालाही देखील द्याव लागेल. त्याने त्याचे चौथे आणि सामन्यातील अठरावे षटक योर्करच्या आणि कल्पक बुद्धिमत्तेच्या बळावर टाकले. ज्यामध्ये त्याने अवघ्या सहा धावा दिल्या. त्यामुळे इंग्लंडचा धावांचा वेग मंदावला. त्यांना अखेरच्या दोन षटकात ३८ धावा करणे गरजेचे होते. १९ व्या शतकात हार्दिक पंड्याने इंग्लंडला नऊ धावाच काढू दिल्या. त्यामुळे अखेरच्या षटकात २९ धावा पटकावण्याच अशक्य आव्हान इंग्लंड पुढे उभ राहिल. मात्र भारताकडे यावेळी अखेरचे शतक टाकण्यासाठी अनुभवी गोलंदाज नव्हता.

धावसंख्या मोठी असल्यामुळे फारसा अनुभव नसलेल्या शिवम दुबे यांच्याकडे चेंडू दिला गेला. त्याने पहिले तीन चेंडू चांगले टाकले. त्याच षटकात एक धावचीतचा बळी देखील मिळाला. मात्र अखेरच्या तीन चेंडूंवर आर्चरने तीन षटकार मारले आणि इंग्लंडने हा सामना जिंकला असताः अशी चुटपुट तमाम क्रिकेट रसिकांच्या हृदयाला लावली. संजू सॅमसनची तुफान पटकेबाजी, बुमराहचे अतिशय परिणामकारक असे अठरावे षटक आणि अक्सर पटेल याचे चपळ क्षेत्ररक्षण यामुळेच सामना भारताने जिंकून, आपल्या यजमान पदाच्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत खेळण्याचा मान मिळवला आहे.

# चित्तथरारक सामन्यात भारताचा विजय

## || बेथलच्या शतकानंतरही इंग्लंडचा पराभव || संजू पुन्हा एकदा ठरला सर्वोत्तम फलंदाज

| मुंबई | वृत्तसंस्था |

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ चा दुसरा उपांत्य सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत आणि इंग्लंड क्रिकेट संघात खेळवण्यात आला. यात भारताने ७ विकेटने विजय मिळवत चौथ्यांदा अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ७ बाद २५३ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात बेथलच्या विक्रमी शतकाच्या बळावर इंग्लंडनही दमदार फलंदाजी केली. मात्र ते सात धावांनी कमी पडले. त्यांचा डाव २० षटकांत २४६ धावांपर्यंत मर्यादित राहिला. यासह भारतीय संघ फायनलमध्ये जाणारी श्रीलंकेनंतर दुसरी होस्ट टीम बनली आहे. श्रीलंकेने २०१२ मध्ये हा कारनामा केला होता. आता भारतीय रविवारी ८ मार्च रोजी अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध दोन हात करणार आहे.





### सर्वाधिक नॉकआउट धावसंख्या

भारताचा २५३ धावांचा स्कोर अनेक प्रकारे ऐतिहासिक आहे. टी-२० विश्वचषकाच्या नॉकआउट इतिहासातील ही सर्वोच्च धावसंख्या आहे. भारतीय संघाचा या फॉरमॅटमधील हा दुसरा सर्वोच्च स्कोर आहे, याच वर्ल्डकपमध्ये झिम्बाब्वेविरुद्ध त्यांनी केलेल्या २५६ धावांच्या मागे. श्रीलंकेच्या केनियाविरुद्ध २००७ च्या २६० धावांच्या विक्रमापासून भारतीय संघ फक्त सात धावांनी कमी पडली, पण सेमीफायनलसारख्या मोठ्या सामन्यात २५३ धावा करणं हा स्वतःमध्ये एक जागतिक विक्रम आहे.

भारताने दिलेल्या २५४ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली. साल्टला पांड्याने ५ धावांवर बाद केले. यानंतर आलेल्या ब्रूकला बुमराहच्या गोलंदाजीवर अक्षरला ७ धावांवर झेल दिला. बटलर चांगल्या फॉर्ममध्ये दिसत होता पण फिरकी गोलंदाज वरुणने त्याला २५ धावांवर बाद केले.

बटलर बाद झाला तेव्हा इंग्लंडची धावसंख्या ३/६४ होती. यानंतर जॅक्स आणि जेकब बेथलनं ७६ चेंडूची भागीदारी करत इंग्लंडच्या आशा जिवंत ठेवल्या. जेकब बेथलने १०५ धावांची खेळी करत इंग्लंडला विजय मिळवून देण्याचा पुरेपुर प्रयत्न केला, मात्र त्याला अपयश आलं. अखेर त्यांचा डाव २० षटकांत ७ बाद २४६ धावांवर मर्यादित राहिला. गोलंदाजीत पांड्याने सर्वाधिक २ विकेट घेतल्या.

सामन्यात इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्यास सांगितले. त्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतानें नर्धारित २० षटकांत सात गडी गमावून २५३ धावांचा हिमालय उभारला. संजू सॅमसन पुन्हा एकदा भारताचा सर्वोत्तम फलंदाज ठरला. त्यानं ४२ चेंडूत ८९ धावांची खेळी केली. यात आठ चौकार आणि सात षटकारांचा समावेश होता. मात्र, अभिषेकची बॅट पुन्हा काम करु शकली नाही आणि तो फक्त ९ धावा करून बाद झाला. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या इशाननं १८ चेंडूत ३९ धावांची शानदार खेळी केली. शिवम दुबेने २५ चेंडूत ४३ धावा केल्या. हार्दिकने १२ चेंडूत २७ धावा केल्या आणि तिलकने फक्त सात चेंडूत २१ धावा केल्या. इंग्लंडकडून गोलंदाजीत आदिल रशिद आणि विल जॅक्सनं प्रत्येकी २-२ विकेट घेतल्या.

## रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे
# विनीत कुलकर्णी, अजय देशपांडे यांचा सत्कार

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर वरिष्ठ गटाच्या दोन दिवसीय कसोटी फॉरमॅट नुसार घेण्यात येणाऱ्या क्रिकेट स्पर्धेतील १५ सामन्यांचे आयोजन आरडीसीए पुढाकाराने करण्यात येते आहे. काल पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावरील रायगड विरुद्ध सेंट्रल डिफेन्स अकॅडमी संघांमधील सामन्यासाठी पंच म्हणून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे पहिले युवा आंतरराष्ट्रीय (आयसीसी व बीसीसीआयचे) पंच विनीत कुलकर्णी व महाराष्ट्र क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष अजय देशपांडे यांची नियुक्ती एमसीएतर्फे करण्यात आली होती. पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला.




महाराष्ट्र क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष अजय देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, जिल्ह्यात एमसीएच्या महत्वाच्या मॅचेस सुधा भविष्यात होऊ शकतात त्यासाठी चांगल्या दर्जाचे मैदान व उत्तम खेळपट्टी तयार करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन कडे स्वतःचे मैदान असावे यासाठी प्रयत्नशील असल्याचा सर्वांना आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्काराच्या कार्यक्रमासाठी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, राजेश पाटील, प्रशांत ओक, अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, श्याम पाटील, मुख्या प्रशिक्षक शंकर दळवी रणजीपटू योगेश पवार, दिनेश सावंत, दिलीप लाड, शेखर भगत, सुयोग चौधरी, चंद्रकांत चौधरी, ॲड. पंकज पंडित, रवी सोलंकी, विश्वजित जगदाळे यांच्या सह दोन्ही संघांचे खेळाडू व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री छत्रपती चषकाचा नागोठणे विजेता




| पाली/गोमाशी| प्रतिनिधी|

शिवशंभू इलेव्हन आंबोलेवाडी यांच्या वतीने श्री छत्रपती चषक २०२६ निमित्त मर्यादित षटकांचे सामने जनरल अरुण कुमार वैद्य क्रीडांगण पाली येथे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत २४ संघांनी आपला प्रवेश निश्चित केला होता. स्पर्धेचे थेट प्रेक्षेपण युट्यूबच्या माध्यमातून करण्यात आले होते. स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. स्पर्धेतील अंतिम लढत सुमित दादा काते प्रतिष्ठान नागोठणे विरुद्ध शिव शंभू इलेव्हन आंबेलेवाडी संघात झाली. सुमित दादा काते प्रतिष्ठान नागोठणे हा संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. या संघास रोख रक्कम ३० हजार व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी शिव शंभू इलेव्हन आंबेलेवाडी या संघास रोख रक्कम २० हजार व आकर्षक चषक, तर तृतीय क्रमांक अगस्त इलेव्हन वैतागवाडी संघास १० हजार व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक दत्तगुरुक्लब भार्जेवाडी अ या संघास रोख रक्कम ७ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. सामनावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षकास आकर्षक बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

## स्वस्तिक-स्वराज्य संघांस विजेतेपद

| मुलुंड | प्रतिनिधी |

मुलुंड येथे सुराज फाऊंडेशन आयोजित आणि एलआयसी ऑफ इंडिया पुरस्कृत रंगीबेरंगी महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडली. छत्रपती संभाजीराजे क्रीडांगणावर मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘काव्य प्रभात’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, मुग्धा माळी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी कवितावाचन करून उपस्थितांची दाद मिळवली. युवकांसाठी कबड्डी स्पर्धा आणि महिलांसाठी व्यापारी पेठ उपक्रमामुळे महोत्सवाला विशेष रंगत आली. मुलुंड क्रीडा केंद्र आयोजित कबड्डी महोत्सव २०२६ च्या अंतिम फेरीत महिला व पुरुष गटातील सामने उत्कंठावर्धक ठरले. महिला गटात स्वराज्य स्पोर्टस (कांजूरमार्ग) यांनी आरंभ स्पोर्टस (मालाड) संघावर ३६-२२ असा विजय मिळवत अजिंक्यपद पटकावले. प्रसिता पान्हाळकर यांना सर्वोत्कृष्ट चढाईपटू, माधुरा सावंत यांना सर्वोत्तम बचावपटू, तर यशिका पुजारी हिला सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला. पुरुष गटात स्वस्तिक क्रीडा मंडळ (कुर्ला) यांनी अंतिम सामन्यात चेंबूर क्रीडा केंद्रावर २६-१४ अशी मात करत विजेतेपद पटकावले. आदिनाथ गायकवाड यांना सर्वोत्तम खेळाडू, सुजल सावंत यांना सर्वोत्तम बचावपटू, तर कुणाल पवार यांना सर्वोत्तम चढाईपटू म्हणून गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभ अमोल कीर्तिकर, शिरीष सावंत, सुधाकर घाग यांच्या हस्ते पार पडला. विजेत्या संघांना रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

## बुद्धिबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुलुंड :** खा. संजय दिना पाटील यांच्या पुढाकारातून भव्य बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रुद्र विद्यानिकेतन आणि द स्कूल ऑफ चेस मास्टर्स यांच्या संयुक्त विद्यमाने भांडुप (पश्चिम) येथील आयडीयूबीएस शाळेत ही स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत मुलुंड, भांडुप, ठाणे, पालघर, रायगड आणि मुंबईतील सुमारे १३० शाळांमधील ३४५ हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बुद्धिबळामुळे निर्णयक्षमता, एकाग्रता आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते, असे मत संजय दिना पाटील यांनी व्यक्त केले. स्पर्धेतील विजेते अरिहा देवरुखकर, यश गनिगा, मानक स्वरूप आणि धैर्य जैन यांना त्यांच्या हस्ते तसेच इतर खेळाडूंना नगरसेविका राजोल संजय पाटील यांच्या उपस्थितीत पारितोषिके प्रदान करण्यात आली.

## कबड्डी स्पर्धेत वरसुआई वाशी विजेता

| गडब | वार्ताहर |

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने जेएसडब्लु स्टील लिमिटेडच्या सौजन्याने, सत्यनारायण क्रिडा मंडळ नवेगाव आयोजित पुरुष गटाच्या सरपंच चषक कबड्डी स्पर्धेत वरसुआई वाशी संघाने विजेतेपद मिळविले.

स्पर्धेचे उदघाटन वडखळ ग्रामपंचायतीच्या शिवानी म्हात्रे, योगिता मोकल, प्रभाकर म्हात्रे, जेएसडब्लु कंपनीचे व्हाईस प्रेसिटेंड आत्माराम बेटकेकर, व्हाईस प्रेसिडेंड कर्नल भार्गवे, समीर गायकवाड, योगेश पाटील, सुनिल जांभळे, निलेश म्हात्रे, जयश्री म्हात्रे, विनोदीनी कोळी, प्रभाकर म्हात्रे, छत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे, राष्टीय खेळांडु संजय मोकल, मंडळाचे अध्यक्ष गजेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष दिनेश म्हात्रे. आदी




मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

या स्पर्धे दरम्यान, कबड्डी क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. स्पर्धेत प्रथम क्रमांक वरसुआई वाशी, व्दितीय क्रमांक मरीदेवी धेरंड, तृतीय क्रमांक गावदेवी इंद्रनगर, चतुर्थ क्रमांक जय हनुमान उचेडे, या स्पर्धेत सर्वोत्कुष्ट खेळांडु अभिषेक भोईर (वरसुआई वाशी) उत्कृष्ट चढाई सुयोग गायकर (मरीदेवी धेरंड), उत्कृष्ठ पक्कड निशांत म्हात्रे (जय हनुमान उचेडे) पब्लिक हिरो अथर्व गावंड (गावदेवी इंद्रनगर) यांना मान्यवरांचे हस्ते पारितोषक देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेवर निरिक्षक म्हणुन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पंच मंडळाचे सचिव अंजिक्य पाटील हे होते तर स्पर्धेवर पंच प्रमुख राष्टीय पंच के. जी म्हात्रे होते. या स्पर्धेचे समालोचन विश्वनाथ म्हात्रे, रंविद्र पाटील, अलकांर मनवी यांनी केले.

## नितेश रावजींचा बोट स्पर्धेत प्रथम क्रमांक



● (छाया: गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यातील वाघोबा मित्रमंडळ नांदगाव कोळीवाडयाने होळी सणानिमित्त आयोजित केलेल्या बोट (नौका) स्पर्धेत नांदगावच्या नितेश रावजी यांच्या बोटीने प्रथम क्रमांक पटकावला. नांदगाव समुद्र किनारी रविवारी सकाळी बोटींच्या स्पर्धेचा थरार पहायला मिळाला.तीन खलाशी असलेल्या सुमारे दहा बोटींनी या स्पर्धेत भाग घेतला होता. नांदगाव कोळीवाड्या लगतच्या खाडीतून या स्पर्धेला प्रारंभ झाला. अटीतटीच्या या लढतीत नितेश रावजी यांच्या बोटीने अखेर बाजी मारली.

प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. चंद्रकांत देवकर यांच्या बोटीला दुसरा क्रमांक मिळाला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी वाघोबा मित्रमंडळाच्या अजय अग्रावकर, दिगंबर पाटील, वृषभ तरे व अन्य सदस्यांनी मोठे सहकार्य केले. स्पर्धा पाहायला यशवंतनगर पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

अमेरिका-इराण तणावामुळे इराणची माघार | पात्र ठरलेल्या संघाने माघार घेतलेली नव्हती

# फुटबॉल स्पर्धेवर संकटाचे सावट

| जिनिव्हा | वृत्तसंस्था |

अमेरिका, मेक्सिको व कॅनडा या देशांमध्ये फिफा विश्वकरंडक या अत्यंत मानाच्या फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. विश्वकरंडकाला १०० दिवस बाकी असताना अमेरिका-इराणमधील युद्ध, मेक्सिकोमधील हिंसाचार, राजकीय तणाव व आर्थिक प्रश्न यामुळे नवे आव्हान उभे ठाकले आहे.

यंदाचा फुटबॉल विश्वकरंडक हा अमेरिका आणि इतर देशांतील राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर सुरू होणार आहे. काही देशांवर अमेरिकेने टॅरिफ (कर) लावले आहेत, काहींवर प्रवास निर्बंध आहेत. यामुळे समस्या निर्माण होऊ शकणार आहे.

इराणने पात्रता मिळवली असली तरी तो संघ अमेरिकेत खेळायला येईल का, याबाबत अनिश्चितता आहे. अमेरिका आणि इस्राईलने केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनेई यांचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर इराणचे फुटबॉलप्रमुख मेहदी ताज यांनी सांगितले, की या हल्ल्यानंतर आम्ही आशेने वर्ल्डकपकडे पाहू शकत नाही. इराणने अद्याप स्पर्धेतून माघार जाहीर केलेली नाही. गेल्या ७५ वर्षांमध्ये पात्र ठरलेल्या कोणत्याही संघाने माघार घेतलेली नाही. बेल्जियम, इजिप्त आणि न्यूझीलंड यांच्यासह

इराण या देशाचा समावेश एका गटात आहे.तिकिटांच्या किमतींवर टीकाफिफाने ७० लाख तिकिटे विक्रीसाठी ठेवली आहेत. तिकिटांच्या किमती ८,६८० डॉलर्सपर्यंत गेल्या आहेत. त्यामुळे टीकाही होत आहे. फिफा अध्यक्ष गियानी इनफॅनटिनो यांनी १०४ सामन्यांची सर्व तिकिटे विकली गेली असल्याचा दावा केला आहे.

### फॅफेस्ट कार्यक्रम रद्द

विश्वकरंडकका दरम्यान मोठ्या स्क्रीनवर सामने पाहण्यासाठी आयोजित होणारे फॅफेस्टफ कार्यक्रम अमेरिकेत काही ठिकाणी रद्द किंवा कमी केले जात आहेत. न्यूयॉर्क/न्यू जर्सीने आपल्या शहरातील कार्यक्रम रद्द केला.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)